सोमवार
१८
ऑगस्ट २०२५

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १६७
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग

# अजिंक्य भारत




सूर्यकुमारची झाली फिटनेस चाचणी (पान ७ वर)

# सैनिकी प्रशिक्षणादरम्यान अपंगत्व आलेल्या जवानांना दिलासा!

## सर्वोच्च न्यायालयाने घेतली दखल

नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था

**देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून लष्करी प्रशिक्षणासाठी गेलेल्या, मात्र दुर्दैवाने प्रशिक्षणादरम्यानच अपंगत्व आल्याने सेवेतून बाहेर फेकल्या गेलेल्या तरुण कॅडेट्सच्या व्यथांची अखेर सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली आहे.**



एका वृत्तपत्रातील अहवालाच्या आधारे न्यायालयाने या गंभीर विषयावर स्वतःहून सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला असून, या निर्णयामुळे अनेक पीडित तरुणांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरथना आणि न्यायमूर्ती उज्वल भुयान यांच्या खंडपीठाने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखत तातडीने सुनावणी निश्चित केली आहे. एका प्रतिष्ठित इंग्रजी वृत्तपत्रात १२ ऑगस्ट रोजी एक सविस्तर अहवाल प्रसिद्ध झाला होता. या अहवालात राष्ट्रीय संरक्षण अकादमी आणि भारतीय लष्करी अकादमी यांसारख्या प्रमुख संस्थांमधील धक्कादायक वास्तव मांडण्यात आले होते. या संस्थांमध्ये खडतर प्रशिक्षणादरम्यान अनेक कॅडेट्सना गंभीर दुखापती होऊन कायमचे अपंगत्व येते. मात्र, हे अपंगत्व सेवेदरम्यान आलेले नसल्याचे कारण देत त्यांना वैद्यकीय कारणास्तव सेवेतून काढून टाकले जाते. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात स्वतः हून लक्ष घातल्याने या धोरणात्मक त्रुटीवर देशपातळीवर चर्चा सुरू झाली आहे. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे केंद्र सरकार आणि संरक्षण मंत्रालयाला या संवेदनशील विषयावर धोरणात्मक बदल करण्यास भाग पाडले जाऊ शकते. या सुनावणीतून जर या कॅडेट्सच्या बाजूने निर्णय लागला, तर तो एक ऐतिहासिक क्षण ठरेल. यामुळे केवळ सध्याच्या पीडितांनाच नाही, तर भविष्यात अशा प्रसंगांना सामोरे जाणाऱ्या तरुणांनाही एक मोठे कायदेशीर आणि सामाजिक संरक्षण कवच मिळेल. या प्रकरणावरील पुढील सुनावणीकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

### काय आहे नेमकी समस्या?

सर्वात मोठी अडचण ही आहे की, प्रशिक्षणादरम्यान आलेल्या अपंगत्वामुळे या कॅडेट्सना माजी सैनिक म्हणून गणले जात नाही. यामुळे त्यांना माजी सैनिकांना मिळणारे कोणतेही लाभ मिळत नाहीत. सेवेत असताना अपंगत्व आल्यास मिळणारे निवृत्तीवेतन या कॅडेट्सना नाकारले जाते. माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजनेअंतर्गत मिळणाऱ्या मोफत किंवा सवलतीच्या दरातील वैद्यकीय उपचारांपासून ते वंचित राहतात. सेवेतून बाहेर पडल्यानंतर त्यांच्या पुनर्वसनासाठी किंवा पर्यायी नोकरीसाठी कोणतीही ठोस तरतूद नाही. यामुळे देशसेवेसाठी स्वतःला वाहून घेणाऱ्या या तरुणांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे भविष्य अंधारात जाते. एकीकडे शारीरिक अपंगत्व आणि दुसरीकडे आर्थिक व सामाजिक सुरक्षेचा अभाव, अशा दुहेरी संकटात ते सापडतात.

## महत्त्वाचे

### असल्यांना टायरमध्ये घातले पाहिजे- पवार



बारामती : शहरात पथदिव्याच्या खांबांचे नट-बोल्टसुद्धा चोरीला जात आहेत. खालच्या पट्ट्या चोरल्या जात आहेत, झाडे चोरली जात आहेत. अशांना जनाची नाही तर मनाची तरी लाज वाटायला पाहिजे. असे लोक सापडले तर त्यांना टायरमध्ये घालून मोक्का लावला जाईल, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला. या वेळी त्यांनी टवाळखोरी करणाऱ्यांनाही चांगलेच सुनावले. ते म्हणाले की, कोण कुठे लाइन मारायला जाल, तर तुझी लाइनच काढतो अन् टायरखाली घालतो. कोणालाही अजिबात सोडणार नाही. कायदा हातात घेऊ नका. कुठेही रात्री-अपरात्री वेडेवाकडे काही करू नका. शहरात कायदा सुव्यवस्था राखली गेलीच पाहिजे. कोणाचीही गुंडगिरी, दादागिरी खपवून घेतली जाणार नाही.

### बिहारमध्ये भाजपला रोखण्याचा निर्धार



**नवी दिल्ली:** जनसुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी बिहारमधील आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपला रोखण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यासाठी नवा फॉर्म्युलाही त्यांनी मांडला. त्या फॉर्म्युलाचा भर हिंदू आणि मुस्लिम समुदायांना एकत्र आणण्यावर असेल. पत्रकारांशी बोलताना त्यांनी पक्षाच्या रणनीतीविषयीचे सूतोवाच केले. सर्व हिंदूंचा भाजपला पाठिंबा नाही. खरेतर, बहुसंख्य हिंदू भाजपच्या पाठिशी असल्याचेही म्हणता येऊ शकत नाही. आमचा विचारसरणीवर आधारित युती घडवण्याचा विचार आहे. महात्मा गांधी, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीवर श्रद्धा असणारे हिंदू आणि मुस्लिमांमध्ये आम्ही युती घडवू इच्छितो. तशा प्रकारची जुळणी सहजपणे भाजपचा पराभव करू शकते, असे त्यांनी म्हटले.

### यादव यांचा निवडणूक आयोगावर निशाणा



**पाटणा:** भाजप आणि निवडणूक आयोग एकत्रितपणे सिस्टिमॅटिक इलेक्टोरल रोल (एसआयआर) द्वारे लोकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याचा कट रचत आहेत. हा लोकशाहीवरील हल्ला असून आम्ही हे षड्यंत्र यशस्वी होऊ देणार नाही, असे बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय जनता दल प्रमुख लालूप्रसाद यादव यांनी म्हटले आहे. यादव म्हणाले की, देशातील सध्याची परिस्थिती आणीबाणीपेक्षाही वाईट आहे. देशात एक प्रकारे अघोषित आणीबाणी सुरू आहे.

### महाराष्ट्र, गुजरात राज्यांना पाऊस झोडपून काढणार

**मुंबई :** गेल्या दोन दिवसांपासून राज्यात मुसळधार पाऊस कोसळत असून, पुढील काही दिवस हा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. वायव्य बंगालच्या उपसागरात आंध्र प्रदेश आणि दक्षिण ओडिशाच्या किनाऱ्यालगत तयार होत असलेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे महाराष्ट्र, गोवा आणि गुजरातमध्ये पुढील सात दिवसांत अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. (पान २ वर)

## आमच्यासाठी सर्व पक्ष समान : निवडणूक आयोग

# मत चोरीसारख्या शब्दांचा वापर चुकीचा

नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था

**रविवारी निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेतली. यामध्ये बिहारमध्ये सुरू असलेल्या विशेष सघन पुनरीक्षण प्रक्रियेवर आणि 'मत चोरी'च्या आरोपांवर उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. आयोगाने म्हटले की, आमच्यासाठी कोणताही सत्ताधारी पक्ष किंवा विरोधी पक्ष नाही, तर सर्व समान आहेत. या पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आरोप पूर्णपणे फेटाळून लावले.**

मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले की, कोणत्याही तक्रारीसाठी आयोगाचे दरवाजे नेहमीच खुले आहेत. ते म्हणाले की, मत चोरीसारख्या शब्दांचा वापर पूर्णपणे चुकीचा आहे, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयात याचिका दाखल करायला हवी होती. मतदारांचे फोटो, नावे आणि ओळखपत्रे सार्वजनिकरित्या दाखवण्यात आली आहेत, जे पूर्णपणे चुकीचे आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की, निवडणूक आयोगाचे दरवाजे नेहमीच सर्वांसाठी समानतेने खुले असतात. जमिनीवर, सर्व मतदार, सर्व राजकीय पक्ष आणि सर्व बूथ लेव्हल अधिकारी पारदर्शक पद्धतीने एकत्र काम करत आहेत, पडताळणी, स्वाक्षरी आणि व्हिडिओ प्रशंसापत्रे देखील देत आहेत. ते म्हणाले की, राजकीय पक्षांच्या जिल्हाध्यक्षांचे आणि त्यांनी नियुक्त केलेल्या बीएलओंचे हे सत्यापित कागदपत्रे, प्रशंसापत्रे एकतर त्यांच्या स्वतःच्या राज्य पातळीवरील किंवा राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांपर्यंत पोहोचत नाहीत किंवा जमिनीवरील वास्तवाकडे दुर्लक्ष करून गोंधळ पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे ही गंभीर चिंतेची बाब आहे. ज्ञानेश कुमार म्हणाले की, सत्य हे आहे की सर्व भागधारक टप्प्याटप्प्याने बिहारच्या एसआयआरला पूर्णपणे यशस्वी करण्यासाठी वचनबद्ध, प्रयत्नशील आणि कठोर परिश्रम करत आहेत. जेव्हा बिहारचे सात कोटींहून अधिक मतदार निवडणूक आयोगासोबत उभे असतात, तेव्हा निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर किंवा मतदारांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही. ज्ञानेश कुमार म्हणाले की, मी सर्व १२ राजकीय पक्षांना, मग ते राष्ट्रीय पक्ष असोत किंवा राज्यस्तरीय पक्ष असोत, १ सप्टेंबरपूर्वी बिहारच्या करुन अद्ययावत केलेल्या मतपत्रिकेत चुका दाखवून देण्याचे आवाहन करू इच्छितो. निवडणूक आयोग ते दुरुस्त करण्यास तयार आहे, परंतु १ सप्टेंबरनंतर यासाठी कोणतीही संधी मिळणार नाही. कारण त्यानंतर आपण मतदानाच्या इतर प्रक्रियेत सहभागी होऊ. जेव्हा एखादा मतदार मतदान करण्यासाठी जातो आणि बटण दाबतो तेव्हा तो ते फक्त एकदाच दाबू शकतो. मतदान चोरी होऊ शकत नाही. मतदार फक्त एकदाच मतदान करू शकतो. महाराष्ट्रात मतदार यादीत अनियमितता असल्याचे (पान २ वर)

### ज्ञानेश कुमार यांनी आरोप फेटाळले



### ...नाही तर राहुल गांधींनी माफी मागावी !

मतचोरीचे आरोप करणाऱ्या पण हे आरोप सिद्ध करण्यासाठी पुरावे देणे टाळणाऱ्या काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी सात दिवसांत निवडणूक आयोगापुढे शपथपत्र सादर करावे. शपथपत्र देणार नसल्यास राहुल गांधी यांनी जाहीरपणे देशाची माफी मागावी; असा निर्वाणीचा इशारा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी दिला आहे. मत चोरी असे शब्द वापरणे म्हणजे भारतीय संविधानाचा अपमान आहे, असा टोला ज्ञानेशकुमार यांनी नाव न घेता काँग्रेस नेते राहुल गांधी यांना लगावला. गेल्या काही काळात राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर सवालांची सरबत्ती केली होती. प्रेस कॉन्फरन्समध्ये सादरीकरण करत त्यांनी निवडणूक चोरली गेल्याचा आरोप केला होता. त्यांनी दुबार मतदान, नवमतदार नोंदणी, एकाच ठिकाणी अनेक मतदार यात घोटाळा झाल्याचे राहुल गांधींनी सांगितले होते. त्या मुद्यांवर ज्ञानेशकुमार यांनी प्रेस कॉन्फरन्समध्ये आयोगाचे मत मांडले.

## जम्मू काश्मीरमध्ये पुन्हा ढगफुटी; सात जणांचा मृत्यू



जम्मू : दि. १७ वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यात रविवारी पहाटे ढगफुटीत किमान सात जणांचा मृत्यू झाला आणि सहा जण जखमी झाले. कठुआ जिल्ह्यातील राजबाग परिसरातील घाटी गावात आणि जवळच्या दोन ठिकाणी ढगफुटीमुळे प्रचंड नुकसान झाले. अचानक आलेल्या पुरामुळे घाटी गावाचा जगाशी असलेला संपर्क तुटला. पोलीस आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांनी तातडीने मदतकार्य सुरू केले.घटनास्थळावरुन आतापर्यंत ६ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त घटनास्थळावरुन सहा जखमींना सुरक्षितरित्या बाहेर काढून पुढील उपचारांसाठी सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी किश्तवाड जिल्ह्यात ढगफुटीच्या एका भीषण घटनेत ६० हून अधिक जणांचा जीव गेला होता. कठुआ पोलिस स्टेशन हद्दीतील बगड आणि चांग्रा गावांमध्ये आणि लखनपूर पोलिस स्टेशन हद्दीतील दिलवान-हुटली येथे भूस्खलनाच्या घटना घडल्या, परंतु कोणतेही मोठे नुकसान झाले नाही. मुसळधार पावसामुळे बहुतेक जलाशयांची पाण्याची पातळी झपाट्याने वाढली आहे आणि उझ नदी धोक्याच्या पातळीजवळून वाहत आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि लोकांना जलाशयांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ईव्हीएम मतमोजणीत पराभूत उमेदवार विजयी घोषित

### सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था

ईव्हीएम मतमोजणीत पराभूत झालेला एक उमेदवार सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयाने विजयी झाला आहे. देशाच्या इतिहासात हा कदाचित पहिलाच निर्णय असेल की ईव्हीएमद्वार पराभूत उमेदवाराला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे विजयी घोषित करण्यात आले. हा निर्णय आगामी काळासाठी मार्गदर्शक ठरण्याची शक्यता आहे.

हा निर्णय न्या. सूर्यकांत, न्या. दिपांकर दत्ता, न्या. नोंग्मीकापम कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने ११ ऑगस्टला दिला. बुआना लाखू गावात सरपंचपदासाठी झालेल्या निवडणुकीत ३७६७ मतदान झाले. यातील कुलदीप सिंह यांना १०००, तर मोहित मलिक यांना १०५१ मते मिळाली होती. मात्र निवडणूक अधिकाऱ्यांनी नजरचुकीने मोहित यांची ५१ मते ही कुलदीप यांच्या खात्यात जमा केली. मतांच्या या अदलाबदलीमुळे कुलदीप यांना विजयी घोषित करण्यात आले. मोहित मलिक यांनी या निर्णयाला आव्हान दिले. जिल्हा पातळीवर पुन्हा मतमोजणी करण्यात आली तिथे मोहित यांची ५१ मते कुलदीप यांच्या खात्यात गेल्याचे स्पष्ट झाले. मात्र सरपंच नियुक्ती पत्र कुलदीप यांना मिळाल्यामुळे त्यांनी पद सोडण्यास नकार दिला. यानंतर प्रकरण हायकोर्टात गेले. तिथे मात्र कुलदीप यांना स्टे मिळाला. त्यामुळे ते सरपंचपदी कायम राहिले. मोहित मलिक यांनी हायकोर्टाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयात कुलदीप यांची (पान २ वर)

## उपराष्ट्रपती पदासाठी राधाकृष्णन यांना उमेदवारी



### एनडीएने केली दिल्लीत घोषणा

नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था

संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू असतानाच जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या राजीनाम्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं होतं. जगदीप धनखड यांच्या राजीनाम्यानंतर नवे उपराष्ट्रपती कोण होणार? याकडे अनेकांच्या नजरा लागलेल्या आहेत. दरम्यान, या पार्श्वभूमीवर दिल्लीत घडामोडींना वेग आल्याचं पाहायला मिळत आहे. उपराष्ट्रपती पदासाठी आज एनडीएच्या उमेदवाराची दिल्लीत घोषणा करण्यात आली आहे. (पान २ वर)

## मतदार यादी पुर्नरिक्षण कार्यक्रम पुढे ढकला

### निवडणूक आयोगाकडे मागणी

मुंबई : दि. १७ वृत्तसंस्था



महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने केंद्रिय निवडणूक आयोगाकडे मागणी केली आहे की, राज्यातील प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडेपर्यंत विशेष सघन मतदार यादी पुनरिक्षणप्रक्रियेची अंमलबजावणी पुढे ढकलावी. निवडणूक यंत्रणांवर असलेला ताण आणि कर्मचारी तुटवडा ही यामागची प्रमुख कारणं असल्याचं महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केलं आहे.

विशेष सघन मतदार यादी पुनरिक्षण ही एक अत्यंत विस्तृत प्रक्रिया असते. यात प्रत्येक मतदाराची प्रत्यक्ष भेट घेऊन, त्याची माहिती पडताळली जाते. या प्रक्रियेमध्ये बूथ स्तर अधिकारी घरोघरी जाऊन मतदाराची खातरजमा करतात. ही प्रक्रिया सर्वसाधारणपणे दर २०२५ वर्षांनीच केली जाते. महाराष्ट्रात शेवटचं असे पुनरिक्षण २००२ मध्ये झाले होते. सध्या महाराष्ट्रात २९ महापालिका, २९० नगर पंचायत व परिषद, ३२ जिल्हा परिषद आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. या सर्व संस्थांचा कार्यकाळ संपला आहे. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की, या निवडणुकांसाठी वॉर्ड रचना आणि मतदार यादींचं विभाजन लवकरच सुरू होणार असून त्यासाठी कर्मचारी लागतील. त्यामुळे एकाच वेळी विशेष सघन मतदार यादी पुनरिक्षण प्रक्रिया चालवणं कठीण होईल. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी जुलैच्या (पान २ वर)

## ७८ वर्षांनंतर पंतप्रधान कार्यालयाचा पत्ता बदलणार!



नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था

लुटियन्स दिल्लीच्या पॉवर कॉरिडॉरमध्ये मोठा बदल होणार आहे. ७८ वर्षांनंतर पंतप्रधान कार्यालयाचा पत्ता बदलणार आहे. पीएमओ आता साउथ ब्लॉकवरून एक्झिक्युटिव्ह एन्क्लेव्हमध्ये स्थलांतरित होईल. नवीन पंतप्रधान कार्यालय पुढील महिन्यापासून काम सुरू करेल.

साउथ ब्लॉक आणि नॉर्थ ब्लॉक स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश राजवटीत बांधले गेले. जुन्या इमारतीत जागेची कमतरता आहे आणि आधुनिक सुविधांचाही अभाव आहे. त्यामुळे केंद्र सरकारने प्रशासकीय कामासाठी नवीन आणि चांगल्या इमारती बांधण्याचे निर्देश दिले. यानंतर, साउथ ब्लॉकपासून काही अंतरावर एक नवीन कार्यकारी एन्क्लेव्ह बांधण्यात आला आहे. नवीन इमारतीत पीएमओ, कॅबिनेट सचिवालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॉन्फरन्सिंग सुविधा देखील असेल. (पान २ वर)

### संघर्ष टोकाला | केंद्र सरकारचा सर्वोच्च न्यायालयाला इशारा

# लोकशाहीत न्यायालय सर्वोच्च नाही!

नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था

राज्य विधिमंडळाने सादर केलेल्या विधेयकांवर कारवाई करण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपालांना तीन महिन्यांची मुदत देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला केंद्र सरकारने विरोध केला आहे. केंद्र सरकारचे महाधिवक्ता तुषार मेहता यांनी म्हटले की, लोकशाहीत न्यायालयांकडे सर्व प्रश्नांची उत्तरे नाहीत. जर लोकशाहीतील एखाद्या घटकाला (राज्य) दुसऱ्या घटकावर शिरजोरी करण्याची संधी दिली तर त्याचे रुपांतर संवैधानिक अव्यवस्थेत होतील, असे तुषार मेहता म्हणाले. केंद्र सरकारने आपले म्हणणे तुषार मेहता यांच्यामार्फत सर्वोच्च न्यायालयाकडे लिखित स्वरुपात दिले आहे.



सर्वोच्च न्यायालयाने एप्रिलच्या सुनावणीमध्ये विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांना एका विशिष्ट कालमर्यादेत मंजुरी द्यावी वा ती नामंजूर करावीत, असे निर्देश दिले. त्यासाठी तीन महिन्यांची कालमर्यादा निश्चित केली. संविधानाच्या अनुच्छेद २०१ नुसार राज्यपाल वा राष्ट्रपतींवर अशी कोणतीही कालमर्यादा घालण्याची तरतूद नाही, असे आता केंद्र सरकारने म्हटले आहे.

१२ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर राष्ट्रपती आणि राज्यपालांना राज्यांच्या विधेयकांवर स्वाक्षरी करण्यासाठी वेळापत्रक निश्चित करता येईल का? यावर सुनावणी सुरू असताना मेहता यांनी कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका यांच्यातील अधिकारांच्या विभाजनाचे महत्त्व अधोरेखित केले होते.

तुषार मेहता यांनी सांगितले की, अधिकारांचे पृथक्करण हा संवैधानिक चौकटीचा भाग असला तरी काही वर्षांपासून, व्यावहारिक वापरात काही प्रमाणात एकमेकांवर अतिव्याप्ती होणे आणि नियंत्रण येणे किंवा अधिकारांचे मिश्रण तयार झाले आहे. काही क्षेत्रे अशी आहेत, जी तीन अवयवांपैकी कोणत्याही एका घटकासाठीच मर्यादीत राहतात. इतरांना त्यावर ताबा मिळवता येत नाही. राज्यपाल आणि राष्ट्रपती सारखे उच्च पदे त्यातच मोडतात. जरी ती राजकीय पदे असली तरी ती लोकशाहीच्या इच्छाशक्तीचे प्रतिनिधित्वही करतात, असेही महाधिवक्ता तुषार मेहता म्हणाले. मेहता पुढे म्हणाले, राष्ट्रपती पदासाठी निवडणूक होते आणि राज्यपालांची नियुक्ती मंत्रिमंडळ (राष्ट्रपतींमार्फत कार्य करणारे) करते. लोकशाहीमध्ये थेट निवडणुका हा लोकशाही प्रक्रियेचा एकमेव प्रकार नाही.

तर निवडून आलेले प्रतिनिधींद्वारे केल्या जाणाऱ्या नियुक्त्याही लोकाशाहीवरच्या आस्थेचे कायदेशीर केंद्र आहे. राज्यापालांबद्दल बोलताना मेहता म्हणाले की, संघराज्याच्या चौकटीमध्ये राज्यपालांना परके मानले जाऊ शकत नाही. राज्यपाल हे केवळ केंद्राचे दूत नसून ते संघराज्यीय व्यवस्थेतील संपूर्ण राष्ट्राचे प्रतिनिधी असतात.

## पान 1 वरून...

### मत चोरीसारख्या शब्दांचा..

आरोप करण्यात आले होते. जेव्हा प्रारूप यादी होती तेव्हा दावे आणि हरकती वेळेवर का सादर केल्या गेल्या नाहीत? निकाल आले तेव्हा ते चुकीचे असल्याचे सांगण्यात आले. आजपर्यंत महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पुराव्यासह एकाही मतदाराचे नाव मिळालेले नाही. निवडणुका होऊन आठ महिने झाले आहेत. शेवटच्या एका तासात इतके मतदान कसे झाले असा प्रश्नही विचारण्यात आला होता ? निवडणूक आयोगाने उत्तर दिले होते की जर मतदान १० तासांसाठी झाले तर सरासरी दर तासाला १० टक्के होते. १० वेळा किंवा २० वेळा काही तरी बोलल्याने ते खरे ठरत नाही. सूर्य फक्त पूर्वेला उगवतो. फक्त कोणीतरी तसे म्हटले म्हणून तो पश्चिमेला उगवत नाही, असे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितले. संविधानानुसार, खासदार आणि आमदारांच्या निवडणुकीत फक्त भारतीय नागरिकच मतदान करू शकतात. इतर देशातील लोकांना हा अधिकार अजिबात नाही. जर अशा लोकांनी मतमोजणी फॉर्म भरला असेल, तर एसआयआर प्रक्रियेदरम्यान त्यांना काही कागदपत्रे सादर करून त्यांचे राष्ट्रीयत्व सिद्ध करावे लागेल. अन्यथा चौकशीनंतर त्यांची नावे वगळण्यात येतील; असेही मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितले.

### मतदार यादी पुर्नरिक्षण ...

शेवटच्या आठवड्यात मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारच्या निवडणूक आयोगाकडे ही मागणी पोहचवली आहे. निवडणुका दिवाळीच्या सुमारास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे याआधी विशेष सघन मतदार यादी पुनरिक्षण सुरू होणे अवघड आहे.

म्हणूनच आम्ही ही मागणी वेळेत केली आहे, असं वाघमारे यांनी स्पष्ट केलं. बिहारमध्ये सध्या सुरू असलेल्या सघन पुनरिक्षणाचा मॉडेल महाराष्ट्रातही लागू केला जाण्याची शक्यता आहे. यात मतदारांचे वय पाहून तीन गटात विभागणी केली जाते : १९८७ पूर्वी जन्मलेले; १९८७ ते २००४ दरम्यान जन्मलेले; २००४ नंतर जन्मलेले. मतदार पडताळणीसाठी एकूण ११ प्रकारची प्रमाणपत्रं स्वीकारली जातील. २००२ च्या यादीत ज्यांची नावे आधीपासून आहेत, त्यांना फक्त पुष्टीकरण करायचे आहे. मात्र त्यानंतर जे नाव नोंदवले गेले आहे, त्यांना निवास आणि नागरिकत्वाचे पुरावे सादर करावे लागतील.

### ईव्हीएम मतमोजणीत पराभूत ...

याचिका रद्द ठरवण्यात आली आणि जिल्हा न्यायालयाला फेरमतमोजणीचे आदेश दिले. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रारच्या देखरेखीत ६ ऑगस्ट रोजी ईव्हीएम मतांची मतमोजणी झाली. यामध्ये ५१ मते मोहित यांना जास्त असल्याचे समोर आले.त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाने ११ ऑगस्ट रोजी मोहित मलिक यांना सरपंच घोषित केले.

### ७८ वर्षांनंतर पंतप्रधान ...

केंद्र सरकारने साउथ ब्लॉक आणि नॉर्थ ब्लॉकला एका मोठ्या सार्वजनिक संग्रहालयात रूपांतरित करण्याची योजना आखली आहे. त्याचे नाव युगे युगिन भारत संग्रहालय असे असेल. यासंदर्भात भारताचे राष्ट्रीय संग्रहालय आणि फ्रान्स संग्रहालय विकास यांच्यात आधीच एक करार झाला आहे. मोदी सरकारचे म्हणणे आहे की, हे संग्रहालय भारताच्या सांस्कृतिक वारशाचे प्रदर्शन करेल आणि लोकांना आपल्या गौरवशाली भूतकाळाशी, उज्ज्वल वर्तमानाशी आणि सुवर्ण भविष्याशी जोडण्याचे काम करेल.

### उपराष्ट्रपती पदासाठी ...

भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांना एनडीएचा उमेदवार निवडण्याचा अधिकार दिला होता. त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या संसदीय मंडळाची आज दिल्लीत महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी एनडीएच्या उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी एनडीएकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

राधाकृष्णन हे गेल्या तीन दशकांपासून भाजपाचे सक्रीय सदस्य आहेत. ते भाजपाच्या तिकीटावर दोन वेळा तमिळनाडूच्या कोईंबतूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार म्हणून निवडून आले आहेत. तसेच त्यांनी काही वर्षे तमिळनाडू भाजपाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून काम पाहिलं आहे. २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत भाजपाने त्यांना लोकसभेचं तिकीट दिलं होतं. मात्र, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदींची लाट असूनही ते पराभूत झाले होते. १८ फेब्रुवारी २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांची झारखंडच्या राज्यपालपदी नियुक्ती केली होती. त्यानंतर दीड वर्षांनी त्यांच्याकडे महाराष्ट्रासारख्या बलाढ्य राज्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती.

### महाराष्ट्र, गुजरात राज्यांना ...

यामुळे नागरिकांना घराबाहेर पडताना सतर्क राहण्याचे आणि योग्य खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागानुसार, १७ ते १९ ऑगस्ट दरम्यान कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर, तसेच १९ आणि २० ऑगस्टला गुजरातमधील सौराष्ट्रात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय, १७ आणि १८ ऑगस्टला किनारी आंध्र प्रदेश, तर १८ ऑगस्टला ओडिशा आणि तेलंगणात अतिमुसळधार पाऊस पडेल. १७ ते २१ ऑगस्ट दरम्यान मध्य महाराष्ट्र आणि गुजरात, १७ ते २० ऑगस्ट दरम्यान कोकण आणि गोवा, तसेच १७ आणि १८ ऑगस्टला मराठवाड्यातील काही भागात अतिवृष्टीची शक्यता आहे. या पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दक्षिण भारतातही १७ आणि १८ ऑगस्ट रोजी कर्नाटक आणि आंध्र प्रदेशच्या किनारी भागात, तसेच तामिळनाडूच्या काही भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. १७ ते २० ऑगस्ट दरम्यान आंध्र प्रदेश आणि तेलंगणाच्या काही भागात, तर १८ ते २० ऑगस्ट दरम्यान केरळमधील काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. देशाच्या उत्तरेकडील भागातही पावसाचा जोर राहील. १७ ते १९ ऑगस्ट दरम्यान जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये, १७ आणि १८ ऑगस्टला हिमाचल प्रदेशात, २१ ते २३ ऑगस्ट दरम्यान उत्तराखंडमध्ये पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय, १७ ते १९ ऑगस्टला पूर्व राजस्थान, १७, १८, २२ आणि २३ ऑगस्टला पंजाब, २२ आणि २३ ऑगस्टला हरियाणा, चंदीगड आणि दिल्लीत, तसेच २१ ते २३ ऑगस्ट दरम्यान उत्तर प्रदेशात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच हवामान विभागाने सर्व नागरिकांना पावसाच्या पार्श्वभूमीवर सतर्क राहण्याचे आणि आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

## विदर्भस्तरीय स्वातंत्र्य करंडक एकांकिका स्पर्धेचा निकाल जाहीर

# नागपूरच्या वि. प्र. नाटकाने पटकाविला प्रथम क्रमांक व करंडक



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. १७ :** सिद्धी गणेश प्रोडक्शन अकोला तर्फे स्थानिक प्रमिलाताई ओक हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय विदर्भस्तरीय स्वातंत्र्य करंडक एकांकिका स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. या स्पर्धेत नागपूर येथील साई श्रवण सामाजिक बहुउद्देशीय संस्थेने सादर केलेल्या वि. प्र. ( विद्यार्थी प्रतिनिधी ) या नाटकाने प्रथम क्रमांक मिळवून स्पर्धेचा करंडक व नाट्य तपस्वी जेष्ठ नाटककार स्व. राम जाधव यांच्या स्मृती प्रित्यर्थ देण्यात येणारा १५००० रुपयांचा पुरस्कार पटकाविला आहे.

नाटकाने द्वितीय क्रमांक मिळवून स्वातंत्र्य सेनानी स्व. मारुतीसा सावजी यांच्या स्मृती पित्यर्थ देण्यात येणारा १०००० रुपयांचा पुरस्कार पटकाविला आहे. अमरावती येथील श्री. नटराज शैक्षणिक सांस्कृतिक व क्रीडा मंडळाने सादर केलेल्या लोककलेच्या बैलाले पो या नाटकाने तृतीय क्रमांक पटकावून नट श्रेष्ठ निळू फुले आर्ट फाउंडेशन अकोला चे ज्येष्ठ नाट्यकलावंत रमेश थोरात यांच्या वतीने देण्यात येणारा ५००० रुपयांचा पुरस्कार मिळविला आहे.

येष्ठ नाट्यकर्मी प्रा. मधु जाधव, लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड चे अकोला जिल्हाध्यक्ष प्रदीप खाडे, लोकजागर संघटनेचे शेतकरी नेते प्रशांत गावंडे, ज्येष्ठ समाजसेवक चंद्रकांत सावजी, नाट्य दिग्दर्शक विष्णुपंत निंबाळकर यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. दोन दिवसात सादर करण्यात आलेल्या , २१ नाटकांचे परीक्षण टीव्ही व सिने कलावंत अपूर्वा चौधरी तसेच चैतन्य सरदेशपांडे यांनी केले

नाट्य महोत्सवाचे आयोजक सचिन गिरी यांनी प्रास्ताविक व आभार प्रदर्शन केले. स्व. शांताराम जी जामदार यांच्या स्मृती प्रित्यर्थ देण्यात येणारा सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता व अभिनेत्री पुरस्कार नवस या नाटीकेतील प्रणव कोरे व शुभांगी करुले यांना देण्यात आला. लेखक दिग्दर्शक स्व. दत्तात्रय उमाळे यांच्या स्मृती प्रित्यर्थ देण्यात येणारा उत्कृष्ट संहिता लिखाण पुरस्कार वि. प्र. नाटकाबद्दल तन्मय गंधे यांना देण्यात आला. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा प्रथम पुरस्कार तन्मय गंधे. द्वितीय पुरस्कार अभिषेक बेलनारवार यांना तर तृतीय पुरस्कार तुषार काकड यांना देण्यात आला. पुरुषांमधून सर्वोत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार तुषार काकड, रोहित घंगरकर सार्थक पांडे व सागर देशपांडे यांना देण्यात आला. स्त्रियांमधून सर्वोत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार प्रयोशनी ठाकूर, शरयू माने, व आकांक्षा भाके यांना देण्यात आला. सर्वोत्कृष्ट नेपथ्याकरिता शिवम मस्के, स्तवन गवारे, उमेश देशपांडे यांना तर प्रकाश योजने करिता प्रणव कोरे, वेद वळिवकर, दीपक नांदगावकर यांना पुरस्कार देण्यात आला. पार्श्व संगीता करिता स्तवन गवारे, सुशांत पाटील, गौरव जोंधळे कर, यांना तर अभिनयासाठी उत्तेजनार्थ पुरस्कार पूर्वा वाकोडे, रेणुका पुराणिक, ऐश्वर्या शिंदे, वैष्णवी राऊत, योगेश जाधव यांना देण्यात आला. सदर स्पर्धेच्या आयोजनाकरिता राजीव बियाणी, चंद्रकांत सावजी, डॉ. संतोष हुशे, रमाकांत खेतान, रमेश थोरात, शत्रुघ्न बिरकड, हरीश अलीमचंदानी, श्रीमती अनिता भालतिलक, पंकज देशमुख, गोविंद उमाळे, प्रशांत जामदार, अकोला अर्बन बँक यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन व निकाल वाचन उदय दाभाडे यांनी केले, या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाकरिता सचिन गिरी, महेश इंगळे, मंदार घेवारे, अक्षय पिंपळकर, अनिल कुलकर्णी, श्रीकांत गावंडे, गोविंद उमाळे आदींनी परिश्रम घेतले.

## राजराजेश्वर सेतूला बसविले कठडे; युवा सेनेच्या मागणीला अखेर यश



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १७ :** मागील वर्षी जुन्या शहरातील राजराजेश्वर पुलावरून ३१ /७/ २०२४ रोजी स्वर्गीय जय बोके पुलावर वाहून गेला होता. सदर पुलाला बॅरिकेट नसल्यामुळे सदर मुलाचा मृत्यू झाल्याचा आरोप शहरातील नागरिकांनी केला होता. याबाबतीत युवा सेना जिल्हा प्रमुख आस्तिक चव्हाण, शहर प्रमुख नितीन मिश्रा, उपशहर प्रमुख देवा गावंडे, उपशहर प्रमुख रुद्राक्ष राठोड व त्यांच्या सहकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व महानगरपालिका प्रशासन यांना वेळोवेळी निवेदने देऊन या सेतूवर कठडे लावण्यासाठी वेळोवेळी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यांच्या या मागणीला नुकतेच यश आले असून संबंधित यंत्रणेकडून सेतूवर कठडे बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे.

या निमित्ताने या पुलावर जो मुलगा वाहून गेला होता त्याचची आई- श्रद्धा बोके व सचिन बोके यांनी सेतूवर देवा गावंडे व त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार घेऊन आभार व्यक्त केले. मागच्या वर्षी राज राजेश्वर सेतू वर जो अपघात झाला होता. त्याच्यात एका बालकाचा नदीपत्रात वाहून मृत्यू झाला होता. पुलाला कठडे बसविल्यामुळे आता जुने शहरातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

## उपविभागीय अधिकारी पोलीस वैशाली मुळे यांचा सत्कार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुर्तीजापुर, दि. १७ :** तालुक्यात नव्याने रुजू झालेल्या उपविभागीय अधिकारी पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांचा शिवसेना बाळासाहेब उद्धव ठाकरे गटाचे वतीने सत्कार करण्यात आला. शिवसेना शहर प्रमुख व माजी ज्येष्ठ नगरसेवक विनायक गुल्हाने यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून शहरातील विविध विषयावर चर्चा केली.मुर्तीजापुर मध्ये शेवटच्या श्रावण सोमवारी मोठ्या प्रमाणात शिवभक्त मोठ्या उत्साहाच्या वातावरणात नागपूर येथून आपल्या खांद्यावर कावळे यात्रा घेऊन येतात आणि मोठे श्रद्धा ने त्या नदीचा जल आणून महादेवला प्रसन्न करण्यासाठी जलाभिषेक करतात मुर्तीजापुर उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांनी या ठिकाणी आपले प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाले की मुर्तीजापुर मध्ये पोलिसांचा कावड निमित्त सगळा बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी कोणीही शस्त्र केव्हा दारू पिऊन व अमली पदार्थाचा व्यसन करू नये. डीजे चा वापर टाळावा पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## अकोल्यात धनगर समाजातील युवकांचा वंचित बहुजन आघाडीत प्रवेश



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १७ :** जिल्ह्यातील धनगर समाजाचे युवा नेते आणि कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडीत प्रवेश करून पक्षाला बळकटी दिली आहे. यामध्ये धनगर समाज युवा समितीचे संस्थापक अध्यक्ष सुमित नवलकार आणि युवा सेना उपजिल्हा प्रमुख रविराज घोंगे यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश आहे.

या पक्ष प्रवेशावेळी उपसरपंच भगवन पातोंड, सरपंच शिवदास पांडे, प्रशांत पातोंड, अनिल बाहे, चेतन दिवणाले, तेजस कात्रे, सचिन कोगदे, संजय गव्हाळे, विठ्ठल नांदूरकर, अवधूत नागे, गणेश नागे, श्याम पातोंड, संदीप सुशीर, तेजराव शिंदे, गोपाल नवलकार, चिंतामण पातोंड, अमोल घोंगे, मार्तंड साबळे, मंगेश साबळे, सोनू भदे, अक्षय घटाळे, प्रमोद पातोंड, अमोल कात्रे, सुभाष कळंब, ऋत्विक दिवणाले आणि प्रफुल दिवणाले हे धनगर समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## गोवंश आणि त्यांचा चारा परत करा

## जयराम गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्टची मागणी

### ठाणेदार सह पशुधन मंत्र्यांना निवेदन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १७ :** दिनांक १२/८/२०२५ रोजी जयराम गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट हिंगणा म्हैसपूर यांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता सकाळी ५ वाजता पासुन शेत सर्व्हे नं. ३ जयराम गोरक्षण हिंगणा म्हैसपूर येथे केलेल्या कार्यवाहीमधील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळाजवळ गोरक्षणच्या मालकीचे २४० च्या जवळपास गोवंश कार्यवाहीमध्ये जप्त केले. ते गोवंश तात्काळ परत करा व दोन गोडावुनमध्ये असलेला ५ ते ६ लाख रूपयाचा चारा परत द्या. या मागणीचे निवेदन ठाणेदार सह पशुविकास मंत्री, पालकमंत्री यांना दिले आहे. शेत सर्व्हे नं.३ मध्ये जयराम गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष यांच्या आई वडिलांपासुन ३५ ते ४० वर्षापासुन वास्तव्य आहे त्यामध्येच अधिकृत जयराम गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट आहे. त्याची नोंद सुध्दा धर्मदाय आयुक्त व महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे आहे. जयराम गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट त्या जागेवरील परिपोषणाचा लाभ सुध्दा मिळाला आहे. प्रशासनाने केलेल्या आकस्मीत कार्यवाहीमूळे जयराम गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्टचे रेकॉर्ड सुध्दा तेथून गहाळ झालेले आहे. त्यामुळे २४० गोवंशाचा रेकॉर्ड नसल्यामुळे जयराम गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्टकडे सद्यस्थितीत २०१ गोवंशाचाच रेकॉर्ड उपलब्ध आहे. आपण केलेल्या कार्यवाहीमध्ये आपण गोरक्षणच्या मालकीचे राजमाता गोवंशाची कोठे विल्हेवाट लावली? त्याची सुध्दा कल्पना ही जयराम गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट गोरक्षणला दिलेली नाही. त्यावेळी माझी तब्येत खराब असल्यामुळे आपण मला घटना स्थळावरून ताब्यात घेतल्याने मी आपल्या समक्ष दवाखान्यात उपचार घेत असल्यामुळे मी आपणाकडे येऊ शकलो नाही व संबंधीतांना विचारू शकलो नाही. तसेच २००७ मध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा अधिकृत बसविलेला आहे. याची तुम्हाला जाणीव आहे.मला माझे गोवंश व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा मला परत करण्यात यावा व तेथील गोडावुन मधील गोवंशासाठी साठवलेला चारा मला परत करण्यात यावा.पुरुषोत्तम जयराम अहीर जयराम गोरक्षण (अध्यक्ष) यांनी मागणीचे निवेदन ठाणेदार व विविध मंत्र्यांना दिले आहे.

## ‘मतदान चोर, खुर्ची सोड’ :अकोल्यात काँग्रेसचा भव्य कॅन्डल मार्च मोर्चा




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. १७ :** मतदार यादीतील कथित फेरफार व गैरप्रकारांविरोधात अकोला महानगर काँग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवारी सायंकाळी भव्य कॅन्डल मार्च मोर्चाचे आयोजन करण्यात आले.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खा. राहुल गांधी यांनी अलीकडेच पत्रकार परिषदेतून मतदार यादीतील घोटाळ्याचा मुद्दा उचलून धरला होता. काँग्रेसने भारतीय जनता पक्षावर निवडणूक आयोगाच्या सहकार्याने मतदार यादीत फेरफार करून गैरमार्गाने सत्ता मिळवल्याचा आरोप केला आहे. या आंदोलनाचा एक भाग म्हणून अकोल्यात ''मतदान चोर, खुर्ची सोड'' या घोषणांसह मोर्चा काढण्यात आला. मोर्चाची सुरुवात स्वराज्य भवन येथून सायंकाळी सात वाजता झाली. कार्यकर्त्यांनी हातात मेणबत्त्या घेऊन शांततेत निदर्शने करत लोकशाही व पारदर्शक निवडणूक प्रक्रियेची मागणी केली. लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी लढा सुरू ठेवण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

या मोर्चात पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण, प्रकाश तायडे, महानगर अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील वानखेडे, अशोक अमानकर, प्रशांत पाचडे, अक्षय राऊत, महेंद्र गवई, पराग कांबळे, फजलू पहेलवान, कपिल रावदेव, मोहम्मद इरफान, मोईन खान, आशिष पांडे, फिरोज गवळी, गणेश कळसकर, दत्ता डिक्कर, सैय्यद शहजाद, पंकज वाढवे, सचिन तिडके, विनोद मराठे, हनिफ भाई, नवेद गवळी, असिफ खान, समीर बरतनवाले, रेहमान बाबू, प्रशांत प्रधान, संदेश वानखेडे, सुनिल वानखेडे, मो. नौशाद, तश्वर पटेल, अब्दुल्ला, वसिम खान, विजय देशमुख, सकावत शहा, अतुल अमानकर, अक्रम भाई आदींसह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**लोकोत्सव**

## न. प.च्या आवाहनाला प्रतिसाद, विद्यार्थ्यांनी साकारल्या संतांच्या वेशभूषा

# दिंड्यांच्या महासोहळ्यात श्री ज्ञानेश जयंती साजरी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**आकोट , दि. १७ :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार संपूर्ण महाराष्ट्रात गोकुळअष्टमीला विश्वमाऊली श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची यांची सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी ७५० वी जयंती आध्यात्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक उपक्रमांद्वारे संत नगरी आकोटमध्ये साजरी करण्यात आली.नगर परिषद, आकोट व श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर, आकोट यांच्या संयुक्त विद्यमाने श्रावण कृष्ण अष्टमी या तिथीवर शहरामध्ये गावोगावच्या दिंड्यांचा महासोहळा लक्षणीय ठरला. स्थानिक श्री संत नरसिंह महाराज समाधी मंदिर येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे व पादुकांचे विधिवत पूजन मुख्याधिकारी डॉ. नरेंद्र बेंबरे, श्री नरसिंह महाराज संस्थानचे अध्यक्ष सतीश आसरकर, श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष श्री वासुदेवराव महाराज महल्ले यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

तद्नंतर श्री माऊलींची प्रतिमा व पादुका रथामध्ये विराजमान झाल्या आणि भव्य मिरवणुकीला प्रारंभ झाला.पालखी सोहळ्यामध्ये पताकधारी, अब्दागिरीधारी, टाळकरी, विणेकरी, मृदंगाचार्य, माऊलींचा अश्व व पालखी रथ अशा राजभैभवी थाटात हा पालखी सोहळा मार्गस्थ झाला. यामध्ये श्री शिवाजी महाविद्यालय, आकोटचे एन. सी. सी. पथक, एन. एस. एस. पथक, विद्यार्थी प्राचार्य डॉक्टर सुनील पांडे व प्राध्यापक मंडळी, श्री शिवाजी विद्यालय, आकोटचे विद्यार्थी, मुख्याध्यापक संजय वालसिंगे व शिक्षक मंडळी, श्री शिवाजी विद्यालय आसेगाव बाजारचे मुख्याध्यापक अनंत कुलट, श्री शिवाजी विद्यालय, कुटासाचे पर्यवेक्षक



राजेश सावरकर, भाऊसाहेब पोटे विद्यालय, लालबहादूर शास्त्री कॉन्व्हेंट येथील विद्यार्थी सहभागी होती. यांसोबतच अनेक विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत सोपान काका, संत मुक्ताबाई, संत नामदेव महाराज, संत चांगदेव महाराज, जगद्गुरु संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, आदी वेशभूषा साकारल्या होत्या.पालखी मार्गाने श्री संत नरसिंह महाराज मंदिर, गवळीपुरा चौक, श्री संत वासुदेव महाराज निवासस्थान, पोलीस स्टेशन, छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक, नगरपरिषद मुख्यालय, सोनू चौक, जयस्तंभ चौक, याकूब पटेल चौक, शौकत अली चौक, राणी लक्ष्मीबाई चौक, पान अटाई, बापू बळीराम चौक, महात्मा फुले चौक, नंदिपेठ, या पालखी मार्गाने शहरातील माजी नगरसेवक, विविध संस्थेचे व राजकीय पक्षाचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक यांनी ठिकठिकाणी श्री माऊलींच्या पालखी रथाचे मनोभावे पूजन, पुष्पवृष्टी, चहा, फराळ वाटप करून मनोभावे स्वागत केले. महाआरती होऊन मान्यवरांचा सत्कार समारंभ संपन्न झाला.यामध्ये माजी नगरसेवक दिलीप बोचे, मंगेश लोणकर, रवींद्र केवटी, विवेक बोचे,राजेश रावणकार, विजय ढेपे, प्रतीक गोरे, गोपाल मोहोड, यांसह नगरपरिषदेचे विजय भोंडे, दिनेश ठेलकर, संजय बेलुरकर, ऋषी तायडे, चेतन पटके, राजु चापके, अब्दुल तन्वीर, सुनील तरोळे, पोलीस प्रशासन विभाग, आरोग्य विभाग, तहसील विभाग येथील कर्मचारी मंडळी उपस्थित होती. त्याचप्रमाणे श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे महादेवराव ठाकरे, पुरुषोत्तम लाजूरकर, रवींद्र वानखडे, अशोकराव पाचडे, गजाननराव चोपडे, अनिल कोरपे, गजाननराव दुधाट, पुरुषोत्तम मोहोकार, मध्यस्थी मंडळ अध्यक्ष बाळासाहेब फोकमारे व संचालक मंडळ, यांसह व्यवस्थापक अमोल मानकर, दिलीप कुलट,सौ लताताई सुरेंद्र चिकटे व महिला मंडळ ,आदी मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास महाराज मानकर व उमेश महाराज मोहोकार यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.साहेबराव मंगळे यांनी केले.

**आजचा दिंडी सोहळा खऱ्या अर्थाने लोकोत्सव- डॉ.नरेंद्र बेंबरे**

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त आकोट शहरामध्ये निघालेली पालखी सोहळा मिरवणूक खऱ्या अर्थाने लोकोत्सव ठरली आहे. याकरिता सर्वांचे सहकार्य बहुमोलाचे आहे. विशेषत: श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोट यांनी घेतलेले परिश्रम महत्त्वाचे आहेत. ठिकठिकाणी सर्वांनी केलेले स्वागत व दिलेला प्रतिसाद प्रभावित करणारा आहे. आज आम्हाला संतांची सेवा करण्याचे भाग्य मिळाले, असे भावपूर्ण उद्गार नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. नरेंद्र बेंबरे यांनी व्यक्त केले.

महत्त्वाचे

### सिएटलच्या स्पेस नीडल वर पहिल्यांदाच फडकला भारतीय तिरंगा



**वॉशिंग्टन :** भारताच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त अमेरिकेतील सिएटल शहरात एक ऐतिहासिक घटना घडली. शहराच्या सुप्रसिद्ध स्पेस नीडल इमारतीवर पहिल्यांदाच भारतीय तिरंगा फडकावण्यात आला. १९६२ मध्ये वर्ल्ड फेअरच्या निमित्ताने बांधण्यात आलेली ही इमारत सिएटलच्या आकाशरेषेचे प्रतिक मानली जाते आणि अमेरिका-पॅसिफिक उत्तर-पश्चिम भागाच्या तंत्रज्ञानाधिष्ठित प्रगतीचं प्रतीकही आहे.या ऐतिहासिक उपक्रमात भारताचे सिएटलमधील कॉन्सुल जनरल, सिएटलचे महापौर ब्रूस हॅरेल, तसेच शहरातील अनेक मान्यवर आणि अधिकारी सहभागी झाले. भारतीय-अमेरिकन समुदायाच्या तांत्रिक आणि सामाजिक योगदानाची दखल घेत ही घटना साजरी करण्यात आली.

### चीनकडून पाकिस्तानला तिसरी हँगर पाणबुडी हस्तांतरित



**बीजिंग** चीनकडून पाकिस्तानला हँगर श्रेणीची पाणबुडी हस्तांतरित करण्यात आली आहे. चीनमधील हुबेई प्रांतात आयोजित समारंभात ही पाणबुडी हस्तांतरित करण्यात आली. पाकिस्तानचे नौदल सामर्थ्य वाढवण्याच्या उद्देशाने चीनकडून पाकिस्तानला या पाणबुड्या देण्यात येत आहेत. चीनकडून पाकिस्तानला देण्यात येणार्या अशा ८ पाणबुड्यांपैकी ही तिसरी पाणबुडी आहे. यापुर्वी मार्च महिन्यात दुसरी पाणबुडी पाकिस्तानला दिली गेली होती. चीनकडून गेल्या काही वर्षात या पाणबुड्यांव्यतिरिक्त काही विनाशिका देखील दिल्या गेल्या आहेत. चीनने अरबी समुद्रामध्ये आपल्या नौदलाचा प्रभाव वाढवण्यास गेल्या काही वर्षांपासून सुरुवात केली आहे. चीनने पाकिस्तानमधील बलुचिस्तान प्रांतातील ग्वादर बंदर देखील विकसित केले आहे.

### पोलीस उपायुक्तांच्या गाडीला मद्यपी चालकाची धडक

**पुणे :** मुंढवा भागात वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांच्या गाडीला मद्यपी मोटारचालकाने धडक दिली. अपघातात दोन पोलीस कर्मचारी जखमी झाले. सुदैवाने या घटनेत जाधव यांना दुखापत झाली नाही. या प्रकरणी मुंढवा पोलिसांनी मद्यपी मोटारचालकाला अटक केली.समदीप मनमोहन सिंग (वय ३०, रा. शुभ इवान सोसायटी, केशवनगर, मुंढवा, मूळ रा. हरयाणा) याला अटक करण्यात आली. पोलीस नाईक शरद पवार (वय ३८, रा. हिंद कॉलनी, भेकराईनगर, हडपसर) यांनी मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंढव्यातील कुंभारवाडा परिसरात श्री गणेश मूर्ती खरेदीसाठी शुक्रवारी (१५ ऑगस्ट) गर्दी झाली होती. या भागाची पाहणी करण्यासाठी पोलीस उपायुक्त हिंमत जाधव सायंकाळी तेथे आले होते. पोलीस उपायुक्तांच्या गाडीवर तानाजी कोंढाळकर वाहनचालक होते, तसेच त्यांच्याबरोबर ऑपरेटर शरद पवार होते.पाहणी करून पोलीस उपायुक्त जाधव रात्री सव्वादहाच्या सुमारास निघाले होते. त्या वेळी मद्यधुंद अवस्थेतील मोटारचालक समदीप सिंग भरधाव निघाला होता.

## ८५ ड्रोन युक्रेनमध्ये घुसली, क्षेपणास्त्राचाही मारा

# अलास्का येथे पुतीन-ट्रम्प भेटीनंतर काही तासातच रशियाचा युक्रेनवर मोठा हवाई हल्ला

**मॉस्को : दि.१७ वृत्तसंस्था**

रशियाने पुन्हा एकदा यूक्रेनवर मोठा हवाई हल्ला चढवत, ८५ शाहेद प्रकारचे ड्रोन आणि एक इस्कंदर- बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागले. हा हल्ला रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात अलास्का येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर केवळ काही तासांतच करण्यात आला.

यूक्रेनच्या हवाई दलाच्या माहितीनुसार, हा हल्ला १५ ऑगस्टच्या संध्याकाळपासून १६ ऑगस्टच्या पहाटेपर्यंत सुरू होता. युक्रेनमधील अनेक भाग, विशेषतः सीमेवरच्या संघर्षप्रवण भागांना लक्ष्य करण्यात आले.

यूक्रेनने सांगितले की त्यांच्या हवाई संरक्षण यंत्रणेने ८५ पैकी ६१ ड्रोन पाडण्यात यश मिळवले. मात्र काही ड्रोन टाळता आले नाहीत आणि त्यांनी विविध भागांमध्ये नुकसान केले.



या हवाई हल्ल्याबरोबरच रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने डोनेत्स्कमधील कोलोदियाझी गाव आणि डनिप्रोपेत्रोव्स्क भागातील वोरोने गावाचा ताबा घेतल्याचा दावा केला आहे. मात्र, युक्रेनशी संबंधित निरीक्षण संस्थांनी सांगितले की रशियन सैन्य अजूनही वोरोने गावाच्या काही अंतरावर आहे.

पुतिन-ट्रम्प शिखर परिषद निष्फळ

हा हल्ला अशा वेळी झाला जेव्हा अलास्कामध्ये पुतिन आणि ट्रम्प यांच्यात युध्द थांबवण्यासाठीची बैठक झाली होती. या बैठकीत दोन्ही नेत्यांनी शांततेकडे वाटचाल करण्याची इच्छा व्यक्त केली, मात्र कोणताही ठोस तह किंवा युद्धविराम झाला नाही.

गुप्त बैठकीच्या तपशीलांची माहिती एका हॉटेलच्या प्रिंटरवर सापडल्याने राजनैतिक वर्तुळात खळबळ उडाली होती, ज्यामध्ये मेनू, भेटवस्तूंची माहिती आणि जागांची यादी होती.

फेब्रुवारी २०२२ मध्ये सुरू झालेल्या रशिया-युक्रेन युद्धाला आता तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. या काळात हजारो लोकांचा मृत्यू झाला असून, लाखो नागरिकांना स्थलांतर करावे लागले आहे. रशियाचे अजूनही पूर्व आणि दक्षिण युक्रेनमधील मोठ्या भूभागांवर नियंत्रण आहे.

## जगदीप धनखड यांच्यानंतर माजी निवडणूक आयुक्त राजीव कुमारही 'बेपत्ता'?

### संजय राऊत यांचा खळबळजनक दावा



**नवी दिल्ली : दि.१७ वृत्तसंस्था**

माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी २१ जुलै रोजी अचानक राजीनामा दिला. प्रकृतीच्या कारणास्तव राजीनामा दिल्याचे त्यांनी सांगितले गेले. अद्याप नवीन उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवारही जाहीर झालेले नाहीत, तसेच राजीनामा दिल्यापासून धनखड सार्वजनिक मंचावर दिसले नाहीत. तसेच आता माजी मुख्य निवडणूक आयुक्तही बेपत्ता झाले असल्याचे शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत म्हणाले आहेत. आज माध्यमांशी बोलत असताना ते म्हणाले की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राजीव कुमार मुख्य निवडणूक आयुक्त होते. ज्यांच्या मदतीने नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी

माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड बेपत्ता झाले तसे तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार कुठे आहेत? हा माझा प्रश्न आहे, असे संजय राऊत म्हणाले. ''राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर प्रश्न उपस्थित करायला सुरुवात केल्यानंतर त्याचे उत्तर राजीव कुमार यांनी द्यायला हवे होते.

### म्यानमार गृहयुद्ध भीषण वळणावर; लढाऊ विमानांच्या हल्ल्यात निष्पाप नागरिकांचा बळी



**म्यानमार : दि.१७ वृत्तसंस्था**

म्यानमारमध्ये लष्करी राजवटीचे अत्याचार दिवसेंदिवस तीव्र होत चालले आहेत. देशाच्या उत्तरेतील मोगोक शहरात सैन्याने केलेल्या हवाई हल्ल्यात गर्भवती महिला, निरपराध नागरिक, बौद्ध भिक्षू यांच्यासह किमान २१ जणांचा मृत्यू झाला. या घटनेत १५ घरे आणि धार्मिक स्थळांचाही चुराडा झाला असून, मृतांचा आकडा प्रत्यक्षात आणखी जास्त असल्याचा स्थानिकांचा दावा आहे.

फेब्रुवारी २०२१ मध्ये आंग सान सू की यांच्या लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या सरकारकडून सत्ता काबीज केल्यानंतर म्यानमारमध्ये भीषण अराजकता माजली आहे. शांततापूर्ण निदर्शने बळाचा वापर करून दडपल्याने हजारो नागरिकांनी शस्त्र उचलली आणि देशाचे गृहयुद्धात रूपांतर झाले.

या पार्श्वभूमीवर लष्कराने विरोधी गट व सामान्य जनता यांच्यातील सीमारेषा पुसून टाकली आहे. मंडालेपासून सुमारे ११५ किमी अंतरावर असलेल्या मोगोकच्या श्वेगु वॉर्ड परिसरात गुरुवारी रात्री ८.३० वाजता लढाऊ विमानातून बॉम्बवर्षाव करण्यात आला. ताआंग नॅशनल लिबरेशन आर्मी या वांशिक गटाने सांगितले की, या हल्ल्यात केवळ लढवय्येच नव्हे तर नागरिक आणि महिलांचा मोठा बळी गेला. स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार मृतांची संख्या ३० च्या पुढे असण्याची शक्यता आहे.

### भारतात ग्रामीण भागात जन्मत: मृत्यूचे प्रमाण आजही चिंताजनक!

**मुंबई: दि.१७ वृत्तसंस्था**

भारतातील आरोग्य सेवेच्या दर्जाचा विचार करताना गरोदर माता तसेच नवजात बालकांना मिळणारी आरोग्यसेवा ही प्राधान्याने लक्षात घेतली जाते. दुर्दैवाने आजह ग्रामीण भागात आरोग्यसेवा पुरेशी सक्षम नसल्यामुळे बाळ जन्मता मृतावस्थेत येण्याचे प्रमाण म्हणावे तितके कमी झालेले नाही. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वे क्षण (एनएफएचएस-५), सॅम्पल रजिस्ट्रेशन सिस्टिम (एसआरएस) तसेच जागतिक आरोग्य संघटना यांच्या आकडेवारीनुसार गेल्या पाच वर्षांत मृतजन्माचे प्रमाण काही प्रमाणात घटले असले तरी ग्रामीण भागातील आरोग्यसेवा, प्रसूतिपूर्व तपासण्या आणि तातडीच्या वैद्यकीय हस्तक्षेपातील उणीवा यामुळे अपेक्षित सुधारणा होताना दिसत नाही. परिणामी जागतिक आरोग्य संघटनेने निश्चित केलेल्या जन्ममृत्यू दराच्या पातळीपासून भारत अजूनही बराच दूर आहे.गर्भधारणेच्या २८ आठवड्यांनंतर गर्भातील बाळ मृतावस्थेत जन्माला येणे याला 'स्टीलबर्थ' किंवा मृतजन्म म्हटले जाते.

## बिहारमध्ये 'व्होटर अधिकार यात्रा'; विधानसभा निवडणुकीसाठी राहुल गांधींचे बिगुल

**सासाराम (बिहार) : दि.१७ वृत्तसंस्था**

पाटणापासून तीन तासांच्या अंतरावर, दक्षिण बिहारच्या सासाराममधून काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी रविवारी विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजवतील. सासारामपासून राहुल गांधींची 'व्होटर अधिकार यात्रा' सुरू होईल. या यात्रेच्या निमित्ताने केंद्रीय निवडणूक आयोगाला आणखी कोंडीत पकडण्याची रणनिती काँग्रेसने आखल्याचे मानले जात आहे. यात्रेमध्ये राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव हेही सहभागी होणार असल्याची माहिती काँग्रेस नेत्यांनी दिली.

केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर)



मोहिमेअंतर्गत जाहीर केलेल्या मसुदा मतदारयाद्यांमधून बिहारमधील सुमारे ६५ लाख मतदारांना मतदार यादीतून वगळले आहे. या मोहिमेमुळे विरोधक आणि निवडणूक आयोग यांच्यातील तणाव वाढत असताना बिहारमधून राहुल गांधी 'व्होटर अधिकार यात्रा' काढत आहेत. त्यांची ही तिसरी यात्रा आहे.

या आधी 'भारत जोडो यात्रा' ही संपूर्ण दक्षिण-उत्तर भारत पदयात्रेने राहुल गांधींनी पालथा घातला होता. त्यानंतर 'भारत जोडो न्याय यात्रा' पूर्व-पश्चिम काढली होती. या दोन्ही यात्रांचा निवडणुकांशी काहीही संबंध नव्हता. पण, ही यात्रा थेट बिहारच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकणारी असेल.

बिहारमधील २० जिल्ह्यांमधून राहुल गांधींची ही यात्रा जाईल. यात्रेचा निश्चित केलेल्या या मार्गावरील प्रत्येक जिल्ह्यामध्ये काँग्रेसचा किमान एक तरी उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरेल असे मानले जात आहे. या उमेदवारांना जिंकण्याची ही सर्वात जास्त संधी असेल. गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने ७० जागा लढवून फक्त १९ जागा जिंकल्या होत्या.यावेळी काँग्रेस ५०-५५ जागा लढवण्याची शक्यता आहे. या जागाही काँग्रेसला जिकण्याची संधी अधिक असेल हे पाहूनच पदरात पाडून घेतल्या जातील. यात्रेतून या संभाव्य जागांवर काँग्रेसला बळ मिळेल असे मानले जात आहे.

'एसआयआर'मुळे मतदारांचा हक्क हिरावून घेतला जात आहे, असा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते पवन खेरा यांनी केला आहे.

सासाराम ही माजी उपपंतप्रधान बाबू जगजीवनराम यांची भूमी. इथून 'व्होटर अधिकार यात्रा' सुरू करून ओबीसी व अतिमागास समाजाला चुचकारण्याचाही काँग्रेसचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे. रविवारी मोठ्या जाहीर सभेने यात्रेची सुरुवात होईल. या वेळी महागठबंधनचे घटक पक्ष उपस्थित राहतील.

❑ **ही यात्रा पूर्वेकडे पूर्णिया, उत्तरेकडील सीतामढी, पश्चिमेकडील चंपारण आणि दक्षिणेस छपरा असा प्रवास करेल. १ सप्टेंबर रोजी पाटणा मध्ये जाहीर सभा घेऊन ही यात्रा संपेल. यात्रा संमिश्र स्वरुपाची असेल. सकाळच्या सत्रात राहुल गांधी वाहनाने प्रवास करतील व संध्याकाळी पदयात्रा काढली जाईल.**

**१६ दिवस, २०पेक्षा अधिक जिल्हे, १३००पेक्षा जास्त किलोमीटर अंतर. आम्ही 'व्होटर अधिकार यात्रे'सह जनतेत येत आहोत. एक व्यक्ती, एक मत या लोकशाहीतीली सर्वात मूलभूत हक्काटे संरक्षण करण्यासाठी हा लढा आहे. संविधान वाचवण्यासाठी आमच्याबरोबर बिहारमध्ये सहभागी व्हा.**

## एल्विश यादवच्या घरावर अंदाधुंद गोळीबार, हल्लेखोर फरार

**गुरुग्राम: दि.१७ वृत्तसंस्था**

वादग्रस्त युट्यूबर आणि बिग बॉस विजेता एल्विश यादवच्या गुरुग्राम येथील घराबाहेर आज पहाटे अज्ञातांनी अंदाधुंद गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, पोलीस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना आज पहाटे साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास घडली. दुचाकीवरून आलेल्या तीन हल्लेखोरांनी सेक्टर ५७ मधील एल्विश यादवच्या घरावर अंदाजे २४ हुन अधिक



गोळ्या झाडल्या आणि घटनास्थळावरून पसार झाले. या गोळीबारात घराच्या तळमजल्याला आणि पहिल्या मजल्याला गोळ्या लागल्याच्या खुणा स्पष्ट दिसत आहेत. घटनेच्या वेळी एल्विश यादव घरी नव्हता. तो घराच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर राहतो. मात्र, गोळीबार झाला तेव्हा त्याचे काही कुटुंबीय घरातच होते. सुदैवाने या हल्ल्यात कोणीही जखमी झालेले नाही.

घटनेची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. यादव कुटुंबाकडून तक्रार दाखल झाल्यानंतर कायदेशीर कारवाई सुरू करून पुढील तपास केला जाईल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. एल्विशच्या नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, त्याला या घटनेपूर्वी कोणत्याही प्रकारची धमकी मिळाली नव्हती. एल्विश यादव सध्या हरियाणाच्या बाहेर असल्याचे समजते. या हल्ल्यामागे नेमका कोणाचा हात आहे आणि हल्ल्याचा हेतू काय होता, याचा पोलीस शोध घेत आहेत.



## प्रवासी रेल्वे रुळावरून घसरल्याने १ जण ठार; २० हून अधिक जखमी

### पाकिस्तानात आणखी एक अपघात

**इस्लामाबाद : दि.१७ वृत्तसंस्था**

एकीकडे पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वामध्ये मुसळधार पाऊस आणि पुराने हाहा:कार माजवला आहे. तर दुसरीकडे पाकिस्तानमध्ये पुन्हा एक भीषण रेल्वे अपघात घडला आहे. रविवारी सकाळी पाकिस्तानच्या लाहोरमध्ये प्रवासी ट्रेनचे ४ डबे रुळावरुन घसरले.

या भीषण अपघातात एका प्रवाशाच्या मृत्यू तर २० जण जखमी झाले आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरु असून यातील २ जणांची प्रकृती गंभीर आहे. पाकिस्तानच्या लाहोरमध्ये प्रवाशांनी भरलेली एक ट्रेन लोधरान रेल्वे स्थानकाजवळ रुळावरुन घसरली.ही ट्रेन पेशावरहून कराचीला रवाना झाली होता. यावेळी हा अपघात घडला. घटनेची माहिती मिळताच बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. आतापर्यंत १९ जणांना वाचवण्यात आले आहे. अपघातानंतर पेशावर-कराचीचा हा मार्ग काही तासांसाठी बंद होता. सध्या रेल्वे वाहतूक पुन्हा सुरु करण्यात आली आहे. यापूर्वी देखील पाकिस्तानमध्ये अनेक रेल्वे अपघात घडले आहे. पाकिस्तानच्या लाहोरमध्ये इस्लामाबाद एक्सप्रेसचा रेल्वे रुळावरुन घसरुन अपघात झाला होता. यामध्ये ३० लोक जखणी झाल्याचे वृत्त मिळाले होते. तसेच गेल्या सोमवारी मुसा पाक एक्सप्रेसचाही अपघात झाला होता. या अपघातात ५ प्रवासी जखमी झाले होते.

**पाकिस्तानमध्ये पावसाचा हाहा:कार**

याच वेळी पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतात मुसळधार पावसामुळे आणि पूरामुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक लोक पूरात वाहून गेले आहेत. तसेच गेल्या ४८ तासांत मृतांचा आकडा ३२७वर पोहोचला आहे. यामुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पाकिस्तानच्या बुनेर, शांगला, मानसेहरा, बाजौर, स्वात, बट्टाग्राम, लोअर दिर, अबोटाबाद हे जिल्हे प्रभावित झाले आहेत. पाकव्याप्त काश्मीरमध्येही () पाऊस आणि पूराममुळे प्रचंड नुकसान झाले आहे. पावसामुळे अनेक घरे, वाहने, शाळा उद्ध्वस्त झाल्या आहेत.

अभिनंदनीय | दिल्ली विमानतळावर जोरदार स्वागत

# अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचे मायभूमीत आगमन

**नवी दिल्ली : दि.१७ वृत्तसंस्था**

भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन आणि नासाच्या 'ॲक्झिअम-४' या यशस्वी अंतराळ मोहिमेचे पायलट शुभांशु शुक्ला मायभूमीत परतले आहे. त्यांचे आज पहाटे अमेरिकेतून भारतात आगमन झाले. दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन होताच केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी त्यांचे स्वागत केले. शुभांशु शुक्ला यांच्या स्वागतासाठी विमानतळावर ढोल-ताशा वाजवले गेले आणि लोकांनी तिरंगा झेंडा फडकवला. तसेच उपस्थितांनी 'भारत माता की जय'च्या घोषणाही दिल्या. शुभांशु यांच्यासोबत भारताच्या महत्त्वाकांक्षी 'गगनयान' मोहिमेसाठी निवडलेले दुसरे अंतराळवीर ग्रुप कॅप्टन प्रशांत बाळकृष्णन नायर हे देखील भारतात परतले.

समोर आलेल्या माहितीनुसार, शुभांशु शुक्ला



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याची शक्यता आहे, त्यानंतर ते आपल्या मूळ गावी लखनऊला रवाना होतील. २२-२३ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय अवकाश दिन समारोहात सहभागी होण्यासाठी ते पुन्हा दिल्लीत परततील. २३ ऑगस्ट रोजी दुसऱ्या राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त ते देशवासीयांशी संवाद साधू शकतात.

सोमवारी लोकसभेत विकसित भारत-२०४७ च्या उद्दिष्टांतर्गत अवकाश कार्यक्रमाच्या भूमिकेवर विशेष चर्चा आयोजित केली जाईल. यावेळी शुभांशु शुक्ला यांच्या आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्राचा प्रवास, प्रयोगां आणि अवकाश क्षेत्रातील भारताच्या प्रगतीवर चर्चा होऊ शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात शुक्ला यांचा उल्लेख केला होता.

भारतात परतताना शुक्ला यांनी सोशल मीडियावर फोटो शेअर करत लिहिले ,''अमेरिकेत मिळालेल्या मित्रांना आणि कुटुंबाला सोडत असल्याचे दु:ख आहे, पण भारतात परतून आपल्या कुटुंबियांना आणि देशवासियांना भेटण्याचा आनंदही आहे. माझ्या कमांडर पेगी व्हिट्सन म्हणतात अंतराळ प्रवासात बदल हाच स्थायी आहे, आणि जीवनातही हेच सत्य आहे.'' सोबत त्यांनी 'स्वदेस' चित्रपटातील 'यूँ ही चला चल राही' या गीताच्या ओळी लिहित आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## आधारच आता निराधार!

बिहारमध्ये 'एसआरआय' म्हणजेच मतदार यादीच्या विशेष सखोल फेरतपासणीचा मुद्दा गेले बरेच दिवस तापलेला आहे. लाखो मतदारांना मतदार यादीतून वगळले जात असल्याचा आरोप होत आहे. याच प्रश्नावरून राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशाराही दिला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'एसआरआय'बाबत आयोगावर हल्लाबोल केला होता; पण मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध झाला असून काँग्रेस, राजद व अन्य कोणत्याही पक्षाने यादीतून नावे काढण्याबाबत व काही नावांचा त्यात समावेश करण्याबाबत निवडणूक आयोगाकडे कोणत्याही हरकती व सूचना पाठवलेल्या नाहीत. निवडणूक झाल्यानंतर आरोपबाजी करण्याऐवजी ती होण्यापूर्वीच अधिकृतपणे ज्या काही शंका असतील, त्या आयोगाकडे अर्जाद्वारे उपस्थित केल्या पाहिजेत; पण १ ऑगस्ट रोजी मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध होऊन आता जवळपास दोन आठवडे होत आले, तरीही राजकीय पक्षांनी याबाबत हालचाल केलेली नाही. 'मतदान चोरी झाली, निवडणूक आयोग केंद्र सरकारचे बाहुले बनला आहे' अशी राळ उठविणाऱ्या विरोधी पक्षांना केवळ राजकारण करायचे आहे की निवडणूक प्रक्रियेत सुधारणा घडवून आणायच्या आहेत, असा प्रश्न निर्माण होतो. आता नागरिकांचा मतदार यादीत समावेश करण्याचा आणि बिगर नागरिकांना मतदार यादीतून वगळण्याचा निर्णय निवडणूक आयोगाला घेता येईल, असा कौल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे याबद्दलचा संभ्रम दूर होईल. त्याचवेळी बिहारच्या 'एसआयआर'मध्ये आधार आणि मतदार ओळखपत्र हे नागरिकत्वाचा निर्णय पुरावा म्हणून न स्वीकारण्याच्या आयोगाच्या भूमिकेवरही न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. 'एसआयआर'चा वाद मुख्यत्वे अविश्वासातून उद्भवला आहे, असे महत्त्वाचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. मतदार यादीत समावेश होण्यासाठी ज्या कागदपत्रांची यादी निवडणूक आयोगाने दिली आहे, त्यामध्ये आधार आणि मतदार ओळखपत्राचा समावेश नाही. या मुद्द्याच्या अनुषंगाने आयोगाला मतदारांचे नागरिकत्व ठरविण्याचा अधिकार नाही, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला होता; मात्र आधार क्रमांक हा नागरिकत्वाचा पुरावा नाही, असे आधार कायद्यामध्येच नमूद केले, हे याचिकाकर्त्यांना ठाऊक नसावे, हे एक आश्चर्यच! संसदेने नागरिकत्वासंबंधी कायदा केल्यानंतर 'नागरिक' म्हणून मान्यता मिळालेल्या व्यक्तीचा मतदार यादीत समावेश करणे किंवा तशी मान्यता न मिळालेल्या व्यक्तींचा यादीमध्ये समावेश न करणे वा त्यांना वगळणे, यासंबंधीचा निर्णय शेवटी आयोगानेच घ्यायचा आहे. सर्वोच्च न्यायालयाची ही भूमिका तर्कसंगतच आहे. आधार आणि मतदार ओळखपत्रांशिवाय अन्य कागदपत्रे दाखल करणे नागरिकांसाठी कठीण आहे, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील कपिल सिब्बल यांनी केला होता. त्यावर बिहारमध्ये कोणाकडेही जन्म प्रमाणपत्र आणि अन्य कागदपत्रे नाहीत, हे सरसकट विधान आहे, याकडे न्यायमूर्तींनी सार्थपणे लक्ष वेधले. तसेच ७ कोटी ९० लाख मतदारांपैकी ७ कोटी २४ लाख मतदारांनी 'एसआयआर'ला प्रतिसाद दिला. अशावेळी १ कोटी मतदार वगळले गेल्याचा आरोपच मोडीत निघतो, असे ताशेरेही न्यायालयाने मारले. 'एसआयआर'ला मतदार प्रतिसाद देणार नाहीत. याचे कारण अनेक जण कामासाठी बिहारच्या बाहेर आहेत, अशी भीती व्यक्त केली जात होती; पण प्रतिसादावरून ती भीती व्यर्थ असल्याचे सिद्ध झाले. त्याचवेळी मुंबई उच्च न्यायालयानेही एका प्रकरणात महत्त्वपूर्ण निर्णय दिला. बाबू अब्दुल रौफ सरदार हा बांगला देशी नागरिक भारतात बेकायदा मार्गाने घुसला होता. त्याच्याकडे पासपोर्ट किंवा ट्रॅव्हल व्हिसा नव्हता. त्याने फसवणूक करून आधार कार्ड, पॅन कार्ड आणि मतदान ओळखपत्र मिळविले, असा आरोप आहे. हे प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर केवळ आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा मतदान ओळखपत्र बाळगल्याने एखादी व्यक्ती भारताची नागरिक ठरत नाही, असे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने बांगला देशातून बेकायदा मार्गाने आलेल्या बाबू सरदारची जामिनावर सुटका करण्यास नकार दिला. संबंधित व्यक्तीवर बनावट कागदपत्रांच्या आधारे १० वर्षे भारतात वास्तव्य केल्याचा आरोप आहे. नागरिकत्व कायद्यातील तरतुदींमध्ये भारताचा नागरिक कोण असू शकतो आणि नागरिकत्व कसे मिळवता येते, हे नमूद केले आहे. बिहारच्या 'एसआयआर'मध्ये आधार आणि मतदार ओळखपत्र हे नागरिकत्वाचा निर्णय पुरावा म्हणून न स्वीकारण्याच्या आयोगाच्या भूमिकेवरही न्यायालयाने शिक्कामोर्तब केल्यामुळे 'एसआयआर'चा वाद मुख्यत्वे अविश्वासातून उद्भवला आहे, असे महत्त्वाचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. मतदार यादीत समावेश होण्यासाठी ज्या कागदपत्रांची यादी निवडणूक आयोगाने दिली आहे, त्यामध्ये आधार आणि मतदार ओळखपत्राचा समावेश नाही. कारण हे दोन्हीही बनावट पद्धतीने मिळविता येतात हे आता सिद्ध झाले आहे त्यामुळे आतापर्यंत भारतीय नागरिक असल्याचा ग्राहह्य् मानला जाणारा पुरावा अर्थात आधारच आता भारतात निराधार झाला असल्याचे एकंदरीत चित्र आहे.

# वसंतराव नाईक : शेतकऱ्यांचा राजा, हरितक्रांतीचे प्रणेते



### कृषिजगत

जयंत राठोड
(मो.9850804370)





आज १८ ऑगस्ट. हा दिवस महाराष्ट्राचे भाग्यविधाते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची पुण्यतिथी आहे. ते महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदी सर्वाधिक काळ होते. त्यांनीच महाराष्ट्राला कृषी क्षेत्रात स्वयंपूर्णतेची नवी दिशा दाखवली. त्यांचे कर्तृत्व इतके महान होते की, शरद पवार यांनी त्यांचा उल्लेख 'कर्तृत्वाचा कळस' असा केला आहे. यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्राचा पाया घातला. तर नाईक साहेबांनी त्यावर विकासाचा कळस चढविला. त्यांनी शेती आणि उद्योग या दोन चाकांवर राज्याच्या विकासाचा गाडा यशस्वीपणे हाकला. त्यांचे एकच ध्येय होते. 'शेती टिकली, तर देश टिकेल,' असे ते म्हणत. त्यांच्याच काळात कोराडीसारखे वीज प्रकल्प आणि जायकवाडीसारखी धरणे उभी राहिली. यामुळे राज्याच्या विकासाला मोठी गती मिळाली. नाईकसाहेब शेतकऱ्यांचे खरे कैवारी होते. त्यांनी राज्यात संकरित वाणांचा पाया घातला. हायब्रीड ज्वारीसाठी त्यांनी अवघा महाराष्ट्र पिंजून काढला. कापसाला योग्य भाव मिळावा म्हणून 'एकाधिकार कापूस खरेदी योजना'केली. त्यांचे शब्द शेतकऱ्यांसाठी मोलाचे होते. ते म्हणायचे, 'शेती ओलीताखाली आणा. पावसाचे पाणी शेतातच जिरवा. प्रसंगी घामाने शेती भिजवा, पण तिला पाण्याखाली आणा!' त्यांनी राज्यात चार कृषी विद्यापीठे स्थापन केली. या विद्यापीठामुळे संशोधनाला चालना मिळाली. 'नांदेड ४४' सारखे वाण देशभर प्रसिद्ध झाले. शेतकऱ्यांना चांगले बियाणे मिळावे, यासाठी त्यांनी 'महाबीज'ची स्थापना केली. संकटाच्या काळात नाईकसाहेब हिमालयासारखे स्थिर आणि अढळ राहिले. मग तो कोयनेचा भूकंप असो वा १९७२ चा भीषण दुष्काळ. कामगारांचे मोठे मोर्चे असोत वा बंद, त्यांनी चर्चेचा मार्ग कधीही सोडला नाही. कॉ. डांगे आणि जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारख्या नेत्यांशी त्यांनी वाटाघाटी करून प्रश्न सोडविले. त्यांनी परिस्थिती कधीही 'तुटेपर्यंत ताणली नाही'. शरद पवारांसारख्या तरुण मंत्र्यांना त्यांनी नेहमीच विश्वास दिला आणि धीर दिला. नाईकसाहेबांनी केवळ शेतीच नाही, तर माणसांचीही मशागत केली. त्यांनी भटक्या-विमुक्त जातींचे दुःख ओळखले. या वंचित घटकांसाठी त्यांनी ४ टक्के जागा राखीव ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यांच्यासाठी मोठ्या प्रमाणात आश्रमशाळा सुरू केल्या. यामुळे या समाजासाठी प्रगतीचे दरवाजे उघडले. त्यांनी सुरू केलेली 'मागेल त्याला काम'देणारी रोजगार हमी योजना तर एक वरदानच ठरली. दुष्काळात लोकांच्या हाताला काम मिळाले. याच योजनेतून राज्यात रस्ते आणि बंधाऱ्यांचे जाळे उभे राहिले. महाराष्ट्राची ही योजना पुढे संपूर्ण देशासाठी 'दीपस्तंभ'ठरली. १९७२ च्या दुष्काळात राज्यावर भिकारपणाची वेळ आली होती. हे नाईकसाहेबांच्या जिव्हारी लागले. पुण्यातील शनिवारवाड्यावर त्यांनी जनतेच्या साक्षीने एक प्रतिज्ञा केली. ते गरजले, 'येत्या दोन वर्षांत महाराष्ट्रात अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही, तर मी जाहीरपणे फासावर जाईन!'. हा त्यांचा प्रचंड आत्मविश्वास होता. त्यांनी आपला शब्द खरा करून दाखविला. त्यांनी महाराष्ट्राला तब्बल १२ वर्षे स्थिर सरकार दिले. ही 'खणखणीत नाण्या'सारखी कामगिरी होती. याच स्थिरतेमुळे महाराष्ट्र राज्याच्या विकासाचा पाया रचला गेला. वसंतराव नाईक यांचे जीवन आणि त्यांनी घालून दिलेले आदर्श आजही प्रेरणादायी आहेत. या महान 'शेतकऱ्यांच्या राजा'ला पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

# जंगलतोड, औद्योगिकिरणाला जबाबदार कोण?



### चिंतन

रमेश लांजेवार
९९२१६९०७७९

आज देशात वाढते प्रदुषण, शहरीकरण, औद्योगिकीकरण, वृक्षांची कत्तल आणि मोठमोठे टॉवर यामुळे स्थल,जल, वायूचे वातावरण दुषित झाले आहे यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे आणि वाढत्या प्रदूषणामुळे अनेक वृक्ष,पशुपक्षी लुप्त झाले आहेत किंवा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. परंतु मानव बुध्दीजीवी प्राणी असल्यामुळे मुक्या प्राण्यांवर कोणत्याही प्रकारचा अत्याचार किंवा अन्याय होणार नाही याची जातीने काळजी घेतली पाहिजे व योग्य ती उपाययोजना केली पाहिजे.अन्यथा मुक्या प्राण्यांमध्ये व आपल्यामध्ये काहीच फरक रहाणार नाही.आज राज्यासह संपूर्ण देशात मानवांच्या सुखसुविधांसाठी मोठ्या प्रमाणात जंगलतोड सुरू असुन देशातील अनेक भागांत शहरीकरण,औद्योगिकरण,परमाणु परिक्षण व रस्त्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात दिसून येते.यामुळेच मोठ्या प्रमाणात जंगलसंपदा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत आणि हा प्रकार फक्त भारतातच नसुन संपूर्ण जगात सुरू आहे. परंतु याचे प्रायश्चित्त आज मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूंना भोगावे लागत आहे.

देशात दिवसेंदिवस लावारीस कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि लावारीस कुत्र्यांची संख्या वाढण्यामागे स्थानिक प्रशासन जबाबदार आहे.कारण स्थानिक प्रशासनांना माहीत असते की कुत्रा चावला तर त्याचा काय परिणाम होतो तरी स्थानिक प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असते त्यामुळेच आज भारतात लावारीस कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.एका आकडेवारी नुसार असे सांगण्यात येते की देशात दररोज १० हजार नागरिकांना कुत्रे चावा घेतात व यात अनेकांना रेबीज आजार होतो किंवा अनेकांचा मृत्यू सुध्दा होतो.यावरून आपण समजू शकतो की स्थानिक प्रशासनाच्या चुकांमुळे हा भयंकर प्रकार होत.स्थानिक प्रशासनाने वेळीच लावारीस कुत्र्यांवर आळा घातला किंवा नसबंदी केली असती तर अनेकांचा जीव वाचला असता किंवा चाव्यांचे प्रकार टाळता आले असते.त्यामुळे आता आदेश, निर्देश खूप झाले आता अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सध्याच्या परिस्थितीत कबुतरांना खाद्यबंदीचा वाद जोरदार उफाळल्याचे दिसून येते आणि हा मुद्दा आता मुंबई महापालिका,सरकार आणि हायकोर्ट अशा पध्दतीने सुरू आहे.महत्वाचा मुद्दा असा की कबुतरांना खाद्यबंदीचा का करावी? आपण संपूर्ण जंगल संपुष्टात आणले कबुतर हा तर छोटासा पक्षी आहे.आज जंगलतोडीमुळे वाघ,बंदर, बिबट्या,अस्वल इत्यादी अनेक हिंसक पशु शहरात व गावात सरळ प्रवेश करीत आहेत व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवीत हानी सुध्दा झाली आहे व होत आहे.बंदरांचा विचार केला तर जनु काय त्यांच्यासाठी जंगल संपुष्टात आले की काय असे त्यांना वाटत आहे.त्यामुळे आज देशातील अनेक शहरांत किंवा गावांमध्ये बंदर मोठ्या प्रमाणात दिसून येतात व मोठ्या प्रमाणात नुकसान सुध्दा करतात.परंतु याला कारणीभूत कोण?याचा विचार सरकार, प्रशासन व स्थानिक प्रशासन का करीत नाही? म्हणजे आपणच त्यांच्यावर अत्याचार व अन्याय करायचा आणि आपण त्यांच्या पासून नुकसानीचा धडा सर्वसामान्यांना शिकवायचा ही बाब कितपत योग्य म्हणावी! कबुतरांच्या बाबतीत वाढता रोष पहाता कबुतरखाना बंद करण्याच्या भुमिकेत असलेल्या मुंबई महापालिकेने मवाळपणा दाखवित सकाळी ६ ते ८ या दोन तासांच्या काळात कबुतरांना खाद्य टाकण्याची परवानगी देण्याच्या विचारात असल्याची माहिती मुंबई उच्च न्यायालयाला १३ ऑगस्टला दिली.माझ्या माहितीनुसार मुंबई महापालिका किंवा राज्य सरकार मुक्या पक्षांवर (कबुतरांवर) एकाकी त्यांच्या खाण्यावर बंदी घालु शकत नाही.कारण कबुतरांसारख्या अनेक जंगली पक्षांना शहरात आणण्यास स्वतः सरकार, प्रशासन व स्थानिक प्रशासन जबाबदार आहे.त्यामुळे कबुतर असो व अन्य प्राणी त्यांच्या खाण्यापीण्याची व्यवस्था सरकारने प्रथम करावी नंतर सर्वसामान्यांना सांगावे की त्यांना खाद्य टाकावे किंवा नाही. गुन्हा सरकारने व प्रशासनाने करावा आणि त्याचे प्रायश्चित्त मुक्या पशुपक्षांनी भोगावे हा कुठला न्याय म्हणावा! असे सांगितले जाते की कबुतरांमुळे ६० प्रकारचे आजार होऊ शकतात त्यात मुख्यत्वे करून अस्थमा सारख्या आजारांचा समावेश आहे.ही बाब ठीक याचे आम्हीपण समर्थ करतो.परंतु शहरात कबुतरांचा एवढा लोंढा कसा काय आला यांचाही विचार सरकारने केला पाहिजे.कारण एवढे कबुतर एकाएकी शहरात आले नसुन ते प्रशासनांच्या चुकांमुळे आले आहेत यालाही नाकारता येणार नाही.त्यामुळे सरकारने कबुतरखान्याच्या बाबतीत गांभीर्याने विचार करावा नंतरच योग्य तो निर्णय घ्यावा.आजही राज्यातील अनेक शहरांमध्ये मोकाट गायी फिरतात त्यांना कोण खाद्य खाऊ घालणार याचा विचार सरकार का करीत नाही? मोकाट गायींची सुरक्षा निश्चित करण्यासाठी व योग्य खाद्य मिळावे यासाठी सरकार त्यांना गोशाळेत का नेत नाही?ते तर पाळीव प्राणी आहेत.म्हणजेच सरकार,प्रशासन व स्थानिक प्रशासन लोकांना सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण अशी परिस्थिती सरकारची दिसून येते.कुत्रा हा पाळीव प्राणी आहे.परंतु लावारीस कुत्र्यांची वाढती संख्या पहाता त्यांचा बंदोबस्त स्थानिक प्रशासनाने ताबडतोब करायला हवा.त्याचप्रमाणे मोकाट गायी शहरात मोठ्या प्रमाणात फिरतात अशा परिस्थितीत त्यांच्या खाण्यामध्ये अनेक विषेली पदार्थ सुध्दा येतात व यामुळे त्यांची जिवीत हाणी सुध्दा होते.त्यामुळे सरकारने अशा प्राण्यांची व्यवस्था ताबडतोब गोशाळेत केली पाहिजे.त्याचप्रमाणे कबुतर,बंदर किंवा अन्य जंगलातील पशुपक्षी शहरात किंवा गावात का येत आहे याचाही गांभीर्याने विचार करून ताबडतोब जंगलतोड थांबविली पाहिजे व वाढते शहरीकरण रोखले पाहिजे अशा पध्दतीने सरकारने विचार केला तर कालांतराने जंगलात सहवास करणारे संपूर्ण पशुपक्षी शहरात किंवा गावात येने हळूहळू कमी होईल व त्यांचे आयुष्य वाढेल. यासाठी सरकारला वृक्षलागवडीचा मोठा उपक्रम राबविने गरजेचे आहे.कारण वृक्षांच्या अभावामुळे पशुपक्ष्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.या संपूर्ण गोष्टींचा विचार सरकारने मोठ्या गंभीरतेने घेतला पाहिजे.पशुपक्षांच्या बाबतीत निर्माण झालेले वैरत्व संपुष्टात आणण्याची जबाबदारी सरकारची आहे. त्या अनुषंगाने सरकारने पाऊल उचलायला हवे व मानव आणि पशुपक्षी यांच्यातील मैत्रीपुर्ण संबंध प्रस्थापित करण्यासाठी जास्तीत जास्त भर दिला पाहिजे.पुर्वी चिऊताईच्या नावांनी आई घास भरवायची,परंतु आज चीमण्या सुध्दा अनेक क्षेत्रांतुन लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्याचप्रमाणे कावळे सुध्दा कमी प्रमाणात दिसतात. मानवाने स्वतःच्या आरोग्याची जोपासना अवश्य करावी.परंतु पशुपक्ष्यांच्या रक्षणाचा सुध्दा विचार करावा.



# अमेरिकेचे पाकधार्जिणी व भारत विरोधी धोरण



### आंतरराष्ट्रीय

भालचंद्र ठोंबरे
९८३४३५०८९५



गेल्या काही दिवसापासून भारत व अमेरिकेच्या संबंधात तणाव निर्माण झाला आहे. अमेरिकेच्या हुकुमशाही वागण्याने हा तणाव वाढण्याची शक्यता बळावत आहे. भारत अमेरिकेच्या संदर्भात या वाढत्या तणावाची संभाव्य चार कारणे समोर येतात. १) कॅनडातील जी७ च्या परिषदेच्या नंतर अमेरिकेने नरेंद्र मोदींना अमेरिका भेटीचे दिलेले आमंत्रण पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे नरेंद्र मोदीने नाकारले. २) भारत-पाक दरम्यान झालेल्या अल्प सशस्त्र संघर्षात आपणच मध्यस्थी करून संघर्ष थांबवला हा त्यांनी केलेला दावा भारताने स्पष्टपणे खोडून काढला व त्यांचा स्वतःकडे महत्त्व घेण्याचा उद्देश असफल केला. ३) अमेरिकेने धमकी दिल्यानंतरही भारताने रशियाकडून तेल खरेदी बंद केली नाही. ४) भारताने अमेरिकेला भारतात व्यापार करण्यासाठी कृषी क्षेत्र व दुग्ध व्यवसायाचे क्षेत्र मुक्त केले नाही. या व्यापार धोरणावर चर्चा करण्यासाठी अमेरिकन प्रतिनिधी मंडळ चर्चेच्या सहाव्या फेरीसाठी येत्या २५ ते २७ ऑगस्ट चे दरम्यान भारतात येणार आहे. या सर्व कारणामुळे अमेरिकेला भारत आपल्या धोरणाने ऐकत नाही या बाबीचा राग येऊन भारताला दबावात आणण्यासाठी अमेरिकेने व्यापारसंबंधी बोलणी पूर्ण होण्यापूर्वीच अतिरिक्त २५टक्के आयात शुल्क लावून एकूण ५० टक्के केले आहे. यावरून भारताला दबावात आणून त्याने आपल्या इच्छेप्रमाणे वागावे व धोरणे ठरवावी ही अमेरिकेची हुकूमशाही वृत्ती दिसून येते तसेच यातून भारत विरोधही स्पष्ट दिसत आहे.

मात्र अमेरिकेचे भारत विरोधी धोरण केवळ वरील कारणामुळेच आहे असे नसून अमेरिका प्रथमपासूनच भारत विरोधात आहे. हे मागील काही घटनांकडे दृष्टीक्षेप टाकला असता स्पष्टपणे जाणवते.भारताचे विभाजन होऊन भारताला स्वातंत्र्य मिळाले. विभाजन होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली. त्यावेळेस दुसरे महायुद्ध संपून जगात अमेरिका व रशिया धार्जिणे असे दोन गट पडले होते. पाकने अमेरिकन गटाशी सख्य केले. तर भारताने तटस्थतेचे धोरण स्वीकारून भारत दोन्ही गटापासून दूर राहीला. स्वाभाविकच पाककडे अमेरिकेचे झूकते माप राहिले. तसेही अमेरिकेला दक्षिण पूर्व आशियात कम्युनिस्टांच्या वाढत्या विचारधारेला व प्रसाराला आळा घालण्यासाठी आशियात एखाद्या सैनिकी स्थळाची आवश्यकता होती. व पाकच्या रूपाने तो त्यांना मिळाला. सोवियत संघाच्या वाढत्या प्रभावाला आळा घालण्यासाठी १९५४ मध्ये सेटो व १९५५ मध्ये सेंटो या संघटना निर्माण झाल्या. पाक त्या संघटनांचा सभासद झाला. त्यामुळे तर तत्कालीन अमेरिकन विदेश मंत्र्यांनी दक्षिण आशियात आम्हाला एक चांगला लढाऊ साथीदार पाकच्या रूपाने मिळाला असे उद्गारही काढले. १९५७ ते १९७० च्या दरम्यान अमेरिकेने पाकला २१ बिलियन डॉलर म्हणजे आजच्या हिशोबात जवळपास १.८ लाख करोड रुपयाची मदत केली. यात ३४ हजार करोडची शस्त्र व सैन्य सहाय्यता होती. याच मदतीचा उपयोग पाकिस्तानने भारत विरुद्धच्या १९६५ च्या युद्धात केला. या युद्धात अमेरिकेने पाकिस्तानला भारत विरुद्ध त्याकाळी अमेरिकेचे अभेद्य समजले जाणारे पॅटर्न रणगाडेही पुरविले. मात्र भारताने त्याचे कच्छच्या रणात कब्रस्तान बनविले हा भाग वेगळा. १९७१ मध्ये तत्कालीन पूर्व पाकिस्तानात पाक सेनेने जनतेवर केलेल्या अत्याचाराच्या विरोधात जनतेने सशस्त्र उठाव केला पाकच्या अत्याचाराने अनेक निर्वासितांचे लोंढे भारतात आले. त्यामुळे भारतावर आर्थिक बोजा पडू लागला. त्यामुळे भारताने पूर्व पाकिस्तान वर कारवाई करण्याचे ठरविले. भारताच्या या पवित्र्यामुळे अमेरिकेचे तत्कालीन प्रेसिडेंट रिचर्ड निक्सन यांनी पाकचे दोन तुकडे करण्यापासून भारताला थांबविले पाहिजे, असे म्हणून आपले परमाणुयुक्त सुसज्ज असे सातवे आरमार बंगालच्या खाडीत पाठविले. हा सरळ सरळ भारताला धमकावण्याचा प्रकार होता. व भारता विरुद्ध प्रत्यक्ष संघर्षाचा पवित्र होता. मात्र रशिया भारताच्या बाजूने खंबीरपणे उभा असल्याने भारताने त्याला भीक घातली नाही. व पाकिस्तानचे दोन तुकडे करून बांगलादेशची निर्मिती केली. मात्र अमेरिकेचा हा पराभवहोता. तसेचपॅटर्न रणगाड्यांच्या विध्वंसामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर बाजारात त्याच्या विश्वासहार्यतेलाही तडा गेला. १९७४ मध्ये भारताने आपला अणूबॉम्बचा स्फोट केला. त्यामुळे विस्मयचकीत झालेल्या अमेरिकेने भारतावर कडक निर्बंध लादले. न्यूक्लिअर ग्रुप तयार करून भारताला परमाणु तंत्रज्ञान मिळू नये याची दक्षता घेतली. मात्र त्याच वेळेस पाकच्या परमाणु विकास कार्यक्रमाबाबत मात्र मौन बाळगले. इतकेच नव्हे तर शांततेसाठी अणूविज्ञान या नावाखाली पाकशास्त्रज्ञांना प्रशिक्षणही दिल्याची त्यावेळी चर्चा होती. १९७९ मध्ये रशियाने अफगाणिस्तान वर हल्ला केला त्यामुळे रशिया विरुद्ध लढण्यासाठी व डावपेच आखण्यासाठी अमेरिकेने पाकिस्तानची मदत घेतली. अमेरिकेने पाक मध्ये आपला तळ बनविला. अफगणीस्थान मध्ये असंतोष निर्माण करण्यासाठी व घातपाती कारवाया करण्यासाठी अफगाण मुजाहिदिन साठी पाकिस्तानला अमेरिकेने मोठ्या प्रमाणात शस्त्र व अर्थ सहाय्य केले. खरबो रुपयाचे अर्थसहाय्य व शस्त्र पुरवठा केला. मुख्य उद्देश अफगणीस्थान मधून रशियाला हूसकावणे हा असला तरी पाकिस्तानने या सोबतच याचा उपयोग भारताविरुद्ध दहशतवाद्यांसाठी प्रशिक्षण केंद्रे उभारून त्याद्वारे दहशतवादी तयार करून त्यांना काश्मीरात पाठवून काश्मिरात अशांतता व उच्छाद मांडण्यासाठी केला. अमेरिकेने दिलेल्या मदतीचा व शस्त्रांचा उपयोग पाकिस्तान भाराताविरुद्ध व काश्मीरात अशांतता निर्माण करण्यासाठी करीत असल्याचे भारताने वेळोवेळी अमेरिकेच्या निदर्शनास आणून दिले. हे सर्व अमेरिकेपासून लपून नव्हते. मात्र स्वतः चा स्वार्थ साधण्यासाठी अमेरिका तिकडे कानाडोळा करीत राहीली. १९९८ मध्ये भारताने पाच परमाणु परीक्षण केले. तेव्हाही अमेरिकेने भारतावर पुन्हा कडक निर्बंध लादून भारतीय परमाणु कंपन्यांना काळ्या यादीत टाकले. जेणेकरून कोणत्याही परदेशी कंपन्याकडून भारताला तंत्रज्ञान मिळून नाही. मात्र थोड्याच दिवसात पाकनेही परमाणू परीक्षण केले. त्याकडे मात्र अमेरिकेने दुर्लक्ष केले ह्याचवरून भारत अण्वस्त्रधारी अन्वस्त्र संपन्न होऊ नये अशीच अमेरिकेची इच्छा व कारस्थान असल्याचे स्पष्ट होते. १९९९ मध्ये पाकिस्तानने कारगिल क्षेत्रात आक्रमण केले तेव्हा पाककडील भाग उंचावर व भारताचे सैन्य खोलगट भागात होते त्यामुळे उंचावर परिणामकारकरीत्या लक्षभेद करणारे लेसर गाईडेड बॉम्बची भारताने अमेरिकेने मागणी केली. मात्र अमेरिकेने त्यास स्पष्ट नकार दिला. आपले सैनिक निष्कारण बळी जात असतांना मानवाधिकाराच्या गप्पा मारणारी अमेरिका मदत न करता मूग गीळून गप्प होती. यावरून भारताच्या कोणत्याही गोष्टीला विरोध असलेले अमेरिकेचे धोरण स्पष्ट होते. त्यावेळेला इज्राइलच्या मदतीने भारताने त्या परिस्थितीवर मात केली. ११ सप्टेंबर २००१ मधील अमेरिकेवरील दहशतवादी हल्ल्यामुळे अमेरिकेने दहशतवादा विरुद्ध कठोर भूमिका घेतली. ट्रम्प च्या पहिल्या कार्यकाळात २०१४ नंतर पाकिस्तान वर काही प्रमाणात निर्बंध लादण्यात येऊन शस्त्र पुरवठ्यातही कपात करण्यात आली. तर भारताशी काही प्रमाणात संबंधात सुधारणा आली. मात्र ट्रम्प च्या दुसऱ्या कार्यकालात सुरुवातीपासूनच ट्रम्पने हुकूमशाहा सारखे धोरण आखले. सर्वच देशांवर प्रथम भरमसाठ आयात शुल्क आकारून नंतर त्यांच्याशी करार करून त्यात काही प्रमाणात सवलती दिल्या. मात्र भारत सांगूनही रशियाकडून घेत असलेली तेल खरेदी थांबवत नाही, म्हणून अमेरिकेने भारतावर सर्वात जास्त म्हणजे ५० टक्के आयात शुल्क लावले. ब्रिक्स गटातील देशांनाही आयात शुल्काच्या व अर्थव्यवस्था बरबाद करण्याच्या धमक्या दिल्या. जगात भारताची चौथ्या क्रमांकाची विकसित अर्थव्यवस्था असतानाही अमेरिकेने भारताची अर्थव्यवस्था ही डेड अर्थव्यवस्था असल्याचे व्यक्त केले. पाकिस्तानला पुन्हा एकदा जवळ केले. पाकिस्तानने पहलगाम मध्ये दहशतवादी हल्ला केल्यानंतर भारताने केलेल्या ऑपरेशन सिंदूर मध्ये पाकिस्तानला सपाटून मार दिला. असे असतांनाही पराभूत पाकिस्तानच्या सेनाप्रमुखाला व्हाईट हाऊस मध्ये सन्मानाने खाना दिला. या सन्मानाने शेफारून जाऊन पाकच्या सेनाप्रमुखांनी अमेरिकेच्या धरतीवरून भारताला अणूयुद्धाची धमकी दिली. एका राष्ट्राच्या सेना प्रमुखाने दुसऱ्या राष्ट्राच्या जमिनीवरून तिसऱ्या राष्ट्राला अणु युद्धाची धमकी देणे हे मुळातच हे चूक आहे. याचा अर्थ या धमकीला अमेरिकेची संमती आहे असे मानावे काय ? या वक्तव्याचा यांनी निषेध करावयास हवा होता. मात्र भारत विरोधी धोरण स्वीकारलेल्या अमेरिकन प्रशासनाने यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

पाकिस्तानात अल्प प्रमाणात तेल साठा सापडलेला आहे. हा तेल साठा पाकिस्तानच्या गरजेपेक्षाही कमी आहे. मात्र याचा विकास करण्यासाठी अमेरिका पाकिस्तानला सहकार्य करेल असे अमेरिकेने जाहीर केले आहे. आणि या अल्पशा तेल साठ्यावरूनच पुढे मागे भारतालाही पाकिस्तान कडून तेल घ्यावे लागेल. अशी मुंगेरीलालची स्वप्ने ट्रम्प प्रशासन पहात आहे. ही अमेरिकेच्या भारत विरोधी धोरणाची परिसीमा म्हणावी लागेल.



### लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### स्वातंत्र्य



बहुत कष्टांनी मिळवले
आम्ही आपले स्वातंत्र्य
आता तुम्ही का लागले
तेच मिळवण्या पारतंत्र्य

हा स्वदेशीचा फक्त नारा
मात्र इतरांना पायघड्या
पसरवता संभ्रमच सारा
केवळ विश्वगुरूचा पसारा

स्वातंत्र्य आपले अबाधित
राखू आपण सारे मिळून
भारताला बनवूया विश्वात
खरोखरच महागुरु म्हणून

### ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

पुरासम आहे
अहंकार मित्रा ।
क्षणातच मित्रा
नष्ट करी ॥

अहं नष्ट होण्या
सहवास हवा ।
सोबतीला हवा
गुरू मित्रा॥

अहांकार मिटे
नम्रतेने मित्रा ।
चल आणू मित्रा
आचरण॥

पुरासम आहे
अहंकार मित्रा ।
क्षणातच मित्रा
नष्ट करी ॥

# हृतिक रोशनच्या 'वॉर २'कडे प्रेक्षकांची पाठ; तीन दिवसांत फक्त १४२ कोटींची कमाई



बॉलीवूडचा अभिनेता हृतिक रोशन आणि दाक्षिणात्य सुपरस्टार ज्युनियर एनटीआर यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'वॉर २' चित्रपट १४ ऑगस्टला जगभरात प्रदर्शित झाला. त्यामध्ये अभिनेत्री कियारा अडवाणी प्रमुख भूमिकेत झळकली आहे.

१४ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित झालेल्या हृतिक रोशन आणि ज्युनियर एनटीआर यांच्या या चित्रपटाच्या कमाईत शनिवारी मोठी घसरण झाली. हिंदी, तेलुगू व तमीळ या तिन्ही आवृत्त्यांमधील या चित्रपटाचे तिसऱ्या दिवशी नुकसान झाले आहे. त्याने फक्त तीन दिवसांत सलमान खानच्या 'सिकंदर' चित्रपटाच्या कमाईला मागे टाकले आहे.

गुरुवारी (१४ ऑगस्ट) प्रदर्शित झालेल्या 'वॉर २'ने पहिल्या दिवशी तिन्ही भाषांमध्ये ५२ कोटी रुपये कमावले. त्यानंतर स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने 'वॉर २'ला खूप फायदा झाला. शुक्रवारी त्याने ५७.३५ कोटी रुपये कमावले; पण जन्माष्टमीच्या दिवशी चित्रपटाचा तिसरा दिवस होता. त्या दिवशी चित्रपटाच्या कमाईला मोठा धक्का बसला. अयान मुखर्जी दिग्दर्शित 'वॉर २'चे बजेट ४०० कोटी रुपये आहे. अशा परिस्थितीत हिट होण्यासाठी त्याला त्याच्या कमाईचा वेग वाढवावा लागेल.

'सॅकनिल्क'च्या मते, 'वॉर २'ने शनिवारी देशात एकूण ३३.२५ कोटी रुपयांचे कलेक्शन केले आहे. अशा प्रकारे तीन दिवसांत भारतीय बॉक्स ऑफिसवर चित्रपटाची एकूण कमाई १४२.६० कोटी रुपये झाली आहे. तिसऱ्या दिवशी या स्पाय ॲक्शन चित्रपटाने हिंदी आवृत्तीत २६ कोटी रुपये कमावले आहेत, जी कमाई एक दिवसापूर्वी ४४.५० कोटी रुपये होती.

दुसरीकडे रजनीकांत, श्रुती हासन, नागार्जुन, सत्यराज स्टारर 'कुली' चित्रपटाने तिसऱ्या दिवशी 'वॉर २'ला मागे टाकले आहे. पहिल्या दिवशी 'कुली'ने ६५ कोटींची कमाई करून हृतिक-एनटीआरच्या चित्रपटाला मागे टाकले होते. 'वॉर २' कदाचित दाक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांत यांच्या चित्रपटापेक्षा मागे असेल; पण अवघ्या ७२ तासांतच त्याने सलमान खानच्या ईदला प्रदर्शित झालेल्या 'सिकंदर'ला मागे टाकले आहे.

# कुत्रा चावल्याने फक्त रेबीज नाही तर हे गंभीर आजारही होण्याची शक्यता?



कुत्र्यांच्या चाव्यामुळे होणारा सर्वात सामान्य आजार म्हणजे रेबीज. जर एखादा कुत्रा चावला आणि त्याला याबाबत कोणत्याही प्रकारची लस दिलेली नसेल तर नक्कीच त्या व्यक्तीच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. आणि माणसाला रेबीज हा आजार होऊ शकतो. पण हे फार कमी जणांना माहित असेल की कुत्रा चावल्यामुळे फक्त रेबीज हा आजार होत नाही तर इतर अनेक आजारही होतात. आणि अर्थातच त्या आजारांमुळे देखील माणसाचा मृत्यू होऊ शकतो. जाणून घेऊयात की ते कोणते आजार आहेत.

कुत्र्यांच्या चाव्यामुळे होणारा सर्वात सामान्य आजार म्हणजे रेबीज. जर एखादा कुत्रा चावला आणि त्याला याबाबत कोणत्याही प्रकारची लस दिलेली नसेल तर नक्कीच त्या व्यक्तीच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. आणि माणसाला रेबीज हा आजार होऊ शकतो. पण हे फार कमी जणांना माहित असेल की कुत्रा चावल्यामुळे फक्त रेबीज हा आजार होत नाही तर इतर अनेक आजारही होतात. आणि अर्थातच त्या आजारांमुळे देखील माणसाचा मृत्यू होऊ शकतो. जाणून घेऊयात की ते कोणते आजार आहेत.

कुत्र्याच्या शरीरातील संसर्ग आणि जीवाणू शरीरात जाणे : राजस्थान पशुवैद्यकीय आणि प्राणी विज्ञान विद्यापीठाचे डॉ. एन.आर. रावत म्हणतात की कुत्र्याच्या चाव्यामुळे झालेल्या दुखापतीतून कुत्र्याच्या शरीरातील एक जीवाणू पीडिताच्या शरीरात प्रवेश करतो. या जीवाणूचे नाव कॅपनोसाइटोफागा कॅनिमोर्सस आहे. वृद्ध, मधुमेही किंवा कर्करोगाच्या रुग्णांसारख्या कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती असलेल्या लोकांसाठी हा जीवाणू अधिक प्राणघातक ठरू शकतो. हा जीवाणू शरीरात संसर्ग पसरवतो, ज्यामुळे दुखापतीच्या ठिकाणी किंवा चाव्याच्या ठिकाणी पू तयार होणे, सूज येणे आणि त्वचेचा लालसरपणा यासारखी गंभीर लक्षणे दिसून येतात. वेळेवर उपचार न केल्यास हा संसर्ग घातक ठरू शकतो.

# 'कुर्ला टू वेंगुर्ला' चित्रपट सप्टेंबरमध्ये



गेल्या काही वर्षांत मराठी चित्रपटांमधून सातत्याने कोकणातल्या गोष्टी, विषय वा चित्रीकरणाच्या निमित्ताने तिथल्या संस्कृतीचं दर्शन घडतं आहे. आता पुन्हा एकदा कोकणातल्या तरुणांच्या लग्नाचा विषय घेऊन एक नवीन चित्रपट प्रेक्षकांसमोर येणार आहे. 'कुर्ला टू वेंगुर्ला' असं या चित्रपटाचं नाव असून अभिनेत्री वीणा जामकर, अभिनेता वैभव मांगले आणि लेखक अभिनेता प्रसाद कुडतरकर यांसारखे नावाजलेले कलाकार या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.कोकणातल्या तरुणांची न जमणारी लग्नं हा विषय घेत, माती आणि नाती जोडणारी एक धमाल गोष्ट 'कुर्ला टू वेंगुर्ला' या विजय कलमकर दिग्दर्शित चित्रपटातून पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाची झलक नुकतीच प्रदर्शित झाली असून या चित्रपटात एक वेगळीच कलाकारांची फौज पाहायला मिळणार आहे.

एकीकडे अभिनेत्री वीणा जामकर, अभिनेता वैभव मांगले, सुनील तावडे अशी नावाजलेली मंडळी आणि दुसरीकडे तरुण फळीतील लेखक अभिनेता प्रसाद कुडतरकर, अभिनेता साईंकित कामत आणि अभिनेत्री स्वानंदी टिकेकर अशी नवी-जुनी कलाकार मंडळी या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.अमरजित आमले, विजय कलमकर, चारुदत्त सोमण, नयना सोनावणे, अविनाश सोनावणे, एम. व्ही. शरतचंद्र हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद गीत लेखन अमरजित आमले यांनी, तर दिग्दर्शनासह संकलन विजय कलमकर यांनी केलं आहे. रंगनाथ बाबू गोगीनेनी यांनी छायांकन, अविनाश सोनावणे यांनी ध्वनिआरेखन, अक्षय खोत यांनी संगीत दिग्दर्शन, पार्श्वसंगीताची जबाबदारी निभावली आहे तर वितरक म्हणून पिकल एंटरटेन्मेंट काम पाहणार आहे. १९ सप्टेंबरला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

## राशी-भविष्य

**मेष :** आज कार्यक्षेत्र आणि कुटुंबात संतुलन राखून काम करतील. आज तुमचे लक्ष आवश्यक कागदपत्रे व्यवस्थित करण्यावर असेल.

**वृषभ:** वृषभ राशीच्या लोकांना कामाच्या ठिकाणी त्यांच्या सहकाऱ्यांचा पूर्ण पाठिंबा मिळेल. सर्व काम संभाषणाद्वारे सहज पूर्ण होईल.

**मिथून :** तुम्ही निरुपयोगी वादात अडकू शकता. मानसिक शांतीसाठी ध्यान करणे चांगले राहील. आर्थिक दृष्टिकोनातून वेळ अनुकूल आहे.

**कर्क :** वेळेवर काम पूर्ण करण्यासाठी तुम्हाला संघर्ष करावा लागू शकतो. आर्थिक दृष्टिकोनातूनही हा काळ फारसा योग्य नाही. जास्त मेहनत करावी लागेल.

**सिंह :** तुम्हाला दीर्घकाळापासून सुरू असलेल्या वादावर तोडगा काढता येईल. आज तुम्हाला नशिबाची पूर्ण साथ मिळत आहे.

**कन्या :** कन्या राशीचे लोक त्यांचे कार्यक्षेत्र व्यवस्थित करण्याचा प्रयत्न करतील. ते नको असलेल्या गोष्टी दूर करण्यासाठी काम करतील.

**तुळ :** तूळ राशीचे लोक सुट्टीचा फायदा घेतील आणि कामापेक्षा मनोरंजनावर अधिक लक्ष केंद्रित करतील.

**वृश्चिक :** कुटुंबातील सदस्यांसोबत आनंददायी वेळ घालवण्याची संधी मिळेल. आर्थिक दृष्टिकोनातून हा एक सामान्य दिवस आहे.

**धनु :** धनु राशीच्या रहिवाशांची कलात्मक क्षमता वाढेल. माध्यम प्रकाशनांशी संबंधित रहिवाशांनाही त्यांच्या कामाचा फायदा होण्याची शक्यता आहे.

**मकर :** मकर राशीच्या रहिवाशांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी कुटुंबातील सदस्यांचा पूर्ण पाठिंबा मिळेल. आर्थिक दृष्टिकोनातूनही हा चांगला काळ आहे.

**कुंभ :** कुंभ राशीच्या रहिवाशांच्या मनात सुट्टीच्या दिवशीही कामाशी संबंधित गोष्टी चालू राहतील. आर्थिक दृष्टिकोनातून हा काळ सामान्य आहे.

**मीन :** मीन राशीचे लोक कामाशी संबंधित छोट्या छोट्या गोष्टींकडे लक्ष देतील. तुम्ही आज प्रेझेंटेशन देखील तयार करू शकता.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 134



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**
अस्त, अंश, उमा, काल, काष्ठ, कोमा, गाल, टक, तवा, ताड, तारा, तीट, दावा, नशा, नक्षी, पसा, प्रत, बला, मती, मन, मस्त, मंत्र, मामा, यम, राधा, राव, रिपु, लता, लीन, वन, वक्ष, वान, वीणा, वीर, सम, सार, हाक, क्षमा

**तीन अक्षरी**
उधार, कमळ, कमान, करार, कराल, कवन, चरखा, जवान, टक्कर, तगादा, तराजू, तिरीप, दक्षता, नटवा, नमाज, नरक, पतन, पुरूष, प्रसव, बनाव, मर्दन, ममता, मोदक, रंजक, रताळे, रक्षक, रसना, राकट, राजस्व, रुक्मिणी, वहाण, वावर, विपुल, शिशिर, सराव, संचय

**चार अक्षरी**
अप्रतिम, अभिशाप, आलोचना, काकरव, गलबत, जलजीरा, तरलता, ताकवणी, तारामती, तावदान, तिलांजली, दीपशिखा, नागमणी, पट्टराणी, पत्रकार, प्रतिवादी, बलवान, मकबरा, वावटळ, शिरकाण, सरस्वती, हयगय

**पाच अक्षरी**
कोनमापक, जलतरंग, जलताडन, यमसदन, लोहपुरुष

**अन्य अक्षरी**
तबला वादन, उंटावरचा शहाणा

(उत्तर पुढील अंकी)

## मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 515



**आडवी विधाने :–**
1) हृदय फाडणारे (दृश्य,)
5) संसार, कुटूंब, विस्तार
7) अधिकारी माणसाची मध्यस्ती, संधान
9) गाय
10) श्रीकृष्णाचे सोबती
11) देशातील लोकांचे विचार
12) नदीचा किनारा, बाजू
14) सरकारला देणे असलेली रक्कम
15) रजनी, निशा
16) महात्मा गांधींना पुण्यातील या ठिकाणी नजरकैदेत ठेवले होते. याच ठिकाणी कस्तुरबांचे निधन झाले
18) घात करणारे, हानिकारक
21) मालाची मोठी खरेदी विक्री होणारी बाजारपेठ
24) स्मरण, आठवण
26) एक प्रकारची घोडागाडी
28) अरण्य, वणवा लागलेले रान
29) स्तुती, प्रशंसा
30) एक सुवासिक वनस्पती
32) कमिटी, छोटखानी मंडळ
33) चांगले वागणे, शिष्टाचार
38) मनुष्य, पुरुष 39) लहान मोठे
41) वाळा किंवा वाळ्याचे अत्तर
43) गर्दभ, गाढव (सं.)
45) मनापासून प्रेम, कृपा
47,) सर्वजण, सगळे
49) पदार्थाची रुची बघण्यासाठी घेतलेला थोडा अंश, नमुना
51) पाणी काढण्याचे चक्रयंत्र
53) नेहमी, निरंतर 55) द्रव, आवड
56) तेलाने बरबटलेले, खूप तेल असलेले
58) शोभिवंत, कमान
59) घ्यावयाची रक्कम, आगमन करणे
60) अकरा बोटे असलेला, ठेवलेल्या बाईपासून झालेला मुलगा
63) अमेरिका व रशियामध्ये करार करून दोन महाशक्तीतील वातावरण सौम्य करणारे अमेरिकेचे माजी अध्यक्ष
64) जडत्व, जडपणा
66) तीर्थक्षेत्री केलेली हजामत
69) खूप मनधरणी करणारा, आर्जव करणारा
70) फुटक्या नशीबाचा, दुर्दैवी
72) कंबरपट्टा, कटिसूत्र
73) धान्यावरचे टरफल (हिं)
74) अंधःकार, काळोख
76) दर्भ, रामायणात श्रीरामाचा एक पुत्र
77) व्यासपीठ
79) साजेसा, शोभणारा, यथायोग्य
81) फुलांची माळ 82) परमेश्वर
84) दगडाचे काम करणारा
86) फळाची साल
88) रामायणातील लंकाधिपती
88) पूर्वीच्या काळी शाईत बुडवून लिहिण्याची लेखणी
90) वंदन, नमस्कार 91) दिवस, वासर
92) किरकोळ किराणा मालाचा विक्रेता
93) एक शेंग भाजी प्रकार

**उभी विधाने :–**
1) माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्रीजींच्या समाधीस्थळाचे नाव
2) देणगी
3) एक मद्यप्रकार
4) कचरा, तुकडे (हिं.)
5) पृच्छा, सवाल
6) पाव भाग, एक चतुर्थांश
8) रंगपंचमी
10) गाईपासून उत्पन्न झालेले दूध, गोमुत्र, शेण इत्यादी
13) सुंदर डोळे असलेली स्त्री
14) मृतदेह, शव
16) स्मरण, याद
17) मुद्दाम योजलेले, विशेष
19) अंधार, काळोख
20) व्याजाचा हिशोबाचा एक प्रकार
21) खिन्न, कष्टी
22) दाराची किंवा खिडकीची काच
23) पुढील येणारे 25) चाल, रुढी
27) बुद्धी, अक्कल
31) पडल्यासारखे होणे, क्षीण होणे, थकणे
34) ओबडधोबड, तीक्ष्ण
35) शक्ती, उत्साह (इं) 36) राखड, रक्षा
37) श्रीकृष्णाचा अत्याचारी मामा
39) ............ भेद, एखाद्याला अनुकूल करण्याचे चार प्रकार
40) रुची, चव, आवड 42) प्रश्न ( हिं)
43) तामसी, क्रोधी, संतापी
44) उणीव भरून काढणारी गोष्ट
46) जखमेतून वाहणारा घाणेरडा द्रव
48) हस्त, हात
50) प्रत करणारा, अनुकरण करणारा
52) हजर, उपस्थित
54) नदीचे पाणी अडविणारा बांध
56) आडकाठी, अढी 57) रात्र, यामिनी
60) एकापेक्षा जास्त, अधिक
61) लाकडाच्या फळ्यांचे छत
62) कैफी, अंमली नशा आणणारे
63) अमेरिकेचे एक माजी अध्यक्ष
64) गुंतागुंत झालेले डोक्यावरील केस
65) प्रेमाचे प्रतीक असलेली भारतातील एक जगप्रसिद्ध वास्तु
67) अभिनेता अजिंक्य देवचे अभिनेता पिता
68) आर्थिक व्यवहारात कमिशन घेऊन मध्यस्थी करणारा
71) सैन्यात नव्यानेच भरती झालेला
75) मोत्यांची माळ, जिंकणे
76) व्यभिचारिणी, छिनाल
77) घुसळणे, चर्चा 78) शेवटचा, अंत्य
79) शर्त, पण 80) उद्यानंतर येणारा दिवस
83) जंगलात पेटलेली आग
85) रान, जंगल
87) खवाट्याचे हाड, खवाटा
88) राजाची पत्नी (उत्तर पुढी अंकी)

## मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महत्त्वाचे

### शाहीर वसंत मानवटकर आज आकाशवाणीवर



**अकोला :** येथील अकोटफाईल येथील रहिवाशी शाहीर वसंत मानवटकर यांची आज १८ऑगस्ट -२०२५ रोजी सकाळी १० वाजता अकोला आकाशवाणीवर प्रकाश वैद्य यांनी घेतलेली मुलाखत प्रसारीत होणार आहे . येथे दरवर्षी होळीच्या दुसऱ्या दिवशी होणाऱ्या मूर्ख संमेलनाचे शाहीर वसंत मानवटकर हे प्रमुख आकर्षण असतात. त्यांनी समाजाच्या विविध प्रश्नांवर स्त्री रूपात प्रहार करीत असतात. त्यांच्या अश्या विविध मुद्द्यावर हास्य करीत समाज प्रबोधन करीत असतात. त्यांची आज अकोला. आकाशवाणी वर मुलाखत प्रसारित होत असल्याने श्रोत्यांनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

### लंडनमध्येही भारतमातेचा जयघोष

**अकोला :** मातृभूमीवरील निस्सीम प्रेमाची प्रचिती देत एमआयडीसीचे सेवानिवृत्त अधिकारी तथा मुरुमकार परिवारातील ज्येष्ठ आदरणीय काकाश्री विनायकराव मुरुमकार यांनी परदेश दौऱ्यावर असतानाही भारताचा स्वातंत्र्य दिन लंडनच्या ह्यारो भागात भारतीयांसोबत सपत्नीक साजरा करण्याचा सन्मान लाभवून घेतला. या वेळी तिरंग्याच्या सावलीत देशभक्तीच्या भावना ओसंडून वाहिल्या. भारतापासून हजारो मैल दूर राहूनही हृदयात भारताची माती, संस्कृती आणि तिरंग्याशी असलेली नाळ जपणे ही खरी देशभक्ती असल्याचा संदेश त्यांच्या उपस्थितीने सर्वांना मिळाला.

### अकोल्यात धनगर समाजातील युवकांचा वंचित बहुजन आघाडीत प्रवेश

**अकोला:** अकोला जिल्ह्यातील धनगर समाजाचे युवा नेते आणि कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडीत प्रवेश करून पक्षाला बळकटी दिली आहे. यामध्ये धनगर समाज युवा समितीचे संस्थापक अध्यक्ष सुमित नवलकार आणि युवा सेना उपजिल्हा प्रमुख रविराज घोंगे यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश आहे. या पक्ष प्रवेशावेळी उपसरपंच भगवन पातोंड, सरपंच शिवदास पांडे, प्रशांत पातोंड, अनिल बाहे, चेतन दिवणाले, तेजस कात्रे, सचिन कोगदे, संजय गव्हाळे, विठ्ठल नांदूरकर, अवधूत नागे, गणेश नागे, श्याम पातोंड, संदीप सुशीर, तेजराव शिंदे, गोपाल नवलकार, चिंतामण पातोंड, अमोल घोंगे, मार्तंड साबळे, मंगेश साबळे, सोनू भदे, अक्षय घटाळे, प्रमोद पातोंड, अमोल कात्रे, सुभाष कळंब, ऋत्विक दिवणाले आणि प्रफुल दिवणाले हे धनगर समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# मातृशक्तीला वंदन करणारा तीज उत्सव

## मंगरुळपीर येथे तीज उत्सव साजरा; पारंपारिक नृत्य करित समाजबांधवांनी व्यक्त केला आनंद

। फुलचंद भगत ।



**मंगरुळपीर, दि. १७ :** तिज म्हणजे बंजारा समाजाच्या लोक संस्कृतीचे सर्व पदर आणि पैलू उलगडणारा उत्सव. या उत्सवात दहा दिवसाआधी अविवाहित मुली एका टोपलीत गौरी स्वरूप धान (गहू) पेरतात, रोज त्याला पाणी घालून बोलीभाषेत आराध्य देवतांची गीते म्हटली जातात. विसर्जनाच्या दिवशी डोक्यावर गौरीस्वरूप धान घेऊन वाजत गाजत तांड्याला प्रदक्षिणा केली जाते.मंगरुळपीर येथेही तिज ऊत्सव मोठ्या ऊत्साहात साजरा करुन महिलांनी पारंपारीक नृत्य सादर करत आपला आनंद व्यक्त केला.

बंजारा परंपरेतील सर्वात महत्वाचा असलेला तिज उत्सव मंगरुळपीर येथे उत्साहात साजरा करण्यात आला.भारतीय संस्कृतीत प्रत्येक जाती धर्मातील विविध उत्सव वेगळ्या ढंगाने व परंपरेने साजरे केले जातात. त्यामुळेच आपल्या देशातील विविधतेत एकता दिसून येते. इसवी सन पूर्वपासून बंजारा समाजात चालत आलेला सर्वात महत्वाचा तीज उत्सव पार पडला.कधीकाळी डोंगरदऱ्यात राहणाऱ्या बंजारा समाजात तीज म्हणजे आनंदाची पर्वणीच असते.

'गौरी'स्वरूप धान घेऊन तांड्याला घालतात प्रदक्षिणा तिज हा उत्सव म्हणजे बंजारा समाजाची दिवाळीच. तिज म्हणजे बंजारा समाजाच्या लोक संस्कृतीचे सर्व पदर आणि पैलू उलगडणारा उत्सव. या उत्सवात दहा दिवसाआधी अविवाहित मुली एका टोपलीत 'गौरी स्वरूप' धान (गहू) पेरतात, रोज त्याला पाणी घालून बोलीभाषेत आराध्य देवतांची गीते म्हटली जातात. विसर्जनाच्या दिवशी डोक्यावर 'गौरी'स्वरूप धान घेऊन वाजत गाजत तांड्याला प्रदक्षिणा केली जाते. लग्न होऊन सासरी गेलेल्या मुली, महिला तिज उत्सवाच्या निमित्याने माहेरी येतत. त्यामुळे या उत्सवाला वेगळे महत्त्व आहे.

श्रावण महिन्यात ठिकठिकाणी बंजारा तांड्यांवर तिज उत्सवाची पाहायला मिळतो. सध्या तीज उत्सवाच्या बंजारा लोकगीतांनी तिथल्या लोकांवर चांगलच गारुड घातलं आहे. पारंपारिक वेशभूषेत फेर धरून नाचणाऱ्या महिला मुली सहभागी झाल्या. डोंगरदऱ्यात राहणाऱ्या बंजारा समाजाने आपली वेगळी परंपरा,लोकसंस्कृती आणि वेगळेपण जपल्याचे यानिमित्ताने दिसून आले.

महिला प्रधान संस्कृतीचे दर्शन घडवणारा हा उत्सव मातृ शक्तीला वंदन करणारा असून, आद्यगण ''गण गौर'' यांचे महत्व विशद करणारा आहे. सालाबाद प्रमाणे यंदाही उत्सव मंगरुळपीर परिसरात साजरा केला गेला. यावेळी मोठया प्रमाणात बंजारा बांधव आणि भगिनी या उत्सवाला उपस्थित होत्या.

## जिल्हा बँकेची ११४ वी वार्षिक सभा; सहकार बळकट करण्याचे आवाहन

## कै. विष्णू अण्णा पाटील जीवन गौरव पुरस्काराने डॉ. कोरपे सन्मानित

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. १७ :** अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ११४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी उत्साहात पार पडली. या वेळी अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे यांनी सेवा सहकारी सोसायट्यांना कामकाजात सक्रिय सहभाग वाढवून सोसायट्यांचे बळकटीकरण करण्याचे आवाहन केले. अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांच्यात समन्वय ठेवून सोसायटी ग्राहकाभिमुख करणे, व्यवहार पारदर्शक ठेवणे ही काळाची गरज असल्याचे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, प्रत्येक गावात प्रत्यक्ष बँक शाखा उभारण्याची गरज नाही. यासाठी मायक्रो एटीएम योजना सुरू करण्यात आली असून, प्रत्येक गावात अधिकृत बँक मित्रामार्फत आर्थिक व्यवहार सुलभतेने करता येतील. तसेच बँकेने ग्रामीण सूर्यघर योजना राबवून शाश्वत ऊर्जा निर्मितीचा नवा पर्याय दिला आहे. कमी दरात कर्जपुरवठ्यामुळे शेतकरी स्वतः चे वीज प्रकल्प उभारू शकतात, हे योजनेचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ज्यांची खाती दीर्घकाळ थकीत आहेत, अशा सभासदांसाठी बँकेने ओटीएस योजना सुरू केली आहे. यात फक्त मुद्दल भरल्यानंतर शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज घेण्याची संधी मिळणार आहे. व्याजाची आर्थिक तूट जिल्हा बँक स्वतः उचलणार असल्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही डॉ. कोरपे यांनी केले. बँक विकासात्मक कर्जे, ठिबक सिंचन यांसारख्या योजनांसाठी अल्प व्याजदरात पतपुरवठा करत असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी डॉ. कोरपे यांचा कै. विष्णू अण्णा पाटील जीवन गौरव पुरस्कारानेफ गौरव झाल्याबद्दल संचालक मंडळासह सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. सभेत मागील वर्षी पंचतत्वात विलीन झालेल्या थोर व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यात आली. बँकेचे सीईओ अनंत वैद्य यांनी अहवाल सादर केला. आमसभेला उपाध्यक्ष श्रीधरराव कानकिरड, माजी अध्यक्ष रमेशराव हिंगणकर, संचालक सुभाषराव ठाकरे, आमदार अमित झनक यांच्यासह मोठ्या संख्येने संचालक, अधिकारी व सोसायट्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## अकोला जिल्ह्यात अतिवृष्टी व ढगफुटीचा कहर; शेतकऱ्यांना तातडीने मदत द्याः खा. अनुप धोत्रे यांची मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १७ :** अकोला, मूर्तीजापूर, अकोट, बार्शीटाकळी, तेल्हारा तसेच मालेगाव, रिसोड, वाशिम तालुक्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटीमुळे शेतकरी व ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पिकांचे, घरांचे, गुराढोरांचे, वीजपुरवठ्याचे झालेले मोठे नुकसान लक्षात घेऊन तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी ठाम मागणी खासदार अनुप धोत्रे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषी मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री आणि जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

खासदार धोत्रे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना फोटो हाच पंचनामा समजावा. महसूल व कृषी विभागाने संयुक्त सर्वेक्षण करून, पीकविमा कंपनीने तत्काळ कारवाई करावी. ज्यांचे घर कोसळले, जनावरे दगावली किंवा वीजपुरवठा खंडित झाला आहे, त्यांच्याही नुकसानीची नोंद घेऊन मदत द्यावी. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आश्वासन दिले आहे.

या संदर्भात खासदार धोत्रे यांनी थेट मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा करून आदेश तातडीने द्यावेत अशी मागणी केली. अनेक शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या भावना जाणून घेतल्या व महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी सुद्धा जिल्हा प्रशासन, कृषी अधिकारी, कृषी सचिव व राज्याचे मुख्य सचिव यांच्याशी संवाद साधून पंचनामे जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे आदी लोकप्रतिनिधींशी खासदार धोत्रे यांनी नुकसानीबाबत सविस्तर चर्चा केली असून राज्य शासन व केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे.

## विश्व मांगल्य सभा आणि मातृशक्ती संघटनांद्वारे भव्य-दिव्य-सुंदर महिला कावड आणि कलश यात्रा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. १७ :** 'तवैव कार्यार्थ इह उपजाता:' म्हणजेच, ''आपला जन्मच ईश्वरी कार्यासाठी झाला आहे.'', या वैदिक सूक्तीला सार्थ करण्यासाठी अकोला शहरातील विविध मातृशक्ती संघटनांनी विश्व मांगल्य सभेच्या नेतृत्वाखाली महिलांमध्ये धर्मजागृती आणि उत्साह वाढवण्याच्या उद्देशाने दुर्गामाता मंदिर, जठारपेठ येथून बारा ज्योतिर्लिंग मंदिरापर्यंत भव्य-दिव्य कावड व कलश यात्रेचे आयोजन केले होते.धर्म-संस्कृती विभागाच्या राष्ट्रीय संयोजिका श्रद्धाताई मोकाशी आणि अपर्णाजी धोत्रे यांनी दुर्गा मंदिरामध्ये पूजा-अर्चा करून या यात्रेचा शुभारंभ केला.मनमोहक शिव-पार्वतीची झांकी, टाळ-मृदंगासह भजनी मंडळ आणि वाद्यांच्या गजरात विविध संघटनांच्या महिलांनी विशेष पारंपरिक वेशभूषा परिधान करून या भव्य-दिव्य-सुंदर कलश-कावड यात्रेत सहभाग घेतला.

प्रमुख अतिथी विश्व मांगल्य राष्ट्रीय अध्यक्षा रेखाजी खंडेलवाल, विदर्भ अध्यक्षा मधुराजी लेंधे, विदर्भ सचिव निशा टावरी, मंजुषाजी सावरकर, किरणजी अग्रवाल, अर्चना शर्मा, सोनियाजी तर्हाळकर, वैशाली शेळके, कविता मीटकरी, कल्याणी पवित्रकार यांच्यासह उपस्थित सर्व मातृशक्तीद्वारे बारा ज्योतिर्लिंग मंदिरामध्ये शिव-जलाभिषेक, पूजन, महाआरती हे विधीपूर्वक अनुष्ठान पार पडले.विश्व मांगल्य सभेच्या सर्व पदाधिकारी वर्षा हुपेले, कोकिळा पाटील, अश्विनी-वंदना जकाते, मंजुषा रेलकर, गिरजा जागीरदार, पल्लवी देशपांडे, अनिता राजगुरे, रंजना बिजवे, शुभांगी कुलकर्णी, सुषमा ठोकळ, प्रांजल रायपुरे, शोभा जोशी, रुपाली काळे आदींनी गेल्या अनेक दिवसांपासून ही यात्रा यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. या धार्मिक यात्रा आणि अनुष्ठानाला यशस्वी करण्यासाठी दुर्गामाता आणि बारा ज्योतिर्लिंग मंदिराच्या पदाधिकाऱ्यांसह नीलेशजी देव, विवेक जकाते, संजयजी हुपेले, आणि पोलीस प्रशासनानेही भरभरून सहकार्य केले.

**सहभागी संघटना:** विश्व मांगल्य सभा, निलेश देव मित्र मंडळ, जठारपेठ ब्राह्मण महिला मंडळ, भाजप महिला आघाडी, माहेश्वरी महिला मंडळ, अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संघटना, देशमुख महिला मंडळ, खंडेलवाल महिला मंडळ, अग्रवाल महिला मंडळ, राजस्थानी ब्राह्मण व गुजर गौड ब्राह्मण महिला समाज, खांडल विप्र महिला मंडळ, माहेश्वरी वरिष्ठ महिला प्रकोष्ठ, लिनेस क्लब, जेसीआई प्रियदर्शनी यांच्या सन्माननीय पदाधिकारी आणि सक्रिय सदस्यांनी मोठ्या संख्येने कावड यात्रेत अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला.

## बालकलाकार स्वराज सोसे उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कार-२०२५ ने सन्मानित

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. १७ :** येथील दहा वर्षे वयाचा अत्यंत गोड व हरहुन्नरी बालकलाकार, बालवक्ता चि.स्वराज दीपाली आतिश सोसे याला आज श्रीमती देवकामाई देशमुख सेमी इंग्लिश स्कूल,अकोला यांच्या वतीने तब्बल ४० वर्षांपासून भरविण्यात येणाऱ्या गोकुळाष्टमी विशेष महोत्सवामध्ये देण्यात येणाऱ्या या प्रतिष्ठेच्या पुरस्कार समारंभात संस्थापक देवकामाई देशमुख,संस्थाध्यक्ष डॉ. विजय दुतोंडे, साहित्यिक प्रा.सतीश देशमुख,वऱ्हाडी कवी हिंमत ढाळे, प्रा.विजय अग्रवाल यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत आकर्षक स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार-२०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

आजवर त्याने बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा, प्रेम, शेतकऱ्याचा मुलगा, तंबाखू नको या लघुचित्रपटांमध्ये तसेच पर्यावरणपूरक दीपोत्सव या माहितीपटामध्ये आणि तीन जाहिरातींमध्ये प्रमुख बालकलाकाराच्या भूमिकेमध्ये प्रसिद्ध कलाकारांसोबत काम करीत त्याने आपल्या अभिनयाने रसिक, प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आगामी काटा या मराठी चित्रपटांमध्ये सुद्धा त्यांनी प्रमुख बालकलाकाराची भूमिका साकारली आहे. आजवर महाराष्ट्र राज्य, उत्तरप्रदेश राज्य,दिल्ली राज्य तसेच इतरही अनेक राज्यांमध्ये त्याने आपल्या अभिनयाने नाट्यछटांद्वारे प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. स्वराज याला आजपर्यंत त्याच्या उत्कृष्ट अभिनयासाठी राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये भारत सरकारचा राष्ट्रीय बालकलाकार पुरस्कार, दिल्ली साठीचे नामांकन,अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या टॅलेंट कट्टा, पुणे या संस्थेचा राष्ट्रीय बालकलाकार पुरस्कार, आंतरराष्ट्रीय रिल्स फिल्म फेस्टिवल बालकलाकार पुरस्कार, संभाजीनगर, बालप्रतिभा पुरस्कार, नंदुरबार, दैनिक विदर्भ केसरी विदर्भभूषण पुरस्कार,दर्यापूर,अमरावती, डॅडी देशमुख आंतरराष्ट्रीय फिल्म फ ेस्टिवल सन्मान, अकोला, बुलढाणा फिल्म सोसायटी चा राष्ट्रीय बालकलाकार पुरस्कार, बुलढाणा,आंतरराष्ट्रीय कोंच फिल्म फेस्टिवल बालकलाकार पुरस्कार, उत्तरप्रदेश,नवरत्न बालकलाकार पुरस्कार, सांगली, मनमंथन बालकलाकार पुरस्कार, नागपूर, राज्यस्तरीय बालकलावंत पुरस्कार, नाशिक,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ सन्मान, राष्ट्रीय गौरव पुरस्कार, संभाजीनगर, राज्यस्तरीय नक्षत्र चक्र बालकलाकार पुरस्कार,पुणे,शुभम बालकलाकार पुरस्कार, पनवेल,छत्रपती संभाजी राजे कलाभूषण पुरस्कार, अकोला,स्वातंत्र्यसेनानी बापुसाहेब ठाकरे पुरस्कार, दानापूर इत्यादी अनेक पुरस्काराने त्याला आजवर सन्मानित करण्यात आले आहे आजचा हा सन्मान मला निश्चितच प्रेरणा देणारा असाच आहे,अशी भावना यावेळी बालकलाकार स्वराज याने व्यक्त केली.

## आदर्श | नकुल रांदड यांचे प्रतिपादन

# अनुशासन, मेहनत, शिस्त आणि धैर्य हे प्रगतीचे मार्ग

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. १७ :** अनुशासन, मेहनत, शिस्त आणि धैर्य हे प्रगतीचे मार्ग आहेत, असे प्रतिपादन विदर्भातील प्रख्यात दंतरोग तज्ज्ञ तथा मुख शल्य चिकित्सक डॉ. राजेश रांदड आणि पॅथॉलॉजिस्ट डॉ. निर्मला रांदड यांचा जेईई परीक्षेतील टॉपर सुपूत्र आणि डवले कॉलेजचा माजी विद्यार्थी नकुल रांदड याने डवले पब्लिक स्कूल अँड कॉलेज मोठी उमरी अकोला येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना केले. यावेळी डॉ. राजेश रांदड, कॉलेजचे प्राचार्य, शाळेच्या सर्व मुख्याध्यापिका, शिक्षक वर्ग, विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते.

माजी विद्यार्थ्याच्या हस्ते ध्वजारोहण ही संपूर्ण संस्थेसाठी गौरवाची बाब होती. नकुल रांदड याने सर्वप्रथम डवले कॉलेज, नंतर आयआयटी बॉम्बे येथून शिक्षण घेऊन सध्या तो पुढील शिक्षण अमेरिका येथे घेत आहे. कार्यक्रमात प्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व ध्वज पूजन होऊन ध्वजारोहण करण्यात आले. मान्यवरांच्या स्वागतानंतर डवले पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी भारताने पहलगाम हल्ल्यानंतर जगाला ऑपरेशन सिंदूर द्वारे दाखविलेली शक्ती आणि त्यांच्यावर मिळवलेला विजय आपल्या स्टेज शो मधून सादर केला. सेमी इंग्लिशच्या विद्यार्थ्यांनी कारगिल युद्धाचे चित्रण आपल्या स्टेज शो माध्यमातून सादर केले. त्यानंतर नर्सरी ते सेवन स्टँडर्ड पर्यंतच्या विद्यार्थ्यांची भाषणे झाली. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित नकुल रांदड यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षण प्रवासाविषयी माहिती सांगून त्यांना प्रेरणा दिली. त्याचे वडील डॉ. राजेश रांदड यांच्यासाठी हा अभिमानाचा क्षण होता. प्रत्येक पालकांनी आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करावे असे डॉ. राजेश रांदड यांनी यावेळी सांगितले. प्रमुख अतिथी यांनी देशभक्तीची भावना प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये जोपासण्यासाठी समाजात प्रत्येकांच्या स्नेह व मैत्रीपूर्ण वातावरण असावे, देशाप्रती निष्ठा असावी असे सांगितले. हर घर तिरंगा अंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण यावेळी करण्यात आले.

डवले पब्लिक स्कूलच्या शिक्षिका रंगारी, आचल, प्रज्ञा आणि शिक्षक फाटे यांची भाषणे झाली. विद्यार्थ्यांची सामूहिक कवायत घेण्यात आली. डवले कॉलेजच्या प्राध्यापिकांनी सुंदर अशी देशभक्तीपर गीते सादर केली.

या कार्यक्रमाचे संचालन कॉलेजच्या वैशाली निवाने व श्रद्धा देशपांडे यांनी अतिशय उत्कृष्टरित्या केले. आभार प्रदर्शन श्वेता फाटे यांनी केले. वंदे मातरम, वातंत्र्य दिन चिरायू होवोच्या घोषणांमध्ये शाळेचे प्रांगण दुमदुमून निघाले.

### जीवनाला एक नवीन आयाम प्राप्त झाला!

जगातील सर्वोत्तम शैक्षणिक संस्था मानल्या गेलेल्या मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी एमआयटी या संस्थेत मास्टर्सची डिग्री प्राप्त करण्यासाठी नकुल तेथे दाखल झाला असून, तेथेच त्याला नुकताच अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार मिळालेले शास्त्रज्ञ सायमन जॉन्सन यांचा सहवास लाभून त्यांच्यासोबत काम करण्याचीही संधी मिळाल्याने नकुलचे भाग्य उजळल्याच्या शेकडो प्रतिक्रिया त्याचे वडील डॉ. राजेश रांदड यांना समाजमाध्यमांवर प्राप्त झाल्याने त्यांचा ऊर भरुन आला आहे. आयआयटी मुंबई येथे शिक्षण घेत असताना गेल्याच वर्षी नकुलच्या नेतृत्वातील चमूने एअरोस्पेस क्षेत्रात केलेल्या संशोधनासाठी भारत सरकारने त्यांना तब्बल वीस वर्षाच्या कालावधीसाठी पेटेन्ट बहाल केले आहे. जेईई मेन आणि अॅडव्हान्सच्या परीक्षेतही त्याने विदर्भातून टॉपर होण्याचा बहुमान मिळविला आहे. मुंबईच्या आयआयटीमध्ये त्याने एअरोस्पेस शाखेत इंजिनिअरीगची पदवी प्राप्त केली. मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी एमआयटी या संस्थेत नकुलला अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक प्राप्त करणारे सायमन जॉन्सन यांच्यासोबत कार्य करण्याची संधी मिळाली आहे त्यामुळे त्याच्या जीवनाला एक नवीन आयाम प्राप्त झाला असल्याचे त्याचे वडील डॉ. राजेश रांदड आणि आई डॉ. निर्मला रांदड यांनी सांगितले.

## कारमधून होणारी अवैध दारू वाहतूक रोखली

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**वणी, दि. १७ :** वणी पोलिसांनी धडक कारवाई करत, एका कारमधून होणारी विदेशी दारूची अवैध वाहतूक उधळून लावली आहे. या कारवाईत पोलिसांनी सहा लाख ८२ हजार ९८० रुपयांच्या मुद्देमालासह दोघांना अटक केली असून, त्यांच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शनिवारी (दि. १६) सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास, ब्राह्मणी फाटा ते निळापूर रस्त्याने एका पांढऱ्या रंगाच्या कारमधून (क्र. एमएच३४बीएफ) अवैध दारूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे, उपविभागीय पोलिस अधिकारी दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलिस निरीक्षक गोपाल उंबरकर यांच्या आदेशाने, पोलिस उपनिरीक्षक धीरज गुन्हाने आणि त्यांच्या डिबी पथकाने सापळा रचला. पोलिसांनी गाडी थांबवून तपासणी केली असता, त्यात ८२ हजार ९८० रुपये किमतीची विदेशी दारू आढळून आली. पोलिसांनी दारूसह सहा लाख रुपये किमतीची कार असा एकूण सहा लाख ८२ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी, प्रवीण शंकरराव मुन (५०) आणि विठ्ठल वासुदेव पोलशेट्टीवार (६०, दोघेही रा. घुग्गुस, जि. चंद्रपूर) या दोघांना अटक करण्यात आली आहे. या यशस्वी कारवाईमुळे अवैध दारू वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.


**परिशिष्ट -१०**

(प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी जाहीर सूचनेचा नमुना- मराठी)

**नांदुरा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५**

**जाहीर सूचना**

नांदुरा नगरपरिषदच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सुचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार, दिनांक १८/०८/२०२५ |
| २ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी, नगरपरिषद यांच्याकडे सादर कराव्यात ) | सोमवार, दिनांक १८/०८/२०२५ ते रविवार, दिनांक ३१/०८/२०२५ (दुपारी ३.०० वा. पर्यंत) |

टिप: हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीकरिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

ठिकाण:- नांदुरा
दिनांक:- १८/०८/२०२५

(मिलिंद दारोकार)
मुख्याधिकारी
नगर परिषद नांदुरा

महत्त्वाचे

## मुंबईचा गोलंदाज ऑस्ट्रेलियात चमकला!



**नवी दिल्ली:** ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये ३ टी-२० सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेतील तिसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने २ गडी राखून विजय मिळवला. यासह ही मालिका २-१ ने आपल्या नावावर केली. या सामन्यात गोलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेकडून कॉर्बिन बॉशने दमदार गोलंदाजी केली. त्याने या डावात गोलंदाजी करताना ३ गडी बाद केले. यादरम्यान त्याने असा पराक्रम करून दाखवला आहे, जो याआधी कुठल्याही गोलंदाजाला करता आला नव्हता.या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने विजयासाठी १७३ धावांचं आव्हान ठेवलं होतं. या सामन्यातील शेवटच्या २ षटकात ऑस्ट्रेलियाला विजयासाठी १० धावा करायच्या होत्या.

# आशिया चषकासाठी पाकिस्तानचा संघ जाहीर

## बाबर आझम- मोहम्मद रिझवानला टी-२० मधून डच्चू

**नवी दिल्ली: दि.१७** प्रतिनिधी

आगामी आशिया चषक २०२५ स्पर्धा सुरु व्हायला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. या स्पर्धेला ९ सप्टेंबरपासून सुरूवात होणार आहे. आगामी टी-२० वर्ल्डकप २०२५ स्पर्धा पाहता ही स्पर्धा टी-२० फॉरमॅटमध्ये खेळवली जाणार आहे. दरम्यान या स्पर्धेसाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने पाकिस्तानचा संघ जाहीर केला आहे. या स्पर्धेसाठी पाकिस्तानच्या संघाची जबाबदारी सलमान अली आगाकडे सोपवण्यात आली आहे. तर संघातील अनुभवी फलंदाज बाबर आझम आणि यष्टीरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवान यांची सुट्टी करण्यात आली आहे.

या स्पर्धेसाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने अनुभवी खेळाडूंना बाहेर ठेवून युवा खेळाडूंवर विश्वास दाखवला आहे. या संघात सलमान मिर्झा, सुफियान मुकीम आणि हसन नवाज यांना स्थान दिलं आहे. पाकिस्तानला वेस्टइंडिजविरूद्ध झालेल्या टी-२० मालिकेत पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने काही महत्वाचे निर्णय घेतले आहेत. वेस्टइंडिजविरूद्ध खेळताना हसन नवाजने दमदार कामगिरी केली होती. तर वरिष्ठ खेळाडू म्हणून हॅरीस रऊफ, शाहीन आफ्रिदी, फखर जमान यांना संघात स्थान देण्यात आलं आहे. तर यष्टीरक्षक फलंदाज म्हणून मोहम्मद रिझवानऐवजी मोहम्मद हॅरीसला संघात स्थान दिलं गेलं आहे. आशिया चषक स्पर्धेला ९ सप्टेंबरपासून सुरूवात होणार आहे. या मालिकेआधी पाकिस्तानचा संघ २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान अफगाणिस्तान आणि यूएईविरूद्ध तिरंगी मालिका खेळणार आहे. या स्पर्धेत १४ सप्टेंबरला भारतीय संघाचा सामना पाकिस्तानविरूद्ध होणार आहे. मात्र, भारतीय संघ पाकिस्तानसोबत खेळणार की नाही हे अजूनही कळू शकलेलं नाही. पाकिस्तानचा पहिला सामना १२ सप्टेंबरला ओमानविरूद्ध होणार आहे.



### पाकिस्तानचा संघ:

मोहम्मद हारिस (यष्टीरक्षक), सलमान अली आगा (कर्णधार), अबरार अहमद, फहीम अश्रफ, फखर झमान, हरिस रउफ, हसन अली, हसन नवाज,मोहम्मद वसीम ज्युनियर, साहिबजादा फरहान, शाहीन शाह आफ्रिदी, सुफयान मुकीम, सॅम मिर्झा अयुब, हुसेन तलत, खुशदिल शाह, मोहम्मद नवाज आणि सलमान

# सूर्यकुमारची झाली फिटनेस चाचणी



**नवी दिल्ली: दि.१७** प्रतिनिधी

आशिया चषक संघ निवडीआधी भारतीय टी- २० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने शनिवारी बेंगळुरू येथील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये फिटनेस चाचणी उत्तीर्ण केली आहे. सूर्यकुमार शेवटचा सामना आयपीएलमध्ये खेळला.

तो प्लेअर ऑफ द सिरीज ठरला होता. या आक्रमक फलंदाजाने जूनमध्ये जर्मनीतील म्यूनिख येथे पोटाच्या खालच्या उजव्या भागात स्पोर्टस हर्नियाची शस्त्रक्रिया केली होती.

बीसीसीआयच्या एका सूत्राने पीटीआयला सांगितले की, शस्त्रक्रियेनंतर पनरागमन करण्यापर्वी फिटनेस चाचणी अनिवार्य असते. सूर्यकुमारने फिटनेस चाचणी उत्तीर्ण केली. फिटनेस मिळवल्यानंतर सूर्या मंगळवारी मुंबईत होणाऱ्या निवड समितीच्या बैठकीला उपस्थित राहील. आशिया चषकषाचे आयोजन यूएईत ९ सप्टेंबरपासून होणार आहे.

## नीरज चोप्राच्या पत्नीचे टेनिसला अलविदा



भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्राने जानेवारी २०२५ मध्ये लग्नगाठ बांधली. नीरज चोप्राची पत्नी हिमानी मोर ही टेनिसपटू आहे. तिने तिच्या करियरबाबत मोठा निर्णय घेतला आहे. हिमानीने टेनिसपटू म्हणून काम केलं आहे आणि आता तिने या खेळाला अलविदा म्हणण्याचा निर्णय घेतला आहे. २०१८ मध्ये आंतरराष्ट्रीय पदार्पण करणाऱ्या हिमानी हिच्या वडिलांनी ही माहिती दिली आहे.महिला एकेरीत हिमानीची कारकिर्दीतील सर्वोत्तम रँकिंग ४२ आहे. तिने पदार्पणाच्या पहिल्याच वर्षात ही कामगिरी केली. एकेरी व्यतिरिक्त, तिने दुहेरी सामने देखील खेळले आणि यातील तिची सर्वोच्च रँकिंग २७ आहे हिमानीच्या वडिलांनी सांगितलं आहे की तिला १.५ कोटी रुपयांची नोकरीची ऑफर देखील होती जी तिने नाकारली. हिमानीने दिल्ली विद्यापीठातून राज्यशास्त्रात पदवी मिळवली आहे.

## मॅक्सवेलचा 'बिग शो'



**केर्न्स दि.१७** प्रतिनिधी

ग्लेन मॅक्सवेलच्या स्फोटक अर्धशतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या आणि निर्णायक टी-२० सामन्यात थरारक विजय मिळवला. १७३ धावांच्या आव्हानात्मक लक्षाचा पाठलाग करताना एका क्षणी सामना गमावण्याच्या स्थितीत असलेल्या ऑस्ट्रेलियाला मॅक्सवेलने अवघ्या ३६ चेंडूंत नाबाद ६२ धावांची खेळी करत एक चेंडू आणि दोन गडी राखून विजय मिळवून दिला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने तीन सामन्यांची मालिका २-१ ने जिंकली.१७३ धावांच्या लक्षाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवात चांगली झाली. कर्णधार मिचेल मार्शने महत्त्वपूर्ण अर्धशतक झळकावले. मात्र, अखेरच्या क्षणी मॅक्सवेलने दाखवलेला 'बिग शो'च सामन्याचा निर्णायक क्षण ठरला. या पराभवामुळे महत्त्वाच्या सामन्यांमध्ये अखेरच्या क्षणी सामना गमावण्याची दक्षिण आफ्रिकेची समस्या पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

तसे पाहता, मधल्या षटकांमध्ये कॉर्बिन बॉशच्या (३/२६) भेदक गोलंदाजीमुळे संघाची अवस्था १४ व्या षटकात ६ बाद १२२ अशी झाली होती. सामना पूर्णपणे दक्षिण आफ्रिकेच्या बाजूने झुकलेला दिसत होता. १९ व्या षटकात बॉशने दोन चेंडूंवर दोन बळी घेतल्याने ऑस्ट्रेलियाच्या अडचणीत मोठी वाढ झाली.

अखेरच्या षटकात ऑस्ट्रेलियाला विजयासाठी ९ धावांची गरज होती आणि स्ट्राईकवर मॅक्सवेल होता. लुंगी एन्गिडीच्या गोलंदाजीवर मॅक्सवेलने संयम आणि आक्रमकता यांचा सुरेख मेळ साधला.

## बेबी एबीचे वादळी अर्धशतक

**नवी दिल्ली: दि.१७** प्रतिनिधी

दक्षिण आफ्रिकेच्या ताफ्यातील युवा बॅटर डेवाल्ड ब्रेविस याच्या भात्यातून ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेत सलग दुसरी वादळी खेळी पाहायला मिळाली. शतकी खेळीनंर या पठ्ठ्यानं कॅजलीज स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध विक्रमी अर्धशतक झळकावले. अवघ्या २२ चेंडूत अर्धशतक झळकावत त्याने ११ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे. ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या तिसऱ्या टी -२० सामन्यात डेवाल्ड ब्रेविस याने एरॉन हार्डीच्या एका षटकात चार षटकार मारले. नेथन एलिस याने ब्रेविसच्या वादळी खेळीला ब्रेक लावला. त्याने त्याने २६ चेंडूत ५३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. २२ चेंडूतील अर्धशतकासह डेवाल्ड ब्रेविस हा ऑस्ट्रेलियन मैदानात कांगारुंच्या संघाविरुद्ध सर्वात जलद अर्धशतक झळकवणारा फलंदाज ठरलाय. याआधी हा विक्रम इंग्लंडच्या रवी बोपाराच्या नावे होता. इंग्लंडच्या ताफ्यातून खेळताना २०१४ मध्ये होबार्टच्या मैदानात त्याने २३ चेंडूत अर्धशतक ठोकले होते. जेपी ड्युमिनी याने इथं ३१ चेंडूत अर्धशतक पूर्ण केल्याचा रेकॉर्ड आहे. २००९ मध्ये त्याच्या भात्यातून ही खेळी आली होती. एबी डिव्हिलियर्सप्रमाणेच मैदानातील कानाकोपऱ्यात फटकेबाजी करण्याची क्षमता असल्यामुळे डेवाल्ड ब्रेविसला बेबी एबी या नावाने ओळखले जाते. ऑस्ट्रेलिया विरुद्ध सलग दोन सामन्यात त्याने धमाकेदार इनिंग खेळून आपल्यातील धमकही दाखवलीये. ऑस्ट्रेलियाच्या सर्व गोलंदाजांची त्याने धुलाई केली. पण नेथन एलिस विरुद्ध तो कमी पडला. ब्रेविसनं आतापर्यंत दोन डावात या ऑस्ट्रेलियन गोलंदाजाचे पाच चेंडू खेळले आहेत.

## जसप्रीत बुमरा आशिया कपसाठी उपलब्ध



आशिया कपमध्ये भारताचा पहिला सामना १० सप्टेंबर रोजी संयुक्त अरब अमिरातीविरुद्ध होईल. त्यानंतर १४ सप्टेंबर रोजी भारत आपला पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध खेळेल. मात्र, भारत हा सामना खेळेल की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. आशिया कपसाठी निवडला जाणारा १५ सदस्यीय भारतीय संघ पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२६ साठीही प्रमुख दावेदार मानला जाईल. त्यामुळे या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**नवी दिल्ली: दि.१७** प्रतिनिधी

आशिया कप २०२५ येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. भारतीय क्रिकेट संघ १० सप्टेंबरपासून खेळणार आहे. अजीत अगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समिती १९ सप्टेंबरला १५ खेळाडूंच्या संघावर चर्चा करेल. यात काही खेळाडूंची निवड होईल, तर काहींना संघातून बाहेर जावे लागेल.भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह ने बीसीसीआयला आपल्या उपलब्धतेबाबत माहिती दिली आहे. सूत्रांनुसार, बुमराहने निवड समितीला कळवले आहे की, तो आशिया कपसाठी उपलब्ध असेल. त्यामुळे त्याची संघात निवड जवळपास निश्चित मानली जात आहे. इंडियन एक्सप्रेसच्या सूत्राने सांगितले, ''बुमराहने निवड समितीला सांगितले आहे की, तो आशिया कपसाठी खेळू शकतो. पुढील आठवड्यात निवड समिती यावर चर्चा करेल.''बुमराहने यापूर्वी शेवटचा टी-२० सामना टी विश्वचषक २०२४ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळला होता. हा सामना अंतिम सामना होता, ज्यामध्ये भारताने रोमांचक विजय मिळवत विश्वचषकावर कब्जा केला होता. त्यानंतर बुमराहने कोणताही टी-२० सामना खेळलेला नाही. आता तो थेट आशिया कप २०२५ मध्ये मैदानात उतरू शकतो.

## सॅमसंग गॅलेक्सी एस २४ अल्ट्रा ५० हजारांनी स्वस्त

सॅमसंग गॅलेक्सी एस २४ अल्ट्रा हा सॅमसंगचा प्रीमियम फ्लॅगशिप स्मार्टफोन आता तब्बल ५० हजारांपर्यंत स्वस्त मिळत आहे. २०० मेगापिक्सेल कॅमेरा आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स फिचर्ससह हा फोन बाजारात दाखल झाला. परंतु, आता हा फोन लाँचिंग किंमतीपेक्षा खूपच कमी दरात खरेदीसाठी उपलब्ध झाला आहे. सध्या हा फोन सध्या १२ जीबी रॅम आणि २५६ जीबी स्टोरेज असलेल्या व्हेरिएंटमध्ये उपलब्ध आहे. ॲमेझॉन आणि फ्लिपकार्टवर या फोनच्या किंमतीत सुमारे १५ हजारापर्यंतचा फरक पाहायला मिळतोॲमेझॉन वर हा फोन सध्या ९७ हजार ९९९ रुपयांत उपलब्ध आहे, ज्याची मूळ किंमत १ लाख ३४ हजार ९९९ रुपये आहे. म्हणजेच, ग्राहकांना सुमारे ३३ हजारांपर्यंत सवलत मिळत आहे. याशिवाय, ग्राहकांना तीन हजारांपर्यंत कॅशबॅक ऑफरही दिली जात आहे. तर, फ्लिपकार्टने या फोनच्या किंमतीत थेट ५३ हजारांची कपात केली आहे. त्यामुळे ग्राहकांना हा फोन अवघ्या ८१ हजार ८८९ रुपयांत खरेदी करण्याची संधी आहे. शिवाय, या फोनवर ५ टक्के कॅशबॅक, एक्स्चेंज बोनस आणि ईएमआय पर्याय देखील उपलब्ध आहेत.सॅमसंगचा हा फ्लॅगशिप फोन ६.८-इंचाचा क्वाड एचडी+ डिस्प्लेसह येतो,

# इथेनॉलनंतर आता डिझेलमध्ये बायोफ्युएल मिसळणार

**नवी दिल्ली : दि.१७** प्रतिनिधी

देशभरात सध्या पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण केल्याने होत असलेल्या दुष्परिणामांचा मुद्दा गाजत असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी डिझेलमध्येही १० टक्के बायोफ्युअल मिक्स करणार असल्याची घोषणा करून टाकली आहे. यामुळे आता डिझेल वाहनांच्या प्रेमींमध्ये खळबळ उडण्याची शक्यता आहे.केंद्र सरकार कच्च्या तेलावरील खर्च कमी करण्यासाठी डिझेलमध्ये १० टक्के आयसोब्यूटानॉल मिसळण्याचा विचार करत असल्याचे गडकरी यांनी सांगितले. पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉलेशनचे लक्ष्य यशस्वी साध्य केल्यानंतर आता डिझेलमध्ये बायो इंधन मिसळण्याचे पाऊल ऊर्जा आणि कृषी क्षेत्राला नवीन दिशा देणारे ठरेल असे गड्करी म्हणाले. आयसोब्युटेनॉलवर संशोधन, विकास आणि मानके निश्चित करण्याचे काम सुरू सध्या सुरु आहे. ते पूर्ण झाले की हा प्रस्ताव पंतप्रधान आणि मंत्रिमंडळासमोर मांडला जाणार आहे, असे ते म्हणाले. भारतात डिझेलचा वापर हा पेट्रोलच्या दुप्पटीहून जास्त आहे.





यामुळे इंधन मिश्रण योजनेत डिझेलचा समावेश करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्यातील एका कार्यक्रमात गडकरी बोलत होते.

भारतात आता तांदूळ, गहू, ऊस आणि मक्याचे अतिरिक्त उत्पादन होते. या अतिरिक्त उत्पादनाचे जैवइंधनात रूपांतर केल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे. मक्याचे बाजारभाव तिप्पट वाढले आहेत. बिहारसारख्या राज्यात लागवड क्षेत्रही यामुळे वाढल्याचे गडकरी म्हणाले. उसाच्या साखर कारखान्यांनी इथेनॉल निर्मिती केल्याने व विकल्याने त्यांना उस उत्पादक शेतकऱ्यांना ते वेळेत पैसे देऊ लागले आहेत. इथेनॉलचा वापर इंधनात केला नसता तर ७५ टक्के साखर उद्योग संपला असता, असा दावा गडकरी यांनी केला आहे.

## ६६०० कोटींची गुंतवणूक | पालघर, रायगड, सिंधुदुर्ग येथे जागांची तपासणी

# राज्यात सहा शिपयार्ड क्लस्टर होणार

**नवी दिल्ली : दि.१७** प्रतिनिधी

महाराष्ट्र समुद्री क्षेत्रात क्रांतिकारी पाऊल टाकत असून राज्य सरकारने राज्याच्या सागरी विकासाला गती देण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात सहा ठिकाणी सागरी शिपयार्ड क्लस्टर्स उभारले जाणार असून, यासाठी अंदाजे ६,६०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

या प्रकल्पांमुळे २०३० पर्यंत सुमारे ४०,००० थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहेमहाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड () या क्षेत्रासाठी प्रमुख संस्था म्हणून काम करत असून, सध्या सहा संभाव्य किनारपट्टीच्या ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात नंदगाव (पालघर), दिघी



(रायगड) आणि विजयदुर्ग (सिंधुदुर्ग) या तीन ठिकाणांपैकी एका ठिकाणी शिपयार्ड क्लस्टर विकसित केला जाणार आहे. त्यासाठी लवकरच सखोल तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी सल्लागार नेमण्यात येणार आहे.राज्य सरकारचा उद्देश महाराष्ट्राला 'सागरी उद्योगातील जागतिक हब' म्हणून विकसित करणे आहे.

या क्लस्टरद्वारे देशांतर्गत जहाजबांधणी, निर्यातक्षम दुरुस्ती सेवा, रिसायकलिंग व तंत्रज्ञानावर आधारित सहवर्ती उद्योगांना चालना मिळणार आहे. प्रथम क्लस्टरच्या यशानुसार इतर पाच ठिकाणांवर विकास हळूहळू सुरू केला जाईल.

या क्लस्टरमध्ये जहाजबांधणी, दुरुस्ती, रिसायकलिंग आणि संलग्न सेवा यांचा समावेश असेल. राज्य सरकारने यासाठी एप्रिल २०२५ मध्ये ''शिपबिल्डिंग, शिप रिपेअर आणि शिप रिसायकलिंग धोरण'' जाहीर केले आहे.महाराष्ट्र सरकारच्या या योजनेमुळे राज्यातील किनारपट्टीच्या विकासाला गती मिळेल, स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि भारताला स्वदेशी जहाजबांधणी क्षेत्रात अधिक स्वावलंबी बनवण्याच्या दिशेने ही योजना महत्त्वपूर्ण ठरेल.

## तेल कंपन्यांना २५ टक्के नफा



**नवी दिल्ली : दि.१७** प्रतिनिधी

रशियाकडून भारत स्वस्त दराने कच्चे तेल खरेदी करतोय म्हणून अमेरिकेने म्हणजेच त्यांचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादले आहे. शिवाय आणखी कर आणि दंड लादला जाणार आहे. परंतू, या कच्च्या तेलाचा नेमका फायदा कोणाला होतोय? ट्रम्प यांच्या या ब्लॅकमेलिंगमुळे ज्या सामान्यांचे रक्त उसळत आहे, त्यांचा तर नाहीच होत आहे. गेल्या तीन वर्षांपासून जगात ज्या किंमतीला कच्चे तेल विकले जाते त्याच्यापेक्षा १५ ते ३० डॉलर प्रति बॅरल दराने रशिया भारताला तेल देत आहे. या डिस्काऊंटचा ६५ टक्के फायदा रिलायन्स, नायरा या खासगी कंपन्यांसह इंडियन ऑईल, भारत पेट्रोलअमसारख्या सरकारी कंपन्यांना होत आहे.

अजिंक्य भारत
# आपलं नागपूर
सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com


## महत्वाचे

### हत्तीनाला पुलावरील वाहतूक बंद

**नागपूर :** गंगाबाई घाट येथील हत्तीनाला पुलाचे बांधकाम करण्यात येत असल्यामुळे २० ऑगस्ट २०२५ पर्यंत पुलावरील वाहतूक बंद राहणार आहे. नमूद रस्त्यावरील वाहतूक ग्रेट नाग रोड तसेच सीए मार्गाने वळविण्यात आली आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी यासंदर्भात आदेश निर्गमित केला असून, हा आदेश येत्या २० ऑगस्टपर्यंत अंमलात राहणार आहे. आदेशानुसार हत्ती नाला पुलाचे बांधकाम करण्यासाठी कोणत्याही वाहतुकीस पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. शहर वाहतूक पोलिस विभागाला या अनुषंगाने महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ (मुंबई अधिनियम क्र.२२)चे कलम अन्वये वाहतूक नियमनाकरिता योग्य ती कार्यवाही / उपाययोजना करावी लागणार आहे.

### दुचाकी पार्क केल्याने मारहाण

**नागपूर :** दुचाकी उभी केल्याच्या (पार्क) केल्याच्या लहानश्या कारणावरून दोन भावांनी संगनमत करून एका मारहाण केली गंभीररित्या जखमी झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले.
माहितीनुसार, भारतीय स्वातंत्र्या पहाटे (१५ ऑगस्ट) ३.१५ च्या सुमारास वाडी ठाण्याच्या हद्दीतील दीक्षाभूमी, हेटी, वॉर्ड क्र. २ येथील तक्रारदार राजेश उमरावजी नारनवरे (वय ५०) आणि त्यांचा भाऊ ईश्वर नारनवरे यांनी त्यांच्या घरासमोर दुचाकी पार्क केली होती. यावरून त्यांच्या शेजारी राहणारे आरोपी शुभम गजभिये (वय २५) आणि पवन गजभिये (वय १९) यांनी संगनमत करून पार्किंगच्या कारणावरून त्यांना शिवीगाळ सुरू केली. यावेळी ईश्वरला लाकडी दांड्याने मारहाण करून त्याला गंभीर जखमी केले. यानंतर जखमीला उपचारासाठी मेयो हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. राजेश नारनवरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार वाडी ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२४, ५०४ आणि ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

# 'एआय'ने लावला आरोपीचा शोध

## नागपूर पोलिस थेट आरोपीच्या घरी, कोणताही सुगावा नसताना 'हिट अँड रन'चा गुन्हा उघड

**नागपूर, दि. १७ प्रतिनिधी**



देवलापारजवळील 'हिट अँड रन' प्रकरणात, कोणताही सुगावा नसताना नागपूर पोलिसांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून आरोपी ट्रकचालकाला थेट उत्तरप्रदेशातून अटक केली आहे. सत्यपाल राजेंद्र (वय २८) असे आरोपीचे नाव असून, त्याच्या घरातूनच पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या.

१० ऑगस्ट रोजी, मोरफाटा परिसरात एका भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने ग्यारसी यादव या महिलेचा मृत्यू झाला होता. अपघातानंतर ट्रकचालक पसार झाला होता. या प्रकरणात आरोपी किंवा वाहनाबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नव्हती. मात्र, नागपूरचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्या मार्गदर्शनाखाली, तपास पथकाने 'एआय मार्व्हल' या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. या तंत्रज्ञानाने वाहनाचा रंग लाल असल्याचे आणि ते टाटा कंपनीचे असल्याचे ओळखले. याच धाग्याच्या आधारे, पोलिसांनी वाहनाचा क्रमांक (यूपी १४/एमटी २१९०) शोधून काढला आणि आरोपी चालक सत्यपाल राजेंद्र याला १६ ऑगस्ट रोजी त्याच्या उत्तरप्रदेशातील घरातून अटक केली. या कारवाईमुळे, गुन्हे तपासात 'एआय' तंत्रज्ञानाचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अमित यादव यांच्या तक्रारीवरून, देवलापार पोलिसांनी ११ ऑगस्ट २०२५ रोजी गुन्हा क्रमांक ३५४/२०२५ नोंदवला. यामध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८१ आणि १०६ (११), तसेच मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४ आणि १३४(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सुरुवातीला आरोपी किंवा वाहनाबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसतानाही, पोलिसांनी वेगाने तपास करून आरोपीला जेरबंद केले.

'एआय' ठरले तपासातील 'गेम चेंजर' या गुन्ह्यात पोलिसांकडे कोणताही ठोस सुगावा नव्हता. मात्र, त्यांनी 'अपघात झाला' हाच पुरावा मानून, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने आरोपी आणि वाहन शोधून काढले. गुन्हे तपासात 'एआय' तंत्रज्ञानाचा किती प्रभावीपणे वापर करता येतो, याचे हे एक उत्तम उदाहरण ठरले आहे, अशी प्रतिक्रिया पोलीस दलातून व्यक्त होत आहे.

### असा लागला आरोपीचा माग...

**या गुन्ह्यात पोलिसांकडे 'अपघात झाला' यापलीकडे कोणताही पुरावा नव्हता. मात्र, तपास पथकाने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) मदतीने सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण केले. 'एआय'ने वाहनाचा रंग लाल असल्याचे आणि ते 'टाटा' कंपनीचे असल्याचे ओळखले. या दोन महत्त्वाच्या धाग्यांवरून, पोलिसांनी वाहनाचा क्रमांक शोधून काढला आणि थेट आरोपीच्या घराचा पत्ता मिळवला. या तंत्रज्ञानामुळेच हा 'अंधारा'तील गुन्हा उघडकीस आला.**

### रक्षाबंधनासाठी जाताना काळाचा घाला

**मध्यप्रदेशातील अमित भुरा यादव हे पत्नी ग्यारसीसोबत रक्षाबंधनासाठी आपल्या गावी जात होते. १० ऑगस्ट रोजी दुपारी, देवलापारजवळील मोरफाटा परिसरात त्यांच्या दुचाकीला भरधाव ट्रकने धडक दिली. यात ग्यारसी यादव यांचा ट्रकच्या चाकाखाली आल्याने जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर, पतीने मदतीसाठी केलेल्या आर्त हाकेचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने, माणुसकीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.**

# विदर्भ इन्फोटेक आता क्षय रुग्णांचे पालक



**नागपूर, दि. १७ प्रतिनिधी**

क्षयरोग ग्रस्त रुग्णांना उपचारादरम्यान योग्य पोषण मिळावे या उद्देशाने, केंद्र सरकारच्या 'निक्षय मित्र'अभियानांतर्गत विदर्भ इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेडने क्षय रुग्णांचे पालकत्व घेतले आहे. त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या २०० रुग्णांना पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले.

विदर्भ इन्फोटेकने 'निक्षय मित्र' बनून मनपाच्या २०० टीबी रुग्णांना त्यांच्या उपचारादरम्यान दर महिन्याला पोषण आहार किट देण्याची तयारी दर्शवली आहे. यामुळे उपचाराचा कालावधी पूर्ण होईपर्यंत संबंधित रुग्णांना नियमितपणे पौष्टिक आहार उपलब्ध होणार आहे. पोषण आहार किट वाटपाचा कार्यक्रम 'व्हीआयपीएल'च्या कार्यालयात पार पडला. यावेळी व्हीआयपीएलचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत उगेमुगे, श्रेयस उगेमुगे आणि नागपूर शहराच्या टीबी अधिकारी डॉ. शिल्पा जिचकार यांच्या हस्ते रुग्णांना किटचे वाटप करण्यात आले. मनपाच्या गायत्री नगर येथील आरोग्यवर्धिनी केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अपर्णा माडणकर, संजीव कुमार,उत्तम मधुमटके, अरविंद चव्हाण,रुपाली गोडे आणि ज्योत्स्ना गजभिये यांची उपस्थिती होती.

# प्रहार मिलिटरी स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन सोहळा

## विद्यार्थ्यांनी केले देशभक्तीचे सादरीकरण

**नागपूर, दि. १७ प्रतिनिधी**

'वंदे मातरम्' आणि 'भारत माता की जय'च्या घोषणांनी दुमदुमलेल्या वातावरणात प्रहार मिलिटरी स्कुलमध्ये स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साह, स्वाभिमान आणि देशभक्तीच्या जल्लोषात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्या वंदना कुलकर्णी यांच्या हस्ते भारतमातापूजनाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी तिरंगा फडकावत राष्ट्रगीताच्या सूरात एकजुटीचा संदेश दिला. देशप्रेमाची भावना फक्त मनात न ठेवता कृतीत आणणे हेच खरे स्वातंत्र्य साजरे करण्याचे सार आहे, असे वक्तव्य प्राचार्या कुलकर्णी यांनी केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर करून प्रेक्षकांच्या मनात देशप्रेमाची ज्योत चेतवली. स्वातंत्र्य सैनिकांच्या वेशभूषा परिधान केलेल्या मुलामुलींनी देशाच्या विविधतेत एकतेचे दर्शन घडवले. नृत्यप्रस्तुतींनी सभागृहात उपस्थित प्रत्येकाच्या मनात देशभक्ती उफाळून आली. शिक्षकांनी 'जयोस्तुते'हे प्रेरणादायी गीत एकत्रितपणे सादर केले. विद्यार्थी, पालक आणि उपस्थित मान्यवरांनी टाळ्यांचा कडकडाट करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे केले. शेवटी 'वंदे मातरम्'च्या गजरात आणि तिरंग्याला सलाम करून सोहळ्याची सांगता झाली.

# जनजागृती मोहीम




**रामटेक:आदिवासीबहुल क्षेत्र असलेल्या देवलापार पोलिस ठाण्यातील सहाय्यक पोलिस निरीक्षक नारायण तुरकुंडे यांच्या मार्गदर्शनात स्वातंत्र्यदिनी अमली पदार्थविरोधी जनजागृती मोहीम राबविण्यात आली. ठाणेदारांनी नागरिकांना अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबत सखोल मार्गदर्शन केले नागरिकांसह गोपनिय विभागाचे मनीष चौकसे, पोलिस कर्मचारी उपस्थित होते.**

# विद्युत सहायकांची परिमंडळनिहाय निवड यादी जाहीर

## महावितरणकडून कागदपत्रांची पडताळणी बुधवारपासून

**नागपूर, दि. १७ प्रतिनिधी**

महावितरणमध्ये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या ५ हजार ३८१ उमेदवारांची व संबंधित परिमंडलांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. या सर्व उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये २० ते २२ ऑगस्ट दरम्यान करण्यात येणार आहे. या उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर नमूद परिमंडल कार्यालयांमध्ये मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे तसेच अद्ययावत ओळखपत्राच्या मूळ प्रतीसह हजर राहणे अनिवार्य आहे.



महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये विद्युत सहायक या पदासाठी २० ते २२ मे दरम्यान ऑनलाईन क्षमता चाचणी घेतली होती. यात निवड झालेल्या उमेदवारांची यादी ३० जुलैला सविस्तर माहिती व सूचनेसह कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर १४ ऑगस्टला निवड यादीतील उमेदवार व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी जाहीर करण्यात आली. येत्या २० ते २२ ऑगस्ट दरम्यान विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जामधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे व प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये होणार आहे. विद्युत सहायक पदी निवड झालेल्या उमेदवारांची मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांची पडताळणी केल्यानंतर जे उमेदवार पात्र होतील त्यांच्या नियुक्तीबाबत संबंधित परिमंडलामध्ये पुढील कार्यवाही करण्यात येईल. याबाबतची सर्व माहिती महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### ...तर निवड रद्द

**संबंधित परिमंडलांमध्ये मूळ कागदपत्रांची पडताळणी सुरू होईल. नमूद दिवशी काही कारणास्तव पडताळणी पूर्ण झाली नाहीतर दुसऱ्या दिवशी करण्यात येईल. तथापि, सर्व मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह संबंधित उमेदवारांनी स्वत: हजर राहणे आवश्यक आहे. जे उमेदवार कागदपत्रे पडताळणीसाठी हजर राहणार नाही त्यांची निवड रद्द समजली जाईल व भविष्यात त्यांच्या कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, असे महावितरणने स्पष्ट केले आहे.**

# महावितरणमध्ये स्वातंत्र्यदिनी देशभक्तिपूर्ण वातावरणात ध्वजारोहण

## प्रभातफेरीच्या माध्यमातून सौरऊर्जाबाबत जनजागृती

**नागपूर, दि. १७ प्रतिनिधी**

देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनी नागपूर येथे महावितरणच्या विद्युत भवन कार्यालयाच्या प्रांगणात मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानिमित्ताने प्रभातफेरी आणि रॅलीच्या माध्यमातून सौरऊर्जाबाबत जनजागृती करण्यात आली.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते 'सौर ग्राम दिन' या महत्त्वाकांक्षी अभियानाचाही शुभारंभ करण्यात आला. ग्रामीण भागातील नागरिकांना सौरऊर्जेचे महत्त्व पटवून देत सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे हा उद्देश आहे. मुख्य अभियंता दोडके यांनी हिरवा झेंडा दाखवून 'सौर चित्ररथा'ला



रवाना केले. हा चित्ररथ नागपूरच्या सिव्हिल लाईन्स भागात फिरून नागरिकांना 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' यांसारख्या क्रांतिकारी सौर योजनांची माहिती देण्यात आली या अभियानाचा भाग म्हणून महावितरणचे वरिष्ठ अधिकारी आणि अभियंते यांनी थेट ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींमध्ये गावकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी ग्रामसभांमध्ये उपस्थित राहून योजनांची माहिती दिली आणि त्याच ठिकाणी अर्ज व कागदपत्रेही स्वीकारली, जेणेकरून जास्तीत जास्त लोकांना या योजनांचा लाभ घेता येईल. नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या नेतृत्वाखालील सर्व अधिकारी आणि कर्मचारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामसभांमध्ये सहभागी झाले. याशिवाय, प्रभातफेरी आणि रॅलीच्या माध्यमातूनही सौरऊर्जाबाबत जनजागृती करण्यात आली. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिक ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलत आहेत.

## निधन

### नत्थू बोडखे

**नागपूर:** रिंग रोडवरील इम्प्रेस मिल कॉलनी श्रीनगर नत्थुजी लक्ष्मण बोडखे निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८१ वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी आणि बराच मोठा आप्त परिवार आहे. नत्थू बोडखे यांच्या पार्थिवावर रविवारी मानेवाडा स्मशानभूमीत अंतिम संस्कार पार पडले

### सुशांत सरदारे

**नागपूर :** लघुवेतन कॉलनी येथील रहिवासी सुशांत सेवकराम सरदारे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ५६ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर वैशाली निर्वाणघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्तपरिवार आहे.

**हर घर तिरंगा २०२५** | **महानगरपालिका सदैव कलाकारांच्या पाठीशी : आयुक्त**

# खुले कलादान ...नागपुरात 'कलाकार कट्टा'चे उद्घाटन

**नागपूर, दि. १७**

**महानगरपालिका सदैव कलाकारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील,अशी ग्वाही आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिली. विद्यार्थ्यांच्या कलेची प्रशंसा करत त्यांनी कलाकारांचे महत्त्व अधोरेखित केले.**



केंद्र व राज्य शासनाच्या 'हर घर तिरंगा २०२५' अभियानांतर्गत व मनपाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाजवळ शहरातील कलाकारांसासाठी पहिल्यांदाच उभारण्यात आलेल्या 'कलाकार कट्टा' चे उद्घाटन नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते शुक्रवारी पार पडले. महाराष्ट्र राज्याचे कला संचालक डॉ. किशोर इंगळे, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय नागपूरचे अधिष्ठाता डॉ.विश्वनाथ साबळे, लक्ष्मीनगर झोनचे सहायक आयुक्त सतीश चौधरी, कार्यकारी अभियंता अल्पना पाटणे, रविंद्र बुंधाडे, उपअभियंता राजेंद्र जिवतोडे, कनिष्ठ अभियंता अनंत मानकर, महाविद्यालयाचे प्रा. पंकज इटकेलवार, अधिव्याख्याता संजय जठार, विनोद चव्हाण, माजी विद्यार्थी अभिजीत मौंदेकर यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी व कलाप्रेमी उपस्थित होते.

शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाजवळ मनपाद्वारे पहिल्यांदाच शहरातील कलाकारांसासाठी 'कलाकार कट्टा' हे खुले कलादान उपलब्ध करून देण्यात आले आहे. चित्रकला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांद्वारे जनमनात राष्ट्रीय भावना जागृत व्हावी, या उद्देशाने ७९ व्या स्वातंत्र्य दिनी 'भारताची यशोगाथा' कलाकृतीचे चित्रण करण्यात आले आहे. विद्यार्थी आणि विद्यार्थी समितीतर्फे काढण्यात आलेल्या ३० बाय ४ फूट असे भव्य कॅन्व्हास (म्युरल) चित्रात भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदान देणारे क्रांतिकारक राष्ट्रपिता महात्मा गांधी, वीर सावरकर व इतर आणि स्वातंत्र्योत्तर कृषी, विज्ञान, साहित्य, कला, क्रीडा, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या लता मंगेशकर, डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम, सचिन तेंडुलकर, कल्पना चावला, डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांच्यासह अनेक भारतीयांचे चित्र साकारून त्यांना अनोखी मानवंदना देण्यात आली.

### शस्त्र बाळगणारा अटकेत

**नागपूर, दि. १७ :** विनापरवानगी शस्त्र बाळगणाऱ्याला अटक करण्यात आली साहिल संजू डिका असे त्याचे नाव आहे पोलिसांनुसार, गणेशपेठ पोलिसांच्या पथकाला १६ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास जाधव चौक, राहुल कॉम्प्लेक्ससमोर एका व्यक्तीकडे शस्त्र असल्याची माहिती मिळाली होती. घटनास्थळी पोलिस पोहोचताच आरोपीने पळण्याचा प्रयत्न केला यावेळी त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष घेतलेल्या अंगझडतीत त्याच्याजवळ सुमारे लोखंडी चाकू आढळून आला. यानंतर गणेशपेठ पोलिस ठाण्यात त्याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम कलम ४ आणि २५ तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच, आरोपीला तत्काळ अटक करण्यात आली.

Mrs Sunita Jatal Madam's
SHREE G-SQUARE GUIDANCE
9767930223
11th/ 10th NEET /JEE /MHT- CET STATE BOARD
8th, 9th, 10th STATE BOARD / CBSE FOUNDATION
•SBI बँकेच्या बाजूला भारत पेट्रोल पंप समोर,कौलखेड अकोला.
•चैतन्य कॉलनी,एकविरा ग्राउंड मागे, गौरक्षण रोड,अकोला

अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

OM COACHING CLASSES
COMPUTER SCIENCE
11th & 12th
Behind Tathod Mangal Karyalaya, Shastri Nagar, Akola,

## महत्त्वाचे

### शिवभक्तांना अकराशे किलो खिचडीचा महाप्रसाद

**अकोला :** श्रावण सोमवारच्या शेवटच्या सोमवारी शिवभक्तांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेस अकोला महानगरचे कार्याध्यक्ष यश ओमप्रकाश सावंल यांच्या पुढाकारातून गांधी रोड येथे तब्बल अकराशे किलो खिचडीचे वाटप करण्यात येणार आहे. राजराजेश्वर मंदिरात दर्शनासाठी येणारे भाविक, कावडधारी तसेच पालखीतील भक्त या महाप्रसादाचा लाभ घेऊ शकतील. यावेळी कावडधारी व पालख्यांचे जंगी स्वागत करण्यात येणार आहे. या उपक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व सावंल मित्रपरिवार मोठ्या संख्येने सहभागी होणार आहे. हा धार्मिक आणि सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून भक्तांना आनंद देण्याचा प्रयत्न असल्याचे यश सावंल यांनी सांगितले.

### गणेशघाटावरील विसर्जन टाक्यांचे नूतनीकरण

**अकोला :** श्री गणपती बाप्पाच्या मूर्तींचे विसर्जन स्वच्छ पाण्यात व्हावे, या उद्देशाने अकोला महापालिकेचे माजी महापौर मदन भरगड यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या खोलेश्वर येथील गणेशघाटावरील विसर्जन टाक्यांचे नूतनीकरण अखेर सुरू झाले आहे. महापालिका प्रशासनाकडून दि. १४ ऑगस्ट रोजी या कामाला सुरुवात करण्यात आली. तब्बल १८ वर्षांनंतर या आठही विसर्जन टाक्यांचे नूतनीकरण होत असल्याने परिसरातील नागरिक आणि गणेशभक्तांनी समाधान व्यक्त केले आहे. गणेशोत्सव काळात प्रदूषणमुक्त विसर्जनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी हे पाऊल उचलण्यात आले असून यामुळे पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यास मोठी मदत होणार आहे.

### सायबर सुरक्षा कार्यशाळा

**अकोला :** श्री शिवाजी विद्यालय, मुख्य शाखा येथे इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा विषयक कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. शाळेचे मुख्याध्यापक विजय ठोकळ यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापक हिम्मतराव गवई होते. प्रमुख अतिथी म्हणून अमर देशमुख तर विशेष मार्गदर्शक म्हणून शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे बीसीए अंतिम वर्षातील विद्यार्थी यश भालेराव व सुमित सपकाळ उपस्थित होते.

# 'हर्र बोला महादेव'च्या गजरात शिवभक्तांचे गांधीग्रामकडे प्रस्थान

## शिवभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण; उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. १७ :** अकोल्याचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वर महाराजांना श्रावणाच्या चवथ्या सोमवारी श्री राजराजेश्वर ला जलाभिषेक करण्यासाठी कावडधारी शिवभक्तांनी रविवारी (ता.१७) हर्र बोला महादेव च्या गजरात गांधीग्राम येथे प्रस्थान केले. यावेळी हजारो शिवभक्तांच्या स्वागतासाठी अकोला नगरी सज्ज झाली असुन जिल्हा प्रशासनाकडूनही आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देत कावड महोत्सव उत्साहात आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज केली आहे.

अकोल्याचा कावड महोत्सव हा दरवर्षीच संपूर्ण राज्यात शिवभक्तांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवारी कावडधारी शिवभक्त गांधीग्राम येथील पूर्णा नदी पात्रातील जल आणुन श्री राजराजेश्वराचा जलाभिषेक करतात.

श्रावणाच्या चवथ्या सोमवारी शहरातील छोट्या शिवभक्त मंडळासह अकोल्यातील जुने शहरवासी शिवभक्त मंडळ, जय बाभळेश्वर शिवभक्त मंडळासह शेकडो मंडळांच्या शिवभक्तांनी गांधीग्रामकडे प्रस्थान केले.

यावेळी कावडमार्गावर शिव भक्तांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी जिल्हाधिकारी अजित कुंभार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. कमलेश भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी नियोजन करून सर्व शिवभक्तांना आरोग्य सेवा पुरवण्याची व्यवस्था केलेली आहे.

### कर्मचाऱ्यांना विशेष गणवेश

कावड मार्गावर काम करणाऱ्या आरोग्य कर्मचारी, अधिकाऱ्यांना विशेष गणवेश टी-शर्ट, टोपी पुरविण्यात आलेली आहे. पिण्याचे पाण्याचे वेळोवेळी परीक्षण करण्यात येत आहे. तसेच शिवभक्तांना ठिकठिकाणी आरोग्य शिक्षण देण्याकरिता आरोग्य संदेश असलेले डिजिटल बोर्ड, बॅनर ,हस्त पत्रिका यांच्याद्वारे तसेच आरोग्य कर्मचारी यांचे मार्फत आरोग्य शिक्षण देण्यात येणार आहे.

### कावड मार्गावर दहा उपचार केंद्र

कावड मार्गावर दहा उपचार केंद्र उपलब्ध करण्यात आले आहेत. या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, वाहन चालकांची नियुक्ती केली आहे. उपचार केंद्राचे ठिकाणी तसेच आरोग्य उपकेंद्रामध्ये आवश्यक तो औषध साठा उपलब्ध करून ठेवण्यात आलेला आहे. या मार्गावर एकूण ९ रुग्णवाहिका अद्यावत ठेवण्यात आल्या आहेत. उपचार केंद्राचे ठिकाणी टेंथ द्वारे निवारा करण्यात आलेला आहे. तर या सर्व सेवांचा शिवभक्तांनी लाभ घ्यावा, असे आव्हान जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी केले आहे.

### ४११ सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा वॉच

**संपूर्ण पालखी मार्गावर तसेच गर्दीच्या संभाव्य ठिकाणी ४११ हाय-रिझोल्यूशन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. पोलिस नियंत्रण कक्षातून यावर थेट देखरेख ठेवण्यात येणार आहे. हवाई देखरेखीसाठी १० उच्च क्षमतेचे ड्रोन यंत्रे कार्यरत ठेवण्यात येणार असून, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन परिस्थितीचे वेळीच निदान करण्यासाठी ही यंत्रणा उपयोगी ठरणार आहे. महत्त्वाच्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या १० वॉच टॉवर्सवरून पोलीस अधिकारी थेट नियंत्रण ठेवणार असून, कुठेही संशयास्पद हालचाल दिसताच त्वरित प्रतिसाद दिला जाणार आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी संवेदनशील ठिकाणी मजबूत बॅरिकेडिंग करण्यात आली आहे. रस्ता बंदीची योग्य पूर्वकल्पना देण्यात येणार आहे.**

# गांधीग्राम येथे शोध व बचाव पथके सज्ज

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १७ :** श्रावण महीण्यातील चवथ्या सोमवारच्या अनुषंगाने पुर्णा नदी गांधीग्राम ता.अकोला येथे बचाव पथक सज्ज ठेवण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्याआदेशानुसार उपविभागीय अधिकारी अकोला व तहसीलदार अकोला यांचे मार्गदर्शनामध्ये रविवारी (ता. १७) रोजी दुपारपासुन रात्रभर सर्व कावड पुर्णा नदीवरुन पुर्णपणे निघेपर्यत पुर्णा नदी गांधीग्राम येथे आपत्ती व्यवस्थापन बचाव पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. गांधीग्राम येथे अकोला तहसीलचे नायब तहसीलदार महेंद्र आत्राम , मंडळ अधिकारी दत्ता काळे, प्रशांत सायरे, हरीहर निमकंडे तसेच आपात्कालिन पथकाचे सुनिल कल्ले, दिपक सदाफळे, नजर अली, गौतम मोहोड, रुषिकेश राखोडे, रणजित घोगरे इत्यादी सदस्य तसेच संत गाडगेबाबा आपात्कालिन पथक, वंदे मातरम आपत्कालिन पथक, माँ चंडीका आपत्कालिन पथक पैलपाडा, विर एकलव्य आपत्कालिन पथक पोपटखेड या पथकांचे सदस्य बोट, लाईफ जॅकेट,लाईफ रिंग, रेस्क्यु रोप, इमरजन्सी लाईट, सर्चलाईट इत्यादी साहित्यासह उपस्थित आहेत. मुर्तिजापुर तालुक्यातील लाखपुरी येथील पुर्णा नदी येथे मोठ्या प्रमाणात मुर्तिजापुर व दर्यापुर तालुक्यातील शिवभक्त पुर्णा नदीचे जल आणण्यासाठी लाखपुरी येथे जातात. त्याअनुषंगाने तहसीलदार मुर्तिजापुर यांचे मार्गदर्शनामध्ये लाखपुरी येथे बचाव पथक सज्ज राहणार आहे. रविवारी दुपारपासुन रात्रभर सर्व कावड पुर्णा नदीवरुन पुर्णपणे निघेपर्यत सदर पथक पुर्णा नदी येथे सज्ज राहील. सदर ठिकाणी नायब तहसीलदार रविद्र राऊत, मंडळ अधिकारी पुरी, उमेश आटोटे, पदीप मोहोड, विर भगतसिंग पथक कुरणखेड , लाखपुरी येथील आपत्कालिन पथक बचाव साहीत्यासह सज्ज आहेत.

# मतदार यादीतील घोटाळा म्हणजे निवडणूक आयोगाचे षडयंत्र- जितेंद्र आव्हाड

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १७ :** देशात बोगस मतदानाचा मोठा घोटाळा निवडणूक आयोगाच्या छत्रछायेत रचला गेला असून, हा जनतेच्या डोळ्यांत धुळफ ेक करण्याचा कट आहे, असा घणघाती आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री आमदार जितेंद्र आव्हाड यांनी रविवारी अकोल्यात केला. शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते म्हणाले, राज्यात फक्त चार महिन्यांत तब्बल ७६ लाख मतदारांची वाढ झाली. पंधरा टक्के इतकी अकस्मात वाढ कशी झाली? एका घरात ४०-५० मतदार नोंदवले गेले, तेही निरनिराळ्या धर्मांचे. हा प्रकार म्हणजे थेट निवडणूक आयोगाच्या कारभारातील महाघोटाळाच.

आव्हाड पुढे म्हणाले की, याच संदर्भात मी ३० नोव्हेंबर २०२४ रोजीच संशय व्यक्त केला होता. पण महायुती सरकारने याकडे दुर्लक्ष केले. आज संविधानाच्या विरोधात सभा घेतल्या जात आहेत. आता तर खाद्यसंस्कृतीवर गदा आणली जात आहे. मांस खाऊ नये असे आदेश काढणाऱ्यांचा डीएनए जातीयवादी आणि मनुवादी असल्याचा आरोपही त्यांनी केला. यावेळी आव्हाडांनी तुळजापूर मंदिराचा मुद्दा उपस्थित केला. मंदिराच्या इतिहासाशी छेडछाड करून तो पुसून टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र राज्यातील जनता हे कदापि सहन करणार नाही, असेही ते म्हणाले. पत्रकार परिषदेत मंडल यात्रेची माहिती देण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने ओबीसी समाजाच्या हक्कासाठी नागपूर येथून ९ ऑगस्टला ही यात्रा सुरू केली असून तिचा समारोप १८ सप्टेंबर रोजी मुंबईत होणार आहे. या वेळी राज राजापूरकर, माजी मंत्री गुलाबराव गावंडे, आ. साजिद खान पठाण, जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे, डॉ. आशा मिरगे, प्रा. विश्वनाथ कांबळे, आनंद वानखडे, परिमल लहाने, विशाल गावंडे यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# कोट्यवधी खर्च करुन उभारलेला अंडरपास की स्वीमिंग पूल?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. १७ :** शहराच्या मध्यवर्ती गांधी रोडपासून सुंदराबाई टॉवरपर्यंत वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेला अंडरपास गेल्या चार-पाच वर्षांपासून पावसाळा आला की बंदच ठेवावा लागत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य प्रकारे न झाल्याने अंडरपासमध्ये चार ते पाच फूट पाणी साचते परिणामी हा मार्ग प्रशासनाला बंद ठेवावा लागतो.त्यामुळे हा अंडपास आहे की स्वीमिंग पूल असा प्रश्न नागरिकांना पडला आहे, हा मार्ग बनविल्याने गांधी रोडवरील या अंडरपासच्या दोन्ही बाजूंचे रस्ते अरुंद झाले असल्याने वाहनधारकांना दररोज त्रास सहन करावा लागत आहे. अंडरपासचा काहीच उपयोग न होता उलट वाहतूक कोंडी अधिक वाढली असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. शहराच्या विकासाच्या नावाखाली करदात्यांच्या खिशातून कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले, मात्र पावसाळ्यात हा अंडरपास बंद ठेवावा लागत असल्याने हा पैसा थेट पाण्यात गेला, असे चित्र निर्माण झाले आहे.

गेल्या चार ते पाच वर्षांत कित्येकदा नागरिकांनी अंडरपासमधील साचलेल्या पाण्याविरोधात आवाज उठवला. आंदोलनेही झाली. वाहतूक सुलभ करण्याऐवजी त्रासदायक ठरणाऱ्या या प्रकल्पामुळे प्रशासनाची कार्यपद्धत आणि नियोजनावर प्रश्नचिन्हे उभे राहिले आहेत. दरम्यान, आगामी काळात प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अन्यथा नागरिकांकडून जनआंदोलन उभे राहू शकते.

**■ अंडसपासचा उपयोग कमी आणि त्रास अधिक अशी परिस्थिती निर्माण झाली असून अनेकदा नागरिकांच्या चार चाकी, मोटरसायकली अंडरपासच्या पाण्यात अडकल्यामुळे नागरिकांना त्रास झाला आहे. एवढेच काय तर या अंडर पास मध्ये बुडून एकाचा मृत्यु झाल्याचा घटना काही दिवसांपूर्वी घडली आह.**

# नवसाक्षर परीक्षेत जिल्ह्याने मारली बाजी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १७ :** उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रम संपूर्ण देशासह अकोला जिल्ह्यामध्ये उत्साहात राबविण्यात येत आहे. २३ मार्च २०२५ रोजी घेण्यात आलेल्या असाक्षरांच्या चाचणी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या निवडक नवसाक्षरांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान स्वातंत्र्य दिनाच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी संजयकुमार झापे, जिल्हा परिषद अकोला यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सहाय्यक योजना अधिकारी प्रमोद टेकाडे, मुख्याध्यापक राजीव भिरड, मनपा शाळा मराठी क्रमांक ९ काळा मारोती, मुख्याध्यापक मोहम्मद अब्दुल अजीज, मनपा उर्दू मुलांची शाळा क्रमांक ६ अकोट फाईल, सहाय्यक शिक्षिका फरुख कौसर, कुबरा परवीन याची उपस्थिती होती. अकोला जिल्ह्यामध्ये २३ मार्च २०२५ रोजी घेण्यात आलेल्या असाक्षरांच्या परीक्षेमध्ये एकूण ८५७८ परीक्षार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ८४३९ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले असून उत्तीर्ण टक्केवारी ९८% आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये ही निकालाची टक्केवारी चांगली असल्याने शिक्षण संचालक योजना महाराष्ट्र राज्य पुणे यांनी अकोला जिल्ह्याचे कौतुक सुद्धा केले आहे. या नवसाक्षरांना केंद्रशासनाद्वारे प्रमाणपत्र देण्यात आले असून या प्रमाणपत्राचे वितरण स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने शिक्षणाधिकारी योजना जिल्हा परिषद अकोला कार्यालय मार्फत करण्यात आले. सर्वप्रथम सर्व नवसाक्षर यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. नवभारत साक्षरता कार्यक्रम अकोला जिल्ह्यात यशस्वी राबविण्यासाठी उपशिक्षणाधिकारी गजानन पारधी,सहायक योजना अधिकारी प्रमोद टेकाडे कार्यालयीन कर्मचारी गजानन येवले,सतीश देवकर,अनिल वडुरकर परिश्रम घेत असून सन २०२५ मध्ये सुद्धा नवभारत साक्षरता कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्याचे आवाहन संजयकुमार झापे शिक्षणाधिकारी योजना जिल्हा परिषद अकोला यांनी केले आहे.

## अमृत योजना | १४ टक्के अधिक दराने निविदा प्राप्त

# भुयारी योजनेला आर्थिक फटका बसणार का?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १७ :** अमृत योजनेत पहिल्या टप्प्यात झालेल्या प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी सादर झालेल्या निविदा शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा १४ टक्के अधिक आहे. त्यामुळे निविदा मंजूर केल्यास या प्रकल्पाला आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

अमृत योजनेच्या पहिल्या टप्प्यातील शिलोडा येथील मलजल शुद्धीकरण केंद्राच्या देखभाल दुरुस्तीसाठी महापालिकेला एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. मात्र, या निविदा १४ टक्के अधिक दराने प्राप्त झाल्या आहेत. आता पर्यंत चारवेळा निविदा प्रसिद्ध केल्याने अधिक दराने देखभाल दुरुस्तीचे काम दिले जाणार की पुन्हा निविदा प्रसिद्ध केल्या जाणार? याबाबत प्रशासन निर्णय घेणार आहे.

अमृत योजनेच्या पहिल्या टप्प्यात ६७ कोटी रुपये खर्च करुन भुमिगत गटार योजनेचे पहिल्या टप्प्यातील काम करण्यात आले. यात शिलोडा येथे ३० एमएलडी क्षमतेचे तसेच पिकेव्ही परिसरात ७ एमएलडीचे मलजलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात आले. तसेच मोर्णा नदीच्या डाव्या काठावर २.३८ किलोमीटर लांबीची टंकलेन तसेच उजव्या बाजूने ११.६८ किलोमीटर लांबीची टंकलेन टाकण्यात आली. मोर्णा नदीला एकुण ३८ नाले येवून मिळतात. या नाल्यातील पाणी नदीपात्रात जातो. हे सांडपाणी या ट्रंकलेन मधून शिलोडा येथील मलजल केंद्रात जाणार असून त्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यातील योजनेचे काम पूर्ण झालेले आहे. मात्र विविध तांत्रिक कारणामुळे योजना अद्यापही पूर्णपणे कार्यान्वित झालेली नाही. या योजनेचे लोकार्पण तत्कालीन पालकमंत्री बच्चु कडू यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. मात्र तीन वर्ष उलटूनही नाल्यातील सांडपाण्यावर अद्यापही प्रक्रिया सुरु झाली नाही. प्रशासनाने यापूर्वी तीन वेळा देखभाल दुरुस्तीसाठी निविदा बोलावल्या. मात्र विविध कारणामुळे या निविदांची अंमलबजावणी झाली नाही. मात्र आता चौथ्यांदा निविदा प्रसिद्ध केली असून तीन निविदा प्राप्त झाल्या मात्र अधिक दराने प्राप्त झाल्याने खर्चात वाढ झाली आहे.

### चेंबरकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

मोर्णा नदीला येवून मिळणाऱ्या ३८ नाल्यांच्या तोंडावर चेम्बर तयार करण्यात आले. नाल्यातील कचरा मलजलवाहिनीत अडकू नये, यासाठी चेंबरच्या तोंडावर लोखंडी जाळ्या लावण्यात आल्या होत्या मात्र, या जाळ्या उपद्रवींनी लंपास केल्या आहेत. दरम्यान या नाल्यांच्या जाळ्याकडे लक्ष देणे कंत्राटदारासाठी डोकेदुखी ठरणार आहे. कारण सांडपाणी जाळ्यातून न जाता थेट मल जलवाहिनीत गेल्यास मलजलवाहिनी चोक होण्याची शक्यता आहे.

# दगडपारवा धरणात बुडून युवकाचा मृत्यू





दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १७ :** बार्शीटाकळी तालुक्यातील दगडपारवा धरणात बुडाल्याने बार्शीटाकळी शहरातील २९ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली. याप्रकरणी बार्शीटाकळी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

सादिक नगर, बार्शीटाकळी येथील शेख रिजवान हा रविवारी आपल्या समवयस्क मित्रांसोबत दगडपारवा येथील धरणावर मासेमारीसाठी गेला होता. दरम्यान, त्याचा पाय घसरून तो पाण्यात पडला. स्थानिक नागरिकांनी शर्थीचे प्रयत्न करून त्याला बाहेर काढले. मात्र तोपर्यंत त्याची प्रकृती गंभीर झाली होती.

सदर युवकाला तातडीने बार्शीटाकळी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र वैद्यकीय उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे बार्शीटाकळी शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

**महत्त्वाचे**

## साक्षी राठोडने घातली यशाला गवसणी; एम.बी.बी.एस.ला प्रवेश



**मंगरुळपीर:**स्थानिक मंगरुळपीर तालुक्यातील खापरदरी येथील रहिवासी नगर परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळेतील उपक्रमशील शिक्षक संतोष राठोड यांची कन्या साक्षी राठोड हीने कठोर मेहनत,जीद्द आणि चिकाटीच्या आधारावर एम.बी.बी.एस.ला प्रवेश मिळविला.

साक्षीचे प्राथमिक शिक्षण स्थानिक नगर परिषद शाळेत झाले , माध्यमिक शिक्षण नाथ विद्यालय मंगरुळपीर येथुन तर उच्च माध्यमिक शिक्षण पांडुरंग उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळा तालुका मालेगाव येथुन झाले. निट या वैद्यकीय क्षेत्रातील प्रवेश परिक्षेत ४६८ गुण मिळवून पहील्याच निवड यादीत डॉ. राजेंद्र गोडे वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे एम.बी.बी.एस. प्रवेश मिळविला आहे. प्राथमिक शिक्षणापासूनच साक्षीने प्राविण्य श्रेणीचे गुण मिळविले. तीने आपल्या यशाचे श्रेय खोडके, नाथ विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक नंदलाल पवार, ए.के.पवार, कांबळे, प्राचार्य देशमुख, जावेद खान, ओमप्रकाश गोरे, डॉ नरेश जाधव , पि.एम. चव्हाण यांना देते.

## परशुराम नाईक विद्यालयात स्वातंत्र्य दिन सोहळा संपन्न



**बोरगाव मंजू :** येथील परशुराम नाईक विद्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन सोहळा प्रभात फेरी, ध्वजारोहण,कवायत, देशभक्तीपर समूह गान, तंबाखू मुक्त शपथ,चित्रकला प्रदर्शनीचे उद्घाटन अशा स्वरूपात शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य मनोज आगरकर यांच्या मार्गदर्शनात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष किरणभाऊ नाईक यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी शाळा समितीचे अध्यक्ष दीपक नाईक,संस्था सचिव एन एस गमे, ठाणेदार अनिल गोपाळ, संस्था सदस्य के एम जोशी,डॉ.प्रशांत वायचाळ एस जी बोरगावकर, मुस्ताक पटेल, सुधाकर टोपरे, अजय नाईक, शाम देशमुख, अतुल नाईक, अभिनव नाईक,सौ प्रांजली नाईक यांच्यासह मुख्याध्यापक तथा प्राचार्य मनोज आगरकर,उपमुख्याध्यापक गजानन पोहनकर, सायन्स कॉलेज प्राचार्य प्रणाली अंबरते,कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका सौ मनीषा मराठे आदी उपस्थित होते.

# पोकरा अनुदान वाटप संशयाच्या भोवऱ्यात

## दलालांच्या संगनमताने योजनेची लागली वाट

। सुरेश गिरी ।

**रिसोड , दि. १७ :जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, म्हणजेच पोकरा योजनेचा पहिला टप्पा सन २०१८ ते जून २०२४ पर्यंत मोठ्या धुमधडाक्यात राबविण्यात आला आहे.हवामान बदलाच्या काळात शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने पोकरा योजनेची अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले होते.त्या अनुषंगाने या प्रकल्पाअंतर्गत अनेक योजना राबविण्यात आल्या. परंतु संबंधित कृषी सहायकाने गावातील काही दलालांच्या संगनमताने या योजनेची वाट लावली असल्याचे आता उघड होत आहे.**

कृषी विभागाच्या भोंगळ कारभारमुळे काही कृषी सहायकांनी सैराटपणातून अनुदान वाटपात झिंगाटपणा केला असल्याची माहिती आता समोर आली आहे. परिणामी कृषी सहायकासाठी दलाली करणारे १० टक्के आणि वशिल्यातले १० टक्के असे एकूण २० टक्के लाभार्थी तुपाशी, तर बाकीचे ८० टक्के लाभार्थी उपाशीच ठेवण्यात आले असल्याची धक्कादायक माहिती विश्वासनीय सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे रिसोड तालुक्यात पोकरा योजनेत समाविष्ट असलेल्या गावातील अनुदान वाटप संशयाच्या भोवऱ्यात




असल्याची आता चर्चा जोर धरत आहे. शेलुखडसे गावात संबंधित कृषी सहायकाने नियमबाह्य पूर्वसंमती मिळवून देत एकाच कुटुंबातील वेगवेगळ्या सदस्यांच्या नावावर लाखो रुपयाची खैरात केली असल्याची बाब लाभार्थी यादी पडताळून पाहिल्यास सहज लक्षात येते. त्यामुळे कृषी सहायकाने गावातील ८० टक्के शेतकऱ्यांना पोकरा योजनेच्या लाभापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले असल्याची चर्चा सदर योजनेचा पहिला टप्पा संपल्यानंतर आता उजगार होत आहे. या भ्रष्टाचाराची वरिष्ठ स्तरावरून चौकशी व्हावी व दोषींवर कारवाई करून झालेल्या आर्थिक अफरातफरीची सक्त वसुली करण्यात यावी अशी मागणी शेलुखडसे येथील काही शेतकरी करीत आहेत. तर काही शेतकरी उपलब्ध यादीचा पुरावा जोडून थेट जिल्हाधिकारी आणि योजनेचे प्रकल्प संचालक यांच्याकडे रितसर तक्रार करणार असल्याचे बोलत आहेत.त्यामुळे पोकरा योजनेचा दुसरा टप्पा तरी पारदर्शकपणे पार पडेल अशी अपेक्षा वर्तविण्यात येत आहे.

प्राप्त माहितीनुसार या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाचे घटक आणि शेतकरी गटासाठी दिले जाणारे घटक असे दोन गट आहेत. यात शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभाअंतर्गत वृक्ष लागवड, फळबाग लागवड, शेततळे, पाणी उपसा साधने, पाईप, ठिंबक सिंचन, तुषार सिंचन, शेडनेट हाऊस, पॉली हाऊस, हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत व प्रमाणित बिजोउत्पादन, बंदिस्त शेळीपालन, अस्तरीकरण, विहीर, गांडूळ खत निर्मिती आदी अनेक योजना ७५ टक्के अनुदानावर दिल्या जातात.मात्र रिसोड तालुक्यातील योजनेत समाविष्ट असलेल्या एकूण १८ गावापैकी सर्वात बोगस प्रकार शेलुखडसे गावात झाला असल्याच्या तक्रारी पोकराचा दुसरा टप्पा सुरु झाल्यानंतर समोर येत आहेत. यात लाखो रुपये एकाच परिवारातील वेगवेगळ्या नावावर दिला असल्याचे पुराव्याणीशी गावातील ज्यांना, ज्यांना या योजनेतून हेतूपुरस्पर वगळण्यात आले किंव्हा कृषी सहायकाच्या काही निवडक दलालांनी ज्या शेतकऱ्यांना मुद्दामहून डावलले आहे असे संतप्त शेतकरी आता अनेक तक्रारी करणार असल्याचे बोलत आहेत. बोगस समूह गट, नियमबाह्य एकाच कुटुंबात एकाच घटकासाठी दिलेले अनेक लाभ आता उजगार होत आहेत. तर ट्रॅक्टर, विहीर, पाईप लाईन, फळबाग, वृक्ष लागवड, बिजोउत्पादन आदी अनेक योजनाच्या नावावर कृषी सहायकाने आपल्या मार्जितल्याच लोकांना अनुदानची खिरापत वाटले असल्याची खळबळ जनक प्रकार उघड होत आहे. या गैरप्रकारांची सखोल चौकशी करून बोगस अनुदान लाटणारे व देणाऱ्या दोषीवर सक्त वसुलीची कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे. जेणेकरून पोकरा योजनेचा नुकताच सुरु झालेला दुसरा टप्पा सुरळीत पार पडेल व सर्व समावेशक शेतकऱ्यांना या लोकाभिमुक योजनेचा लाभ मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### कृषी सहायकाचा बेजबाबदारपणा अनेक शेतकऱ्यांच्या मुळावर

योजनेची संपूर्ण माहिती गावातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्याची मुख्य जबाबदारी कृषी सहायकाची असते. त्यानंतर निवड झालेल्या शेतकऱ्यांची कागद- पत्र तपासून त्यात काही त्रुटी आहेत का, हे तपासून संबंधित शेतकऱ्याला मार्गदर्शन करणे हे कर्तव्य सुद्धा कृषी सहायकाला पार पाडावे लागते. मात्र काही कृषी सहायकांनी मर्जीतल्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी ईतर शेतकऱ्यांचे अर्ज तपासण्यात टाळाटाळ करत वेळाकाढूपणा केला आहे. जेणेकरून सदर शेतकऱ्यांचे अर्ज विहीत मुदतीच्या बाहेर जातील व अशा शेतकऱ्यांना योजनेतून वगळण्यास सोईचे होईल.असा आरोप वंचित शेतकरी करीत आहेत. त्यामुळे कृषी सहायकाच्या या बेजबाबदारपणामुळेच योजनेच्या स्तुत्य हेतूला हरताळ फासल्या गेला आहे. त्यासाठी अशा कृषी सहायकांची वरिष्ठ स्तरावरून कसून चौकशी व्हावी अशी मागणी होत आहे.

मी, अल्पभूधारक शेतकरी असून, पोकरा योजनेतून लाभ मिळविण्यासाठी अनेक वेळा अर्ज केला आहे. परंतु प्रत्येकवेळी कृषी सहायकाच्या दलालांनी आता टार्गेट संपले असे सांगत माझा अर्ज फेटाळाला आहे.मला विहिरीतील मोटार पम्प, पाईप, वृक्ष लागवड अशा अनेक योजना मिळणे अत्यावशक होते. ज्यामुळे माझ्या उत्पन्नात निश्चितच वाढ झाली असती. परंतु गावातील ठराविक लोकांच्याच दावणीला बांधलेल्या कृषी सहायकांमुळे मला शासनाच्या या योजनेचा लाभ मिळाला नाही.या योजनेच्या स्तुत्य हेतूची माहिती पहिला टप्पा संपल्यानंतर ८० टक्के शेतकऱ्यांना झाली आहे. ही सर्वात मोठी चूक येथील कृषी सहायकाची आहे. अशा दोषींवर कारवाई व्हावी जेणेकरून शासनाच्या पुढील योजना तरी अखेरच्या घटकांपर्यंत पोहचतील व जास्तीत जास्त शेतकरी सक्षम होतील. अशी अपेक्षा आहे.

**अंकुश रामजी खडसे**
अल्पभूधारक शेतकरी, शेलुखडसे

मोप कृषी मंडळातील काही गावं पोकरा योजनेच्या पहिल्या टप्प्यात समाविष्ट होती. मात्र संबंधित कृषी विभागाने या बाबत पाहिजे तेव्हढी जनजागृती केली नाही. तर संबंधित कृषी सहायक मर्जितल्या लोकांच्या घरीच बैठक घेत होत. अशी धक्कादायक माहिती आता समोर येत आहे. त्यामुळे निवडक लोकांनाच या योजनतून आर्थिकदृष्ट्या सक्षम केले आहे. या सर्व गैरप्रकाराची चौकशी व्हावी. परिणामी भविष्यात कुठल्याही शासकीय योजनेचा लाभ सर्व शेतकऱ्यांना मिळेल.

**रवी पाटील नरवाडे**
सामाजिक कार्यकर्ते,
तथा शेतकरी मोप ता. रिसोड

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना शासनस्तरावर मदत मिळवून देऊ -आ. खोडे

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मंगरूळपीर, दि. १७ :**गत दोन दिवसांपासून झालेल्या अवकाळी व मुसळधार पावसाने मंगरूळपीर तालुका तसेच वाशिम जिल्ह्यातील अनेक भागात मोठ्या प्रमाणावर हानी केली आहे. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान होऊन शेतजमीन खरडून गेली, तर अनेक ठिकाणी गुरेढोरे वाहून जाण्याच्या घटना घडल्या आहेत. गोरगरीब शेतमजुरांच्या झोपड्यांमध्ये पाणी शिरून घरगुती संसारोपयोगी साहित्याची हानी झाली आहे. कपाशी, सोयाबीन, तुरी,हळद



आदी खरीप पिके पाण्याखाली गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.या भीषण परिस्थितीची गंभीर दखल घेत आमदार शामभाऊ खोडे यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले असून नुकसानीचा संपूर्ण अहवाल शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

आमदार खोडे म्हणाले की, ''शेतकऱ्यांवर आलेल्या या संकटाच्या काळात शासन व मी स्वतः खंबीरपणे तुमच्या सोबत आहोत. पंचनामे करून मिळणाऱ्या मदतीत कुठलाही विलंब होऊ देणार नाही. शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करून शेतकऱ्यांच्या नुकसानीची योग्य भरपाई मिळवून देणे ही माझी प्राथमिक जबाबदारी आहे. शेतकरी हा देशाचा कणा आहे; त्याला वंचित ठेवले जाणार नाही.''त्यांनी पुढे सांगितले की, ''नैसर्गिक आपत्तीसमोर कोणाचेही हात छोटे पडतात, पण धैर्य आणि आत्मविश्वासानेच संकटावर मात करता येते. शेतकरी बांधवांनी हताश न होता संयम बाळगावा. शासन, प्रशासन व लोकप्रतिनिधी सर्वजण आपल्या मदतीसाठी सज्ज आहेत. ही लढाई एकत्रितपणे लढून आपण या आपत्तीवर निश्चितपणे मात करू.''यावेळी आमदार खोडे यांनी शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिकांना धीर देत आश्वासन दिले की, शासनस्तरावरून सर्वतोपरी प्रयत्न करून भरपाई मिळवून देण्यात येईल.

## स्वातंत्र्यदिनानिमित्त अमली पदार्थ जनजागृती रॅली

### ज्ञानप्रकाश विद्यालय आणि पिंजर पोलीस स्टेशनचा संयुक्त उपक्रम

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**बार्शीटाकळी, दि. १७ :**

संपूर्ण भारतात १५ ऑगस्ट २०२५ हा ७९ वा स्वातंत्र्य दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी आपल्या महापुरुषांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले त्यांचे स्मरण आपण करत असतो. या दिवशी संपूर्ण भारतात विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. याच निमित्ताने विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच जीवनविकास विषयक धडे देणे महत्त्वाचे आहे



हे लक्षात घेऊन अकोल्याचे नवनियुक्त पोलीस अधीक्षक मा. अर्चित चांडक यांनी मिशन उडान अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यामध्ये अमली पदार्थाच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती मोहीम सुरू केलेली आहे. अकोला पोलिसांच्या आव्हानाला साद देत, ज्ञानप्रकाश विद्यालय, ज्ञानप्रकाश प्राथमिक शाळा, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, शामकी माता प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आणि पिंजर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

## अति पावसामुळे घरे पडली; थोडक्यात जीवितहानी टळली

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**पातुर नंदापूर, दि. १७ :**येथे १६ ऑगस्ट च्या दुपारी ४ च्या दरम्यान अति मुसळधार ढगफुटीचा पाऊस झाला. अति भयंकर पावसामुळे सर्व नदी नाल्या ना पूर आला होता. शेतकऱ्यांचे सुद्धा अति नुकसान झाले. त्यात घरांची पडझड सुद्धा झाली. पठाणपुरा पातुर नंदापूर येथील ताहेर खा सत्तारखा पठाण, रफिका बी शेख अयनु यांचे दोघांचेही राहते घर पडल्यामुळे त्यांचे अति नुकसान झाले आहे एकाच वेळेस दोन्ही घरे पडल्यामुळे मोठा आवाज झाला सर्व लोक घराबाहेर निघालो दोन्ही घराचा मलमा येण्या जाण्याच्या रस्त्यावर पडला परंतु जीवित हानी टळली रफिका बी शेखअ यनु ही महिला विधवा असून तिला घरकुलाचा लाभ मिळाला होता आणि त्या राहत्या घराची संपूर्ण भिंत पाण्यामुळे पडून गेली ताहेर खा गरीब कुटुंबातील व्यक्ती असून त्याच्या संपूर्ण घराची पडझड झाली. त्याला राहण्यासाठी सुद्धा घर राहिले नाही तरी वरिष्ठ अधिकारी कृषी सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच यांनी ज्या कुणाच्या घराचे नुकसान झाले असेल त्या घराचे



पंचनामे करण्याचे आदेश देण्यात यावे व पंचनामे करून गरीब लोकांना मदत करण्यात यावी अशी गावकऱ्यांची मागणी आहे.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित मदत जाहीर करा -संदीप जळमकर

### उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मुर्तीजापुर , दि. १७ :** तालुक्यामध्ये ढगफुटी दृश्य पाऊस पडल्याने शेतकऱ्यांचे नदी काठावर असलेले शेत खरडून गेल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित मदत शासनाने जाहीर करावी अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष संदीप जळमकर यांनी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारा केली आहे

मुर्तीजापुर तालुक्यात दुपारपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे ढगफुटीची परिस्थिती निर्माण झालेली होती. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी कर्ज घेऊन पेरणी केलेली आहे तर काही शेतकऱ्यांचे



बोगस बियाणे निघाल्याने दोबारा पेरणी करून कर्जाचा डोंगरा डोकसेवर घेतलेला आहे.पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतशिवारात अक्षरशः पाणीच पाणी झाले आहे. या अनपेक्षित पावसामुळे शेतकऱ्यांचे पिक मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या संकटामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला अशा परिस्थितीत नदी काठावर असलेल्या कमळगंगा माना परिसरातून व लाखपुरी नदी तसेच नाले यांना पूर आल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतात पाणी घुसल्याने शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान झालेले आहे.लाखपूरी, दुर्गवाडा, दातवी, मोहखेड मंगरूळ कांबे, जांभा खुर्द, जांभा बु., उमई, हीरपूर सिरसो समशेरपुर पोही बपोरी जितापूर नाकट, रसलपूर, शेलूनजीक, दताळा, भटोरी रामखेडा हतगाव कंझरा कुरूम मधापुरी नवसाला रामटेक कवठा विरवाडा पारत सांगवा भटोरी घुंगशी मुंगशी सांगवा मेळ अशा अनेक गावांत , शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मुर्तीजापुर तालुक्यात काही ठिकाणी बोकस बियाणे निघाले तर शेतकऱ्यांना दोबारी पेरणी करावी लागली आता निसर्ग कोपला मुर्तीजापुर तालुक्यात मुसळधार पाऊस झाला मोठ्या प्रमाणात नदी काठावर असलेले शेतकऱ्यांचे पिकाचे नुकसान झाले शासनाने २४ तासाचे आत कृषी अधिकारी पटवारी तहसील कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून त्वरित सर्वे करून नुकसानाची भरपाई द्यावी या कामात जर कोणीही संबंधित अधिकारी कर्मचारी दिरंगाई करत असेल तर त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई व्हावी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन त्वरित सर्वे करून त्यांना नुकसानाची भरपाई जाहीर करावी अशी मागणी संदीप पाटील जळमकर राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष यांनी केली आहे.

**दखल** आ. भावना गवळी पाटील यांची कृषी मंत्र्याकडे मागणी

# पावसाने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**वाशिम, दि. १७ :** गेल्या तिन-चार दिवसात जिल्ह्याच्या सर्वच भागात जोरदार पाऊस पडला. मात्र, काही भागात ढगपुटी सदृश्य पाऊस पडल्याने अचानक नदी नाल्यांना पुर येवून शेतजजमीनी, शेतातील पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून ठिकाणी घरांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने अन्नधान्य,गृहोपयोगी साहित्य, कपडे आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंचंही मोठे नुकसान झाले असून काही घरांची पडझड झाली आहे. तसेच रस्ते, पुल यासह पायाभूत सुविधांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.त्यामुळे



या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन नुकसानग्रसतांना मदतीचा हात द्यावा, अशी मागणी आ.भावना गवळी पाटील यांनी कृषीमंत्री तथा पालकमंत्री वाशिम जिल्हा यांना पाठविलेल्या पत्रातून केली आहे.

जिल्ह्यात गत तिन-चार दिवसात पावसामुळे झालेल्या नुकसानीमध्ये शेती, घरे आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः काही भागात झालेल्या ढगपुटी सदृश्य पाऊस व अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. नदी व नाल्याकाठच्या भागांमध्ये पूर आल्याने शेती पाण्याखाली गेली आहे आणि जमिनी खरडून गेल्या आहेत. पावसामुळे काढणीला आलेले मूग, उडीद, हळद, सोयाबीन, कपाशी, तूर आदींसह भाजीपाल्यालाही मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी घरांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने अन्नधान्य,गृहोपयोगी साहित्य, कपडे आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंचंही मोठे नुकसान झाले असून काही घरांची पडझड झाली आहे. या आपत्तीमुळे नागरिकांच्या जीवनावश्यक गोष्टींवर शेतकयांच्या शेतजमीनी व पिकावर गंभीर परिणाम झाला आहे. त्यांना पुनर्वसनाच्या दृष्टीनं तातडीने मदतीची आवश्यकता आहे.

त्यामुळे वाशिम जिल्ह्यात पावसाने व अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे तातडीने सव्हेक्षण करुन नुकसानग्रस्तांना मदत देण्यात यावी अशी मागणी विधान परिषद आमदार तथा शिवसेना पक्ष नेत्या भावना गवळी पाटील यांनी पाठविलेल्या पत्रातून केली आहे. या पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी भुवनेश्वरी तथा वाशिम जिल्ह्यातील सर्व तहसिलदार यांना दिल्या आहेत.

वाशिम जिल्ह्यातील काही भागात १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान व त्यापुर्वी ढगपुटी सदृश्य पाऊस झाल्याने नदी नाल्यांना आलेल्या पुरामुळे शेत जमिनी, खरीपाची पिके, घरांची पडझड यासह विविधी बाबीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तातडीने सव्हेक्षण करुन नुकसानग्रस्तांना मदत मिळण्याकरीता सदर अहवाल शासनाला पाठवावा. असे निर्देश जिल्हाधिकारी व जिल्ह्यातील सर्व तहसिलदारांना दिले आहेत.

**आ.भावना गवळी पाटील**
शिवसेना पक्ष नेत्या

## शासनाने दिलेल्या घरकुलावर सावकाराचा ताबा?

### मुलाने केलेल्या आर्थिक व्यवहारात वयोवृद्ध झाले निराधार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. १७ :** शहरातील अमीनपुरा भागात राहणारे वयोवृध्द अनंता शिवराम वानखडे वय ८० वर्ष यांना अकोट नगरपालिके अंतर्गत सन २०१२ मधे रमाई आवास योजनेचा लाभ मिळाला होता. मात्र वयोवृद्धाचा मुलगा विनायक वानखडे हा अपंग असून दवाखान्यात जाण्यासाठी त्यांने अफजल खान आसिफ खान यांचेकडून एक लाख रुपये हातउसने घेतले होते. मात्र या प्रकरणांमध्ये अफजल खान आसिफ खान याने योजनेत मिळालेल्या घराचा ताबा घेतला असल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दिली असून न्याय देण्याची मागणी केली आहे. या प्रकरणत मात्र जो आर्थिक व्यवहार झाला त्यांच्याशी वायोवृद्ध इसमाचा काहीही संबंध नसल्याने अफजल खान यांनी तुझ्या मुलाने मला व्याजाचे पैसे दिले नाहीत म्हणून घर मला विकले आहे. असे सांगितले. त्यामुळे अकोट शहर पोलिसांना १५ जुलै २०२५ रोजी, अफजल खान आसिफ खान, मोबीन खा बशीर खा रा. धारू वेस, व रमजान शेख राहणार अमीनपुरा तसेच मोहम्मद बद्रूजमा राहणार धारूळी वेस यांनी माझ्या घरी येऊन दबाव टाकून अश्लील शिवीगाळ केली. असल्याचे सांगत यांचे विरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

## महत्त्वाचे

### इंझोरीत गुंजला गोविंदा आला रे चा गजर



**इंझोरी :** १६ आगस्ट रोजी संध्याकाळी गावातून निघालेल्या मिरवणुकी दरम्यान गोविंदा आला रे चा गजराणे संपूर्ण इंझोरी गाव गुंजून गेले होते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षाला गावातील अनेक घरांमध्ये १५ ऑगस्ट रोजी रात्रीला श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त माती, शाडूच्या श्रीकृष्णाची मूर्तीची स्थापना करून श्रीकृष्ण जन्मोत्सव मोठ्या भक्ती भावात व उत्साहात साजरा करण्यात आला या श्रीकृष्णांच्या माती, शाडूच्या मूर्तीचे विसर्जन १६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी गावातून मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकी दरम्यान गावातील गोविंदांनी वेगवेगळ्या चौकामध्ये दहीहंडी फोडण्याच्या उत्सवांचा कार्यक्रम पार पाडला या दहीहंडी फोडण्याकरिता अनेक गोविंदांनी सहभाग नोंदविला होता.

### संत वामन महाराज स्कुलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा




**मानोरा :** स्थानिक धामणी मानोरा येथील संत वामन महाराज इग्लिश प्रायमरी स्कुल मानोरा येथे ७९ वा हा स्वातंत्र्य दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला शाळेचे अध्यक्ष व्हि.भी.पाटील, शाळेचे संचालक अभिजित देशमुख, माजी वैद्यकीय अधिकारी तथा शाळेचे संचालक डॉ.सुहास देशमुख, शाळेच्या मुख्याध्यापिका सोनाली पिंगळे, उपमुख्याध्यापक देवानंद बिडकर मान्यवर उपस्थित होते.

### मानोरा येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**मानोरा :** येथील इंडियाज फाउंडेशन स्कूल ऑफ ऑक्सफर्ड शाळेमध्ये ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महेशभाऊ जाधव, रोशनी जाधव, डॉ.विशाल राठोड,डॉ. अमोल भगत, कु.मिसबा पटेल बी.एम.सी मुंबई.ध्वजारोहण महेशभाऊ जाधव आणि त्यांच्या पत्नी रोशनीताई जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कु.मिसबा पटेल यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक गणेश पाठे , सूत्रसंचालन जया पाठे आणि राजकन्या ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक वृंद हेमंत चव्हाण, परमेश्वर जाधव, सुषमा शिंदे, कोमल खूपसे, साक्षी नागापुरे, काजल गवई, गौरी ठाकरे, प्राची पोहाणे, सृष्टी धबाले, यामिनी जिचकार, ऋतुजा राऊत, एकता मेहल्डे, सलोनी राठोड, पार्वती भुजाडे, धनश्री ठाकरे, कृष्णाली महल्ले.आणि शिक्षकेतर कर्मचारी सुमित हुंबे, कान्होपात्रा कांबळे, प्रिया मनवर यांनी परिश्रम घेतले.

# वाशिम जिल्ह्यात ‘महाप्रलयाने’ प्रचंड नुकसान

## रायताळवाडी येथील पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या व्यक्तीचा मृतदेह आढळला





दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. १७ :** रिसोड तालुक्यात १५ ऑगस्ट रोजी उशीरा झालेल्या मुसळधार पावसामुळे भर जहागीर, मोप महसूल मंडळातील शेलुखडशे, बोरखेडी, वाडी वाकद, गणेशपुर, एकलापपुर, पाचांबा या गावासह अनेक गावांना तिस-यांदा अतिवृष्टीचा फटका बसला. यामध्ये शेतकऱ्यांचे पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात शेत पिकाचे नुकसान झाले आहे . तसेच वाडी रायताळ येथील एका शेतक-याचा मृत्यु झाला. तर शेतीसह, शेतातील उभ्या पिकांचे, रस्त्यांचे आणि पाचांबा येथिल नवीन पुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मागील दोन दिवसांपासुन सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे रिसोड तालुक्यातील अनेक नदी-नाल्यांना पूर आला आहे. रायताळवाडी येथील खालतनची नदी असे स्थानिक नाव असलेल्या नदीमध्ये पाण्याच्या प्रवाहात एक व्यक्ती वाहून गेल्याने त्याचा मृतदेह आज १६ ऑगस्टला सकाळी आढळून आला आहे. प्राप्त माहितीनुसार पिराजी किसन गवळी (वय ६९ ) रा. वाडी रायताळ ता.रिसोड हा व्यक्ती १५ ऑगष्ट रोजी सकाळी कामानिमित्त शेत-शिवारात गेला असता अचानक नदीला आलेल्या पुराच्या प्रवाहात वाहून गेला.घटनेनंतर ग्रामस्थ व आपत्ती व्यवस्थापन विभागाने तत्काळ शोधमोहीम सुरू केली. अखेर आज सकाळी वाडी रायताळ येथील खालतलची नदी येथे त्याचा मृतदेह आढळला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे नागरिकांना अनावश्यक बाहेर न पडण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.भर जहागीर महसुल मंडळातील मोरगव्हाण सिंचन प्रकल्प ओव्हर फुल झाला आहे. त्यामुळे तलावाच्या संपादित जमिनी व्यक्तीरीक्त सुमारे शंभर एकर जमिनीमधील उभ्या पिकाला फटका बसल्याने बळीराजा हातबल झाला आहे.

### सोमठाणा येथे ढगफुटी; शेतीचे प्रचंड नुकसान



**मालेगाव :** तालुक्यातील सोमठाणा परिसरात १५ व १६ ऑगस्ट रोजी ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने सोमठाणा शेत शिवारातील लघु प्रकल्प, नदी व गावालगतच्या नदी नाल्याला आलेल्या पुरामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. यामध्ये सोयाबीन, तूर, हळद, संत्रा व भाजीपाला हे पीक अक्षरशः पाण्याखाली गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. यावर्षीचा हा दुसरा पूर आहे. पहिला पूर पेरणी केल्या केल्या आला होता. त्यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणी करण्याचे काम पडले. अशातच पुन्हा आता झालेल्या पावसामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी वर्गाने शासनाकडे केली आहे. या पावसामुळे सोमठाणा,ताकतोडा, खंडाळा शिंदे, वाघी बु, शिवारातील शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून यामध्ये शेतकरी नारायण शिंदे,संतोष शिंदे,सिताराम शिंदे, जगन शिंदे,माधव खंदारे,विनोद खंदारे,निंबाजी खंदारे,गजानन खंदारे, काशिबा खंदारे, शिवाजी आरू, गोरख खंदारे, अमोल खंदारे , शंकर खंदारे,समाधान खंदारे, विजय मापारी, सुभाष मापारी, शांताराम शिंदे, ग्यानबा शिंदे,निवृत्ती शिंदे, भागवत मापारी यांच्या शेती पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून सोमठाणा,ताकतोडा, खंडाळा शिंदे, वाघी बु शिवारातील शेतीच्या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत प्रशासनाने जाहीर करावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

### घरावर वीज पडली, बकरीची दोन पिल्ले वाहून गेली



**मंगरूळपीर :** तालुका व शहरामध्ये १६ ऑगस्ट चे सकाळी जोरदार पावसाने हजेरी लावली. यामुळे अनेक ठिकाणी पावसाचे पाणी शेतात साचले तर नदी, नाल्यांना पूर आला.तसेच शहापूर येथील घरावर वीज पडली तर कोठारी येथे दोन बकरीची पिल्ले वाहून गेली. १६ ऑगस्ट चे सकाळी ढगाळी वातावरणात मुसळधार पावसाने हजेरी लावली. यामुळे नदी,नाल्यांना पूर आला होता.शहरातील शहापूर परिसरातील मंगेश गजानन तायडे यांच्या घरावर विज पडली असून त्याच्या घराचे स्लॅब तडकला. त्यांच्या घरातील इलेक्ट्रॉनिक्स सामान टीव्ही, गिझर, इलेक्ट्रिक वायरींग अंदाजे तीन लाख रुपयाचे नुकसान झाले आहे. तर या घटनेत जीवित हानी किंवा कुणी जखमी नाही.याठिकाणी तहसीलदार रवींद्र राठोड यांनी भेट देऊन पाहणी केली तसेच माहिती घेऊन जिल्हा प्रशासनास कळविले.तालुक्यातील कोठारी येथील राम तलाव येथे अनिस खान अहमद खान यांची दोन बकरीची पिल्ले वाहून गेले व एक बोकड मृत अवस्थेत आढळले. तसेच असेगाव परिसरात नदीकाठच्या शेतात पाणी घुसल्याने शेतातील उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा अस्मानी संकट कोसळले आहे. गेल्या काही वर्षांपासून निसर्गाच्या लहरीपणाचा सामना करत असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही नवीन आपत्ती चिंताजनक आहे. सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील प्रमुख अडान नदीसह अनेक लहान-मोठ्या नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत.

### कारंजा तालुक्यात धुंवाधार पावसाचा कहर, शेतकऱ्यांचे स्वप्न पाण्यात



**कारंजा:** तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला असून काही भागात नदीनाल्यांना आलेल्या पुरामुळे वाहतूक विस्कळीत झाली. रस्त्यांवर पाण्याचे साम्राज्य पसरले आणि गावोगावी अंधार व भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र या साऱ्या संकटाचा सर्वाधिक फटका बसला तो शेतकऱ्यांच्या जीवाभावाच्या पिकांना.आशेने लावलेली तूर आता जळण्याच्या मार्गावर आहे. कपाशी, सोयाबीन, मूग या सर्व पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. कित्येक शेतकऱ्यांनी कर्ज काढून बी-बियाणे व खते टाकली होती, ते स्वप्न या धुंवाधार पावसाने क्षणात पाण्यात गेले. शेतात पाणी साचल्याने मशागतीची सर्व कामे ठप्प झाली आहेत. रात्रंदिवस मेहनत करून उभे केलेले पीक डोळ्यांसमोर वाहून जाताना पाहून शेतकरी पोराबाळासारखे हंबरडा फोडत आहेत. काही ठिकाणी बांधावर उभा राहून शेतकरी स्वतःच्या डोळ्यांतून पाणी पिकांसोबत वाहताना अनुभवत आहेत.त्यांच्या वेदना केवळ शेतातील नुकसानीपुरत्याच मर्यादित नाहीत, तर त्या घरातील संसाराच्या गाठीशी, लेकरांच्या शिक्षणाशी, आणि उद्याच्या दोन वेळच्या भाकरीशी जोडलेल्या आहेत.या परिस्थितीत प्रशासनाने तातडीने मदतीचे धोरण ठरवणे आणि पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देणे हाच एकमेव मार्ग आहे. अन्यथा या नैसर्गिक आपत्तीने उरलेसुरले शेतकरी जीवन अधिकच खचून जाईल.

## पुलावरून गाडी गेली वाहून; दोघांचे प्राण वाचले



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**शिरपूर, दि. १७ :** शिरपूर व परिसरामध्ये सकाळपासून रिमझिम पाऊस सुरू होता परंतु दुपारी अतीमुसळधार पाऊस झाल्याने आजूबाजूच्या नदी नाल्यांना पूर दृश्य परिस्थिती निर्माण झाली होती शिरपूर ते वाघी रोड वरील आई भवानी समोरी फुलावरून एक गाडी व व्यक्ती वाहून गेल्याची घटना सायंकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान घडली आहे आहे व्यक्तीने चंद्रज्योतीच्या झाडाला पकडून ठेवल्यामुळे त्याचा जीव वाचवला या रोडवरील सर्व पूल खूप काळापासून जुने आहेत त्याची उंची वाढवण्याची गरज आहे संबंधित लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

शिरपूर वाशिम करंजी कडे जाणारा संस्थान जवळील फरशी पुलाला पूर आल्याने गावाचा संपर्क तुटल्याने संस्थानात गेलेले भक्त संस्थांवर अडकून पडले तर तर शिरपूर करंजी शेलगाव दापुरी कडे जाणारे लोकांची एकच तारांबळ उडाली संध्याकाळी वेळ असल्याने पुराच्या पाण्यामुळे त्यांना शिरपूर येथील मुक्काम करावा लागते कि काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

## पारेश्वर विद्यालयातील ‘प्रतीक्षा‘एमबीबीएससाठी पात्र



**वाशिम :** नीट यूजी २०२५ मध्ये पहिल्याच प्रयत्नात यश मिळवत स्व. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ येथे एम बी बी एस साठी निवड झाल्याबद्दल कु. प्रतीक्षा भारत सोनटक्के हिचा श्री पारेश्वर विद्यालय, पार्डी टकमोर येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे सचिव व मा. जि.प. सदस्य केशवराव चौधरी , कार्यक्रमाचे अध्यक्ष रामभाऊ चौधरी होते. तसेच मा. प्रा. रामेश्वर ढोबळे,प्रा. राजकुमार परळीकर, ह.भ.प. निवृत्ती महाराज भालेराव, केशवराव खोरणे ,महादेव चौधरी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन हृदयनाथ खंडाळेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. राजु चौधरी यांनी केले. या वेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## इंझोरी महसूल मंडळात अतिवृष्टी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**इंझोरी, दि. १७ :** महसूल मंडळात १६ आगस्ट रोजी अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे नुकसान झाले असून नदी नाल्या काठच्या शेतजमिनी पिकासह खरडून गेल्या तर इंझोरी- म्हसणी रोडवरील तोरणाळा गावानजीक असलेला पूल वाहून गेल्याने तेथील वाहतूक ठप्प झाली तर म्हसणी चौसाळा रस्त्यावरील पूल सुद्धा वाहून गेले.

मागील दोन दिवसापासून महसूल मंडळामध्ये सतत धार पाऊस सूरु असताना १६ ऑगस्ट रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे नदी नाल्या ला पूर आला आणि पाण्याचा प्रवाह वाढला नदी नाले ओसंडून वाहत असल्याने परिसरातील शेतात पाणी शिरले त्यामुळे म्हसणी येथील शेतकरी सूर्यभान टिके यांच्यासह इंझोरी येथील मंगेश काळेकर व इतर शेतकऱ्यांच्या शेतामधून दोन ते तीन फूट पाणी वाहत असल्याने शेतातील उभ्या पिका सह शेतजमीन खरडून गेल्याने मोठे नुकसान झाले तर इंझोरी म्हसणी रस्त्यावरील तोरणाळा गावाजवळ असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूल रस्त्यासह खरडून गेल्याने या रस्त्यावरील वाहतूक ठप्प झाली असून म्हसणी ते चौसाळा रस्त्यावरील पूल सुद्धा वाहून गेल्याची घटना १६ ऑगस्टच्या अतिवृष्टीमुळे घडली दरम्यान तोरणाळ्या गावातील नागरिकांनी बंद पडलेला रस्ता श्रमदानातून दुरुस्त करून येथील वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे दरम्यान इंझोरी महसूल मंडळामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान झाले असून शासनाने त्वरित पाहणी करून पंचनामे करण्याच्या मागणीसह मदत मिळण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## गुडन्यूज — रिठद केंद्रासाठी अभिमानाचा क्षण

# पहिल्या प्रसूतीने ग्रामीण आरोग्य सेवेला प्रारंभ

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १७ :** काल स्वातंत्र्यदिनाच्या औचित्याने पालकमंत्र्यांच्या हस्ते रिठद प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण झाले. मात्र या आरोग्य केंद्राचे खरे उद्घाटन आज, १६ ऑगष्ट रोजी दुपारी झाले, जेव्हा येथे पहिली प्रसूती यशस्वीरित्या पार पडली. माता व बाळ दोघेही सुखरूप असून संपूर्ण आरोग्य टीमने ही प्रसूती सुरक्षितरीत्या केली.

ही प्रसूती ए. एन. कुटे व आर. एन. कुटे यांनी पार पाडली. त्यांना केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. यामध्ये डॉ. शिंदे, डॉ. कव्हर, श्री. बोरकर (आ.से.), श्री. इढोळे (आ.से.), श्री. बोरचाटे (आ.से.) तसेच कु. पी. एस. भालेराव (ए.एन.एम.) यांचा विशेष सहभाग होता. या ऐतिहासिक प्रसंगी प्रतिक्रिया व्यक्त करताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे म्हणाले, आरोग्य केंद्र हे केवळ इमारतीपुरते मर्यादित नसते, तर तेथील सेवाभावामुळे त्याला खरी ओळख मिळते. आज पहिली प्रसूती यशस्वीरित्या पार पडणे हा रिठद केंद्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. आमच्या कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परता कौतुकास्पद आहे. हे केंद्र ग्रामीण मातांसाठी सुरक्षित आश्रयस्थान ठरेल आणि आरोग्य सेवेत आदर्श निर्माण करेल, असा मला विश्वास आहे. दरम्यान, प्रसूती झालेल्या आईच्या नातेवाईकांनी आनंद व्यक्त करताना सांगितले, आज आमच्या घरात बाळाचा जन्म झाला आणि तोही अगदी गावातल्या आरोग्य केंद्रात. याआधी प्रसूतीसाठी आम्हाला दूरवरच्या दवाखान्यात जावे लागत होते, पण आता आपल्या गावातच इतकी चांगली सुविधा मिळाली आहे. आम्ही सर्व कुटुंबीय या सेवेसाठी आरोग्य विभागाचे आभारी आहोत. या पहिल्या यशामुळे गावात उत्साहाचे वातावरण असून रिठद प्राथमिक आरोग्य केंद्राचे खरेखुरे उद्घाटन झाल्याचे ग्रामस्थ मान्य करत आहेत.

## संशयित क्षयरोग रुग्णाची एक्स-रे द्वारा तपासणी



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**इंझोरी, दि. १७ :** प्राथमिक आरोग्य केंद्र कुपटा अंतर्गत उपकेंद्र इंझोरी येथे संशयीत क्षयरोग रुग्णाची एक्स-रे द्वारा तपासणी शिबिर संपन्न झाले. वाशिम येथील जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ठोंबरे , जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. परभणकर, माता व बालसंगोपन अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चापे, यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. शुभांगी जाधव, डॉ. रवींद्र कव्हर, वैद्यकीय अधिकारी डॉ. रमा राठोड यांच्या नियोजनात आयोजित केलेल्या क्षयरोग निदान शिबिर मध्ये इंझोरी उपकेंद्रांतर्गत असणाऱ्या एकूण १४३ संशयित क्षयरुग्णाचे हँड हेल्ड एक्स-रे मशीन द्वारे एक्स-रे काढण्यात आले एक्स-रे काढण्याचे काम स्वप्निल बोरकर, क्ष किरण तंत्रज्ञ फैजल शेख यांनी केले शिबिर यशस्वी ते करिता आरोग्य निरीक्षक श्रीरंग कानडे, उमेश सुर्वे डॉ. नितल जाधव, आरोग्य सेवक धोटकर, नकुल ढोके, रविराज बर्वे, कीटक शास्त्रज्ञ कु. स्मितल गिरी, आरोग्य सेविका शारदा वेळूकार, गटप्रवर्तक हूमेरा खान, विशाल पवार, परिचारिका श्रीमती बोरकर, उपकेंद्र अंतर्गत सर्व आशा सेविका, संतोष हनवते, गणेश राऊत, प्रशांत देशमुख, यांचे सहकार्य लाभले.

महत्त्वाचे

## मंगरुळपीर येथील कावडयात्रेत अवयवदान विषयावर जनजागृती



**मंगरुळपीर :** तालुक्यातील वनोजा प्रा.आ.केंद्राचे आरोग्य सेवक सचिन सोळंखे व कसोळा प्रा.आ.केंद्राचे आरोग्य सेवक प्रदीप घाटे व आरोग्य विभागातील इतर आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने गुरुध्वज कावड यात्रेमध्ये अवयवदान जनजागृतीसाठी मृत्यू नंतर जगा, अवयव दान करा, आणि अमर व्हा असे आवाहन केले. जिवंतपणी रक्तदान,आणि मृत्यू नंतर अवयवदान करून हा मानवतेचा अनमोल धर्म पाळूया असा अनमोल संदेश देत तुमच्या एका निर्णयामुळे तुमचा एक निर्णय, अनेक लोकांचे आयुष्य बदलू शकतो. चला तर अवयवदानाच्या या चळवळीत सर्वांनी सहभागी होऊया असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

## अखंड नवनाथ पारायणाची भक्तिमय सांगता

**मुर्तीजापूर :** प्रतीक नगरातील रमेश तिहिले यांच्या घरी गेलेले ४० दिवस अखंड नवनाथ ग्रंथसार पारायण दिनांक १७ ऑगस्ट रोजी भक्तिभावाने संपन्न झाले. सांगतानिमित्त आयोजित महाप्रसाद कार्यक्रमाला परिसरातील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने उपस्थिती लावली. या पारायणाचे ग्रंथवाचन ह. भ. प. उमक गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. त्यांच्या प्रबोधनपर वाचनाने संपूर्ण वातावरण आध्यात्मिकतेने भारावून गेले. सेवेत भक्तिभावाने सहभागी झालेल्यांमध्ये मंगेश वाडीकर, मंगेश तिहीले, दिलीप तिहीले, सुनीता तिहीले, भारती तिहीले, जगन तिहीले, रघुनाथ तिहीले, योगेश तिहीले, राधा तिहीले, श्रीनाथ शिंदे, उमक, विमलती तिहीले, श्रीकांत तिहीले, सिधुबाई वाडीकर, शिला वाडीकर, मयूर सूर्यवंशी, प्रशांत तिहीले, स्लोक तिहीले, आरव तिहीले, पुनम तिहीले, राणी तिहीले, रुद्र तिहीले व श्रेयस तिहीले यांची उपस्थिती होती. या धार्मिक उपक्रमामुळे प्रतीक नगरात सात्त्विकता, भक्ती आणि अध्यात्मिकतेचे अनोखे वातावरण निर्माण झाले. हा सोहळा केवळ धार्मिक विधी नसून श्रद्धा, संयम, भक्ती आणि संस्कारांचा प्रेरणादायी दीपस्तंभ ठरला. रमेश तिहीले व त्यांच्या परिवाराचे गावकरी व भाविकांकडून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

# रिसोड तालुका ओला दुष्काळ जाहीर करा - ठाकूर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**रिसोड, दि. १७ :** तालुक्यात दोन दिवसापासून मोठया प्रमाणात धो..धो..पाऊस पडत आहे. अशातच पैनगंगा नदी दुथडी भरून वाहत आहे. नदीचे पाणी परिसरातील शेतात घुसल्याने संपूर्ण पिक खरडून गेले आहे. जवळपास रिसोड तालुक्यातील सर्वच मंडळांमधील त्यातल्या त्यात वाकद शेलु खडसे भर जहागीर मंडळामध्येच अक्षरशः पाण्याने हा हा कार माजवून शेतामध्ये तलाव सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याकारणाने रिसोड तालुका ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस , पालकमंत्री तथा कृषी मंत्री नामदार दत्तात्रय भरणे व जलसंपदा आपत्ती व्यवस्थापन मंत्री नामदार गिरीश महाजन यांना पत्र पाठवून



रिसोड तालुका ओला दुष्काळ जाहीर करावा तसेच शेतकऱ्यांना. सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये मिळण्यात यावे याबाबत निवेदन दिले. जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना सुद्धा निवेदन देऊन फोन करून प्रत्यक्ष पाहणी दौरा करावा याबाबत विनंती केली .

रविवार १७ ऑगस्ट रोजी उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, भारतीय जनता पार्टी चे लखनसिंह ठाकूर वाकद गावचे सरपंच अमोल देशमुख यांच्यासह वाकद ग्रामपंचायत चे सर्व सदस्य तसेच शेतकरी बांधवांमध्ये सुरेश लाटे, बंडू मोरे, देविदास तिरके, गजानन तिरके, शिवलाल बिजोरे, दामोदर गरड, राजू ढोले, अमरदीप चौहान, चंद्रपालसिंह परिहार, भिकन खा पठाण मुरलीधर तिरके धनंजय मोरे सह वाकद तसेच गोहगाव मधील सरपंच विकास रतनसिंग हाडे सरपंच मुरलीधर हाडे गजानन हाडे सुरेश हाडे सह अनेक शेतकरी बांधव हजर होते सर्व शेतकरी बांधवांनी वाकद ते गोहगाव रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत असलेल्या मोठा पूल तसेच जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या छोट्या पुलांबद्दल दुरुस्ती करण्याची मागणी तसेच गोगाव ते वाकद संपूर्ण रस्ता बंद असल्याकारणाने सर्व जनतेची गैरसोय होते याबाबत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे खेद व्यक्त केली व नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचा शेताची पाहणी करून त्यांना शासनाने शेतकऱ्यांना भरीव मदत द्यावी अशी मागणी केली त्याचप्रमाणे वाकद मंडळातील गोहगाव ते धोडप पर्यंत सर्व गावे ही पैनगंगा नदी काठावर असून आत्तापर्यंत चार वेळेस अतिवृष्टी झाली यापूर्वी म्हणजेच २२ जुलै रोजी सुद्धा अतिवृष्टी झाली होती त्यादरम्यान जिल्हा अधिकारी महोदयांनी दौरा सुद्धा केला होता यापूर्वी सर्व महसूल कर्मचाऱ्यांच्या कडून सर्वे संपूर्ण मंडळाचा झालेला असून कालच्या पावसाने अतोनात नुकसान झाले संपूर्ण पिके नष्ट झाली मागच्या वेळेस शासनाने मंजूर केलेली मदत ही अत्यंत अल्प असून आता तरी शेतकरी बांधवांना शासनाने हेक्टरी ५० हजार रुपये द्यावी कारण सध्या काही प्रमाणात उभे असलेले पिकांचे मुळे सुद्धा जमिनीतून उखडून बाहेर पडलेले निदर्शनात आले त्याचप्रमाणे जवळपास सर्वांच्या जमिनी ह्या खरडून गेल्या या सर्व गोष्टीचा विचार करून व प्रत्यक्ष पाहणी करून शासनाकडे प्रस्ताव पाठवण्याबाबत लखनसिंह ठाकूर यांनी उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांचे कडे विनंती केली .रिसोड तालुक्यातील वाकद मंडळात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्याचे पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.

## धावत्या मालवाहू रेल्वे गाडीचे डब्बे निसटले

### बोरगाव मंजू नजीकची घटना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कुरणखेड, दि. १७ :** बोरगाव मंजू पोलिस स्टेशन हद्दीत बोरगाव मंजू नजीक मोठ्या मोरी पुलाजवळ लोहमार्गावर नागपूर कडुन अकोलाकडे जाणाऱ्या धावत्या मालवाहू रेल्वे गाडीचे डब्बे निसटल्याची घटना १७ ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास घडली. सुदैवाने मोठा अनर्थ टळला, तर सकाळी धावणाऱ्या वंदे मातरम यासह इतर रेल्वे गाड्या काही काळ ठप्प झाली होती.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मुर्तिजापूर कडून अकोलाकडे जाणारी मालवाहू रेल्वे गाडीचे बोरगाव मंजू रेल्वे स्टेशन च्या काही अंतरावर पोल क्रमांक ५९९/१२ते ५९९/१२ नजीक धावत्या गाडीचे डब्बे निसटले, दरम्यान रेल्वे पायलट यांच्या प्रसंगावधान राखत धावत्या रेल्वेचा वेग नियंत्रित केला, दरम्यान नागपूरवरुन भुसावळ, मुंबईकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्यांना खोळंबा झाला, त्यामुळे नियोजित वेळेत रेल्वे न धावता उशिरा धावत असताना हजारो रेल्वे प्रवासांना आपल्या ठिकाणी जाण्यासाठी सकाळी १०.५० पासून आतापर्यंत विलंब झाला आहे.

## अंबोडा येथे घराची भिंत पडून चिमुकल्या शरविचा दुर्दैवी मृत्यू

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १७ :** तालुक्यामध्ये येत असलेले ग्राम अंबोडा येथे वार्ड क्रमांक २ मधील रहिवासी मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे व रोजंदारी करत कुटुंबाचा गाडा चालवणारे प्रवीण प्रकाश शिरसाट यांच्या राहत्या घराची मुख्य भिंत रविवार दुपारला दोन ते तीन च्या दरम्यान पडली असून त्या भिंतीखाली त्यांची मुलगी शरवी ही खेळत असताना तिचा त्या भिंतीखाली दबून दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरामध्ये या घटनेने शोककळा पसरली.



या घटनेने प्रत्येक कुटुंबातील नागरिक या घटनेला पाहण्याकरता मोठा गर्दी जमा झाली. चिमुकल्या शरवीचा दुर्दैवी मृत्यू झाल्यामुळे दुःखाचे सावट गडद झाले असून त्यांचे आजोबा शंकर नारायण शिरसाट व वडील प्रवीण प्रकाश शिरसाट यांनी तिला तात्काळ अकोट ग्रामीण रुग्णालय मध्ये दाखल केले त्यावेळी त्यांनी शरविला मृत झाले असे घोषित केले. घटनास्थळी पटवारी संदीप देऊळकर ग्रा. पो. स्टेशनचे पो. निरीक्षक किशोर जुनगरे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जमादार ठोसरे मेजर यांचा ताफा तात्काळ दाखल झाला, व पुढील तपास आकोट ग्रामीण पोलीस स्टेशन करीत आहे यावेळी सर्व शिरसाट परिवारांनी प्रशासनाला मदतीची मागणी केली आहे.

> ❑ येथे वार्ड क्र. दोन मध्ये रविवार दुपारला शिरसाट यांच्या राहत्या घराची भिंत पडून त्यामध्ये चिमुकल्या शरवी चा मृत्यू झाला व घराची झालेल्या पडझळीची तहसील व महसूल विभागाने परिवाराला सावरण्याकरता मदत द्यावी.
>
> **- प्रवीण बायवार,** अंबोडा ग्राम. सदस्य

> ❑ रविवार दुपारला दोन ते तीन च्या दरम्यान माझ्या मुलाचे राहते घराची भिंत पडल्यामुळे माझी एकुलती एक नाथ शरवीचा त्या मध्ये खेळत असताना मृत्यू झाला व घर पडल्याने अकोट तहसील प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी
>
> **- शंकर नारायण शिरसाट,** आजोबा

## अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे प्रचंड आर्थिक नुकसान!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**रिसोड, दि. १७ :** रिसोड तालुक्यांमध्ये झालेला पाऊस हा मागील ४० वर्षात झालेला विक्रमी पाऊस आहे. या ढग फुटी सदृश्य पावसामुळे शेतकऱ्याचे प्रचंड आर्थिक नुकसान झालेले आहे. जमिनीमधील पीक अक्षरशा खरडून गेलेले आहे. विशेष म्हणजे चालू पावसाळ्यामधील ही चौथी ढगफुटी आहे. यामुळे तालुक्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडून पडला आहे. परिणामी शेतकऱ्याच्या पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. रिसोड तालुक्यातील शेलु खडसे, मोरगव्हाण,चाकोली, बोरखेडी पिंपरखेड,पाचंबा, मोठेगाव एकलासपूर, भर जहागीर,आदी गावांना सलग चौथ्यांदा सततधार पावसाने झोडपून काढले आहे. तालुक्यातील भर जहागीर व मोप महसूल मंडळामध्ये आज धुवाधार पाऊस झाल्याने शेती पिकाला फटका बसला त्यामुळे तेथील शेतकरी हवालदील झाला आहे सरकारकडून तातडीची मदत मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.गेल्या ४० वर्षातील हा सर्वात मोठा महापूर असल्याची माहिती शेलु खडसे परिसरातील ग्रामस्थांनी दिली आहे. या पावसामुळे रिसोड तालुक्यातील शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून प्रशासनाकडून आता तरी नुकसान भरपाईची मदत मिळणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शेतकऱ्यावर आलेल्या या अस्मानी संकटाची प्रशासनाला जाणीव व्हावी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांनी तहसीलदारांना निवेदनाद्वारे शेतकऱ्याच्या व्यथा कळविल्या आहेत. तसेच झालेल्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून द्यावी असे निवेदन तहसीलदार यांना दिले आहे. या वेळी निवेदनावर कैलास पाटील खानझोडे, रवी पाटील नरवाडे, संदीप पाचरणे,विनोद खडसे, विष्णू जाधव,पुरुषोत्तम नरवाडे, रमेश सदार,गजानन तिरके, परशराम गव्हाणे,संतोष नरवाडे, विष्णू पारडे,विजय मुटकुळे इत्यादी सदस्यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## महागाव येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कळंबी महागाव, दि. १७ :** जि प शाळा कळंबी महागाव येथे स्वतंत्र दिवस साजरा करण्यात आला.सर्वप्रथम शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश सावळे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच गावचे सरपंच सौ रत्नप्रभा मुरलीधर ठाकरे, उपसरपंच विजय सावळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, पोलीस पाटील चंद्रमणी सावळे, पोलीस पाटील सुधाकर ठाकरे, तंटामुक्ती अध्यक्ष कडू सावळे, ग्रामपंचायत सदस्य भास्करराव ठाकरे, कलाबाई सावळे, अरुण सावळे, विनोद सावळे ,ग्रामसेविका शितल मोरे, अनिता शेंडे , सुषमा पानतावणे, उषाताई वाकडे, रंजना सावळे, मीनाताई सावळे, हर्षाली सावळे,



सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष नानाराव ठाकरे, माजी सरपंच अंकुश ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते रामराव सावळे, भारत सावळे, दशरथ सावळे, दिवाकर सावळे, जुगल सावळे, सुभाष सावळे, उमेश सावळे, मेजर सुधाकर पांडुरंग सावळे, आशीर्वाद सावळे, संकेत सावळे,संजय सावळे, समाधान डाबेराव, हे सर्व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. मुख्याध्यापक गजानन बावस्कर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले याप्रसंगी भारतीय सैन्यांमध्ये कार्यरत असलेले आणि आपल्या देशाची सेवा करणारे निलेश सावळे उपस्थित होते जि प शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून छान कवायती पाहायला मिळाल्या.याप्रसंगी सातवीतील विद्यार्थी मानव सावळे, व कु. गुंजन सावळे, यांनी भाषणे दिली या कार्यक्रमाला गावातील समस्त मंडळी लहान मोठे सर्व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १७ :** स्थानिक श्रीजी कॉलनी स्थित सेंट पॉल्स अकॅडमी येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटीया, उपायध्यक्ष लुणकरण डागा कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सचिव प्रमोद चांडक,रेखा चांडक ,तसेच शारदा लखोटिया,सुधा डागा,दीपम लखोटिया,अवनी लखोटिया,ज्योती घुरड व मुख्याध्यापक विजय बिहाडे , उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, अभिजीत मेंढे, मालती महल्ले,सारिका रेळे, प्रभुदास नाथे यांची मंचावर उपस्थिती होती . संचलन वर्ग ५ वी व ६ वी मधून आराध्या पांडे ,श्रेयस येवूल,व काव्यश्री राऊत,दर्शन बुंदेले यांनी




केले.इयत्ता १ ली व २ री मधल्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले व इयत्ता ३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांनी कृष्ण माता आधारीत गीत सादर केले.त्यांना साथ अर्चना रायबोले व योगेश चेडे यांनी दिली.या कार्यक्रमात नर्सरी ते केजी २ च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.विद्यार्थ्यांनी कृष्णाची व राधाची वेशभूषा केली होती. जन्माष्टमीनिमित्त नर्सरी ते केजी २ सहभाग घेतला.इयत्ता १ते ६ च्या विद्यार्थ्यांसाठी जन्माष्टमीनिमित्त प्रश्न विचारण्यात आले व त्याचे विद्यार्थ्यांनी उत्तर देऊन वर्ग के. जी.२ विद्यार्थ्यांनी श्रावण मास विशेष नृत्य सादर केले.नर्सरी व के.जी.१च्या विद्यार्थ्यांनी नृत्य स्वरूपात कृष्णलीला सादर केली. वर्ग ३ री च्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले.वर्ग ५ वी च्या विद्यार्थ्यांनी गोविंदा बनून नृत्य सादर करून कार्यक्रमाची सांगता दहीहंडी फोडून केली. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमोद चांडक यांनी जन्माष्टमी व कृष्णलीला निमित्त मत व्यक्त केले. आभार प्रदर्शन धनुष नवघरे यानी केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक कार्य प्रभारी आनंद काळमेघ, रवी अंभोरे, सचिन सुपळकर, दिक्षिता चोपडे, भारती बघेले, युगंधरा मरोळकर, पूजा वाकोडे, सुदर्शन अंभोरे, निकिता महल्ले, मीना वर्मा, वैशाली गावत्रे, माधुरी काळे, शुभांगी वाकोडे, सविता भोरखडे, रचना सुपासे, ज्योती रंधे, ममता सोनटक्के, भावना खेडकर, रिंकू राठोड, संदेश चोंडेकर, नारायण वानखडे, आशिष लांडे तसेच सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

लोकसंस्कृती | बंजारा समाजात तीज म्हणजे आनंदाची पर्वणी

# पारंपारिक नृत्यामधून तीज उत्सव साजरा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. १७ :** तिज म्हणजे बंजारा समाजाच्या लोक संस्कृतीचे सर्व पदर आणि पैलू उलगडणारा उत्सव. या उत्सवात दहा दिवसाआधी अविवाहित मुली एका टोपलीत गौरी स्वरूप धान (गहू) पेरतात, रोज त्याला पाणी घालून बोलीभाषेत आराध्य देवतांची गीते म्हटली जातात. विसर्जनाच्या दिवशी डोक्यावर गौरीस्वरूप धान घेऊन वाजत गाजत तांड्याला प्रदक्षिणा केली जाते.मंगरुळपीर येथेही तिज ऊत्सव मोठ्या ऊत्साहात साजरा करुन महिलांनी पारंपारीक नृत्य सादर करत आपला आनंद व्यक्त केला.



बंजारा परंपरेतील सर्वात महत्वाचा असलेला तिज उत्सव मंगरुळपीर येथे उत्साहात साजरा करण्यात आला.भारतीय संस्कृतीत प्रत्येक जाती धर्मातील विविध उत्सव वेगळ्या ढंगाने व परंपरेने साजरे केले जातात. त्यामुळेच आपल्या देशातील विविधतेत एकता दिसून येते. इसवी सन पूर्वपासून बंजारा समाजात चालत आलेला सर्वात महत्वाचा तीज उत्सव पार पडला. कधीकाळी डोंगरदऱ्यात राहणाऱ्या बंजारा समाजात तीज म्हणजे आनंदाची पर्वणीच असते. श्रावण महिन्यात ठिकठिकाणी बंजारा तांड्यांवर तिज उत्सवाची पाहायला मिळतो. सध्या तीज उत्सवाच्या बंजारा लोकगीतांनी तिथल्या लोकांवर चांगलच गारुड घातलं आहे. पारंपारिक वेशभूषेत फेर धरून नाचणाऱ्या महिला मुली सहभागी झाल्या. डोंगरदऱ्यात राहणाऱ्या बंजारा समाजाने आपली वेगळी परंपरा,लोकसंस्कृती आणि वेगळेपण जपल्याचे यानिमित्ताने दिसून आले.

महिला प्रधान संस्कृतीचे दर्शन घडवणारा हा उत्सव मातृ शक्तीला वंदन करणारा असून, आद्यगण ''गण गौर'' यांचे महत्व विशद करणारा आहे. सालाबाद प्रमाणे यंदाही उत्सव मंगरुळपीर परिसरात साजरा केला गेला. यावेळी मोठया प्रमाणात बंजारा बांधव आणि भगिनी या उत्सवाला उपस्थित होत्या.

'गौरी'स्वरूप धान घेऊन तांड्याला घालतात प्रदक्षिणा तिज हा उत्सव म्हणजे बंजारा समाजाची दिवाळीच. तिज म्हणजे बंजारा समाजाच्या लोक संस्कृतीचे सर्व पदर आणि पैलू उलगडणारा उत्सव. या उत्सवात दहा दिवसाआधी अविवाहित मुली एका टोपलीत 'गौरी स्वरूप' धान (गहू) पेरतात, रोज त्याला पाणी घालून बोलीभाषेत आराध्य देवतांची गीते म्हटली जातात. विसर्जनाच्या दिवशी डोक्यावर 'गौरी'स्वरूप धान घेऊन वाजत गाजत तांड्याला प्रदक्षिणा केली जाते. लग्न होऊन सासरी गेलेल्या मुली, महिला तिज उत्सवाच्या निमित्याने माहेरी येतत. त्यामुळे या उत्सवाला वेगळे महत्त्व आहे.

## कुरणखेड तंटामुक्ती अध्यक्षपदी जशीमुद्दीन खतीब यांची निवड

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कुरणखेड, दि. १७ :** दरवर्षी १५ ऑगस्टला स्वतंत्र दिनानिमित्त महात्मा गांधी तंटामुक्त ग्राम समितीची निवडणूक घेण्यात येते यावर्षी कुरणखेड ग्रामपंचायत येथे १७ रोजी ही निवडणूक संपन्न झाली यात जशीमुद्दीन खतीब हे अविरोध निवडून आले आहे.



गावातील भांडणे गावातच मिटली पाहिजेत.दोन समुद्रामध्ये होणारी भांडणे गावात मिटावीत या माध्यमातून २००७ मध्ये महात्मा गांधी तंटामुक्त ग्राम समितीची स्थापना करण्यात आली तेव्हापासून दरवर्षी एका वर्षासाठी तंटामुक्ती अध्यक्ष यांची निवडणूक जनतेतून होत असते. हीच निवडणूक १७ ऑगस्ट रोजी कुरणखेड ग्रामपंचायत कार्यालयात संपन्न झाली.यावेळी या निवडणुकीच्या कारभार ग्रामविकास अधिकारी रवी काटे यांनी पाहिला. यावेळी दोन उमेदवारांचे अर्ज दाखल झाले होते. त्यामध्ये जशीमुद्दीन खतीब,नजर अली,या दोघांचा उमेदवारी अर्ज दाखल झाला होता मात्र दोन्ही उमेदवारांनी संमती करून जशीमुद्दीन खतीब यांची अविरोध निवड करण्यात आली आहे त्यामुळे तंटामुक्तीच्या निवडणुकीत सुद्धा तंटा न होता या निवडणुकीने चांगला संदेश देत कुरणखेड गावाचे नाव जिल्ह्यात प्रसिद्ध करून गावातील एकता दाखवून दिली आहे. यावेळी ग्रामसेवक रवि काटे, प्रशांत पांडे, तसलिम बेग मिर्झा, सुशिल मोहोड, अमन महल्ले, मिलिंद मोहोड,सलिम मिर्झा,किरण उमाळे, विनोद आठवले, गावकरी उपस्थित होते.

Mrs Sunita Jatal Madam's
SHREE G-SQUARE GUIDANCE
9767930223
11th/ 10th
NEET /JEE /MHT- CET
STATE BOARD
8th, 9th, 10th
STATE BOARD / CBSE
FOUNDATION
•SBI बँकेच्या बाजूला भारत पेट्रोल पंप समोर,कौलखेड अकोला.
•चैतन्य कॉलनी,एकविरा ग्राउंड मागे, गौरक्षण रोड,अकोला

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

OM COACHING CLASSES
COMPUTER SCIENCE
11th & 12th
Behind Tathod Mangal Karyalaya, Shastri Nagar, Akola,

## महत्त्वाचे

### शिवभक्तांना अकराशे किलो खिचडीचा महाप्रसाद

**अकोला :** श्रावण सोमवारच्या शेवटच्या सोमवारी शिवभक्तांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेस अकोला महानगरचे कार्याध्यक्ष यश ओमप्रकाश सावंल यांच्या पुढाकारातून गांधी रोड येथे तब्बल अकराशे किलो खिचडीचे वाटप करण्यात येणार आहे. राजराजेश्वर मंदिरात दर्शनासाठी येणारे भाविक, कावडधारी तसेच पालखीतील भक्त या महाप्रसादाचा लाभ घेऊ शकतील. यावेळी कावडधारी व पालख्यांचे जंगी स्वागत करण्यात येणार आहे. या उपक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व सावंल मित्रपरिवार मोठ्या संख्येने सहभागी होणार आहे. हा धार्मिक आणि सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून भक्तांना आनंद देण्याचा प्रयत्न असल्याचे यश सावंल यांनी सांगितले.

### गणेशघाटावरील विसर्जन टाक्यांचे नूतनीकरण

**अकोला :** श्री गणपती बाप्पाच्या मूर्तीचे विसर्जन स्वच्छ पाण्यात व्हावे, या उद्देशाने अकोला महापालिकेचे माजी महापौर मदन भरगड यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या खोलेश्वर येथील गणेशघाटावरील विसर्जन टाक्यांचे नूतनीकरण अखेर सुरू झाले आहे. महापालिका प्रशासनाकडून दि. १४ ऑगस्ट रोजी या कामाला सुरुवात करण्यात आली. तब्बल १८ वर्षांनंतर या आठही विसर्जन टाक्यांचे नूतनीकरण होत असल्याने परिसरातील नागरिक आणि गणेशभक्तांनी समाधान व्यक्त केले आहे. गणेशोत्सव काळात प्रदूषणमुक्त विसर्जनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी हे पाऊल उचलण्यात आले असून यामुळे पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यास मोठी मदत होणार आहे.

### सायबर सुरक्षा कार्यशाळा

**अकोला :** श्री शिवाजी विद्यालय, मुख्य शाखा येथे इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा विषयक कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. शाळेचे मुख्याध्यापक विजय ठोकळ यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापक हिम्मतराव गवई होते. प्रमुख अतिथी म्हणून अमर देशमुख तर विशेष मार्गदर्शक म्हणून शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे बीसीए अंतिम वर्षातील विद्यार्थी यश भालेराव व सुमित सपकाळ उपस्थित होते.

# ’हर्र बोला महादेव’च्या गजरात शिवभक्तांचे गांधीग्रामकडे प्रस्थान

## शिवभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण; उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १७ :** अकोल्याचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वर महाराजांना श्रावणाच्या चवथ्या सोमवारी श्री राजराजेश्वर ला जलाभिषेक करण्यासाठी कावडधारी शिवभक्तांनी रविवारी (ता.१७) हर्र बोला महादेव च्या गजरात गांधीग्राम येथे प्रस्थान केले. यावेळी हजारो शिवभक्तांच्या स्वागतासाठी अकोला नगरी सज्ज झाली असुन जिल्हा प्रशासनाकडूनही आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देत कावड महोत्सव उत्साहात आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज केली आहे.



अकोल्याचा कावड महोत्सव हा दरवर्षीच संपूर्ण राज्यात शिवभक्तांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवारी कावडधारी शिवभक्त गांधीग्राम येथील पूर्णा नदी पात्रातील जल आणुन श्री राजराजेश्वराचा जलाभिषेक करतात. श्रावणाच्या चवथ्या सोमवारी शहरातील छोट्या शिवभक्त मंडळासह अकोल्यातील जुने शहरवासी शिवभक्त मंडळ, जय बाभळेश्वर शिवभक्त मंडळासह शेकडो मंडळांच्या शिवभक्तांनी गांधीग्रामकडे प्रस्थान केले.

यावेळी कावडमार्गावर शिव भक्तांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी जिल्हाधिकारी अजित कुंभार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. कमलेश भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी नियोजन करून सर्व शिवभक्तांना आरोग्य सेवा पुरवण्याची व्यवस्था केलेली आहे.

### कर्मचाऱ्यांना विशेष गणवेश

कावड मार्गावर काम करणाऱ्या आरोग्य कर्मचारी, अधिकाऱ्यांना विशेष गणवेश टी-शर्ट, टोपी पुरविण्यात आलेली आहे. पिण्याचे पाण्याचे वेळोवेळी परीक्षण करण्यात येत आहे. तसेच शिवभक्तांना ठिकठिकाणी आरोग्य शिक्षण देण्याकरिता आरोग्य संदेश असलेले डिजिटल बोर्ड, बॅनर ,हस्त पत्रिका यांच्याद्वारे तसेच आरोग्य कर्मचारी यांचे मार्फत आरोग्य शिक्षण देण्यात येणार आहे.

### कावड मार्गावर दहा उपचार केंद्र

कावड मार्गावर दहा उपचार केंद्र उपलब्ध करण्यात आले आहेत. या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, वाहन चालकांची नियुक्ती केली आहे. उपचार केंद्राचे ठिकाणी तसेच आरोग्य उपकेंद्रामध्ये आवश्यक तो औषध साठा उपलब्ध करून ठेवण्यात आलेला आहे. या मार्गावर एकूण ९ रुणवाहिका अद्यावत ठेवण्यात आल्या आहेत. उपचार केंद्राचे ठिकाणी टेंथ द्वारे निवारा करण्यात आलेला आहे. तर या सर्व सेवांचा शिवभक्तांनी लाभ घ्यावा, असे आव्हान जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी केले आहे.

### ४११ सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा वॉच

**संपूर्ण पालखी मार्गावर तसेच गर्दीच्या संभाव्य ठिकाणी ४११ हाय-रिझोल्यूशन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. पोलिस नियंत्रण कक्षातून यावर थेट देखरेख ठेवण्यात येणार आहे. हवाई देखरेखीसाठी १० उच्च क्षमतेचे ड्रोन यंत्रे कार्यरत ठेवण्यात येणार असून, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन परिस्थितीचे वेळीच निदान करण्यासाठी ही यंत्रणा उपयोगी ठरणार आहे. महत्त्वाच्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या १० वॉच टॉवर्सवरून पोलीस अधिकारी थेट नियंत्रण ठेवणार असून, कुठेही संशयास्पद हालचाल दिसताच त्वरित प्रतिसाद दिला जाणार आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी संवेदनशील ठिकाणी मजबूत बॅरिकेडिंग करण्यात आली आहे. रस्ता बंदीची योग्य पूर्वकल्पना देण्यात येणार आहे.**

# गांधीग्राम येथे शोध व बचाव पथके सज्ज

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १७ :** श्रावण महीण्यातील चवथ्या सोमवारच्या अनुषंगाने पुर्णा नदी गांधीग्राम ता.अकोला येथे बचाव पथक सज्ज ठेवण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्याआदेशानुसार उपविभागीय अधिकारी अकोला व तहसीलदार अकोला यांचे मार्गदर्शनामध्ये रविवारी (ता. १७) रोजी दुपारपासुन रात्रभर सर्व कावड पुर्णा नदीवरुन पुर्णपणे निघेपर्यत पुर्णा नदी गांधीग्राम येथे आपत्ती व्यवस्थापन बचाव पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. गांधीग्राम येथे अकोला तहसीलचे नायब तहसीलदार महेंद्र आत्राम , मंडळ अधिकारी दत्ता काळे, प्रशांत सायरे, हरीहर निमकंडे तसेच आपात्कालिन पथकाचे सुनिल कल्ले, दिपक सदाफळे, नजर अली, गौतम मोहोड, रुषिकेश राखोडे, रणजित घोगरे इत्यादी सदस्य तसेच संत गाडगेबाबा आपात्कालिन पथक, वंदे मातरम आपत्कालिन पथक, माँ चंडीका आपत्कालिन पथक पैलपाडा, विर एकलव्य आपत्कालिन पथक पोपटखेड या पथकांचे सदस्य बोट, लाईफ जॅकेट,लाईफ रिंग, रेस्क्यु रोप, इमरजन्सी लाईट, सर्चलाईट इत्यादी साहित्यासह उपस्थित आहेत. मुर्तिजापुर तालुक्यातील लाखपुरी येथील पुर्णा नदी येथे मोठया प्रमाणात मुर्तिजापुर व दर्यापुर तालुक्यातील शिवभक्त पुर्णा नदीचे जल आणण्यासाठी लाखपुरी येथे जातात. त्याअनुषंगाने तहसीलदार मुर्तिजापुर यांचे मार्गदर्शनामध्ये लाखपुरी येथे बचाव पथक सज्ज राहणार आहे. रविवारी दुपारपासुन रात्रभर सर्व कावड पुर्णा नदीवरुन पुर्णपणे निघेपर्यत सदर पथक पुर्णा नदी येथे सज्ज राहील. सदर ठिकाणी नायब तहसीलदार रविंद्र राऊत, मंडळ अधिकारी पुरी, उमेश आटोटे, पदीप मोहोड, विर भगतसिंग पथक कुरणखेड , लाखपुरी येथील आपत्कालिन पथक बचाव साहीत्यासह सज्ज आहेत.

# मतदार यादीतील घोटाळा म्हणजे निवडणूक आयोगाचे षडयंत्र- जितेंद्र आव्हाड

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १७ :** देशात बोगस मतदानाचा मोठा घोटाळा निवडणूक आयोगाच्या छत्रछायेत रचला गेला असून, हा जनतेच्या डोळ्यांत धुळफेक करण्याचा कट आहे, असा घणघाती आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री आमदार जितेंद्र आव्हाड यांनी रविवारी अकोल्यात केला. शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते म्हणाले, राज्यात फक्त चार महिन्यांत तब्बल ७६ लाख मतदारांची वाढ झाली. पंधरा टक्के इतकी अकस्मात वाढ कशी झाली? एका घरात ४०-



५० मतदार नोंदवले गेले, तेही निरनिराळ्या धर्माचे. हा प्रकार म्हणजे थेट निवडणूक आयोगाच्या कारभारातील महाघोटाळाच. आव्हाड पुढे म्हणाले की, याच संदर्भात मी ३० नोव्हेंबर २०२४ रोजीच संशय व्यक्त केला होता. पण महायुती सरकारने याकडे दुर्लक्ष केले. आज संविधानाच्या विरोधात सभा घेतल्या जात आहेत. आता तर खाद्यसंस्कृतीवर गदा आणली जात आहे. मांस खाऊ नये असे आदेश काढणाऱ्यांचा डीएनए जातीयवादी आणि मनुवादी असल्याचा आरोपही त्यांनी केला. यावेळी आव्हाडांनी तुळजापूर मंदिराचा मुद्दा उपस्थित केला. मंदिराच्या इतिहासाशी छेडछाड करून तो पुसून टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र राज्यातील जनता हे कदापि सहन करणार नाही, असेही ते म्हणाले. पत्रकार परिषदेत मंडल यात्रेची माहिती देण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने ओबीसी समाजाच्या हक्कासाठी नागपूर येथून ९ ऑगस्टला ही यात्रा सुरू केली असून तिचा समारोप १८ सप्टेंबर रोजी मुंबईत होणार आहे. या वेळी राज राजापूरकर, माजी मंत्री गुलाबराव गावंडे, आ. साजिद खान पठाण, जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे, डॉ. आशा मिरगे, प्रा. विश्वनाथ कांबळे, आनंद वानखडे, परिमल लहाने, विशाल गावंडे यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# कोट्यवधी खर्च करुन उभारलेला अंडरपास की स्वीमिंग पूल?

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १७ :** शहराच्या मध्यवर्ती गांधी रोडपासून सुंदराबाई टॉवरपर्यंत वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेला अंडरपास गेल्या चार-पाच वर्षांपासून पावसाळा आला की बंदच ठेवावा लागत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य प्रकारे न झाल्याने अंडरपासमध्ये चार ते पाच फूट पाणी साचते परिणामी हा मार्ग प्रशासनाला बंद ठेवावा लागतो.त्यामुळे हा अंडपास आहे की स्वीमिंग पूल असा प्रश्न नागरिकांना पडला आहे,




हा मार्ग बनविल्याने गांधी रोडवरील या अंडरपासच्या दोन्ही बाजूंचे रस्ते अरुंद झाले असल्याने वाहनधारकांना दररोज त्रास सहन करावा लागत आहे. अंडरपासचा काहीच उपयोग न होता उलट वाहतूक कोंडी अधिक वाढली असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. शहराच्या विकासाच्या नावाखाली करदात्यांच्या खिशातून कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले, मात्र पावसाळ्यात हा अंडरपास बंद ठेवावा लागत असल्याने हा पैसा थेट पाण्यात गेला, असे चित्र निर्माण झाले आहे.

गेल्या चार ते पाच वर्षांत कित्येकदा नागरिकांनी अंडरपासमधील साचलेल्या पाण्याविरोधात आवाज उठवला. आंदोलनेही झाली. वाहतूक सुलभ करण्याऐवजी त्रासदायक ठरणाऱ्या या प्रकल्पामुळे प्रशासनाची कार्यपद्धत आणि नियोजनावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत. दरम्यान, आगामी काळात प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अन्यथा नागरिकांकडून जनआंदोलन उभे राहू शकते.

**■ अंडसपासचा उपयोग कमी आणि त्रास अधिक अशी परिस्थिती निर्माण झाली असून अनेकदा नागरिकांच्या चार चाकी, मोटरसायकली अंडरपासच्या पाण्यात अडकल्यामुळे नागरिकांना त्रास झाला आहे. एवढेच काय तर या अंडर पास मध्ये बुडून एकाचा मृत्यु झाल्याचा घटना काही दिवसांपूर्वी घडली आह.**

# नवसाक्षर परीक्षेत जिल्ह्याने मारली बाजी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १७ :** उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रम संपूर्ण देशासह अकोला जिल्ह्यामध्ये उत्साहात राबविण्यात येत आहे. २३ मार्च २०२५ रोजी घेण्यात आलेल्या असाक्षरांच्या चाचणी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या निवडक नवसाक्षरांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान स्वातंत्र्य दिनाच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी संजयकुमार झापे, जिल्हा परिषद अकोला यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सहाय्यक योजना अधिकारी प्रमोद टेकाडे, मुख्याध्यापक राजीव भिरड, मनपा शाळा मराठी क्रमांक ९ काळा मारोती, मुख्याध्यापक मोहम्मद अब्दुल अजीज, मनपा उर्दू मुलांची शाळा क्रमांक ६ अकोट फाईल, सहाय्यक शिक्षिका फरुख कौसर, कुबरा परवीन याची उपस्थिती होती. अकोला जिल्ह्यामध्ये २३ मार्च २०२५ रोजी घेण्यात आलेल्या असाक्षरांच्या परीक्षेमध्ये एकूण ८५७८ परीक्षार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ८४३९ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले असून उत्तीर्ण टक्केवारी ९८% आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये ही निकालाची टक्केवारी चांगली असल्याने शिक्षण संचालक योजना महाराष्ट्र राज्य पुणे यांनी अकोला जिल्ह्याचे कौतुक सुद्धा केले आहे. या नवसाक्षरांना केंद्रशासनाद्वारे प्रमाणपत्र देण्यात आले असून या प्रमाणपत्राचे वितरण स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने शिक्षणाधिकारी योजना जिल्हा परिषद अकोला कार्यालय मार्फत करण्यात आले. सर्वप्रथम सर्व नवसाक्षर यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. नवभारत साक्षरता कार्यक्रम अकोला जिल्ह्यात यशस्वी राबविण्यासाठी उपशिक्षणाधिकारी गजानन पारधी,सहायक योजना अधिकारी प्रमोद टेकाडे कार्यालयीन कर्मचारी गजानन येवले,सतीश देवकर,अनिल वडुरकर परिश्रम घेत असून सन २०२५ मध्ये सुद्धा नवभारत साक्षरता कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्याचे आवाहन संजयकुमार झापे शिक्षणाधिकारी योजना जिल्हा परिषद अकोला यांनी केले आहे.

## अमृत योजना
## १४ टक्के अधिक दराने निविदा प्राप्त

# भुयारी योजनेला आर्थिक फटका बसणार का?

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १७ :** अमृत योजनेत पहिल्या टप्प्यात झालेल्या प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी सादर झालेल्या निविदा शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा १४ टक्के अधिक आहे. त्यामुळे निविदा मंजूर केल्यास या प्रकल्पाला आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

अमृत योजनेच्या पहिल्या टप्प्यातील शिलोडा येथील मलजल शुद्धीकरण केंद्राच्या देखभाल दुरुस्तीसाठी महापालिकेला एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. मात्र, या निविदा १४ टक्के अधिक दराने प्राप्त झाल्या आहेत. आता पर्यंत चारवेळा निविदा प्रसिद्ध केल्याने अधिक दराने देखभाल दुरुस्तीचे काम दिले जाणार की पुन्हा निविदा प्रसिद्ध केल्या जाणार? याबाबत प्रशासन



निर्णय घेणार आहे.

अमृत योजनेच्या पहिल्या टप्प्यात ६७ कोटी रुपये खर्च करुन भुमिगत गटार योजनेचे पहिल्या टप्प्यातील काम करण्यात आले. यात शिलोडा येथे ३० एमएलडी क्षमतेचे तसेच पिकेव्ही परिसरात ७ एमएलडीचे मलजलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात आले. तसेच मोर्णा नदीच्या डाव्या काठावर २.३८ किलोमीटर लांबीची टंकलेन तसेच उजव्या बाजूने ११.६८ किलोमीटर लांबीची टंकलेन टाकण्यात आली. मोर्णा नदीला एकुण ३८ नाले येवून मिळतात. या नाल्यातील पाणी नदीपात्रात जातो. हे सांडपाणी या ट्रंकलेन मधून शिलोडा येथील मलजल केंद्रात जाणार असून त्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यातील योजनेचे काम पूर्ण झालेले आहे. मात्र विविध तांत्रिक कारणामुळे

योजना अद्यापही पूर्णपणे कार्यान्वित झालेली नाही. या योजनेचे लोकार्पण तत्कालीन पालकमंत्री बच्चु कडू यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. मात्र तीन वर्ष उलटूनही नाल्यातील सांडपाण्यावर अद्यापही प्रक्रिया सुरु झाली नाही. प्रशासनाने यापूर्वी तीन वेळा देखभाल दुरुस्तीसाठी निविदा बोलावल्या. मात्र विविध कारणामुळे या निविदांची अंमलबजावणी झाली नाही. मात्र आता चौथ्यांदा निविदा प्रसिद्ध केली असून तीन निविदा प्राप्त झाल्या मात्र अधिक दराने प्राप्त झाल्याने खर्चात वाढ झाली आहे.

### चेंबरकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

मोर्णा नदीला येवून मिळणाऱ्या ३८ नाल्यांच्या तोंडावर चेम्बर तयार करण्यात आले. नाल्यातील कचरा मलजलवाहिनीत अडकू नये, यासाठी चेंबरच्या तोंडावर लोखंडी जाळ्या लावण्यात आल्या होत्या मात्र, या जाळ्या उपद्रवींनी लंपास केल्या आहेत. दरम्यान या नाल्यांच्या जाळ्याकडे लक्ष देणे कंत्राटदारासाठी डोकेदुखी ठरणार आहे. कारण सांडपाणी जाळ्यातून न जाता थेट मल जलवाहिनीत गेल्यास मलजलवाहिनी चोक होण्याची शक्यता आहे.

# दगडपारवा धरणात बुडून युवकाचा मृत्यू



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १७ :** बार्शीटाकळी तालुक्यातील दगडपारवा धरणात बुडाल्याने बार्शीटाकळी शहरातील २९ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली. याप्रकरणी बार्शीटाकळी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

सादिक नगर, बार्शीटाकळी येथील शेख रिजवान हा रविवारी आपल्या समवयस्क मित्रांसोबत दगडपारवा येथील धरणावर मासेमारीसाठी गेला होता. दरम्यान, त्याचा पाय घसरून तो पाण्यात पडला. स्थानिक नागरिकांनी शर्थीचे प्रयत्न करून त्याला बाहेर काढले. मात्र तोपर्यंत त्याची प्रकृती गंभीर झाली होती.

सदर युवकाला तातडीने बार्शीटाकळी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र वैद्यकीय उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे बार्शीटाकळी शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५



डॉ. पांडेस् मेड. रेमेडीज (OPC) प्रा.ली.

डॉ. रविराज पांडे (एम.डी.)

वात, दमा, अस्थमा, वजन वाढविणे, कमी करणे, त्वचा रोग, वंधत्व, लैंगिक समस्या, स्त्री रोग, सर्व प्रकारच्या व इतर रोगांवर उपचार व मार्गदर्शन केल्या जाईल.

व्यंकटेश कॉलनी, शंकरनगर जवळ, अमरावती. ( दर सोमवारी )

C/o राईकवार हॉस्पिटल जयस्तंभ चौक परतवाहा ( दर महिन्याचा 3 रा. शनिवार )

C/o महाराष्ट्र मेडिकल बनोसा रोड, दर्यापूर ( दर महिन्याचा 2 रा. गुरुवार )

वेळ : दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत

मो. 9890043911, 9372151186


## ठाकूर यांचा खळबडजनक आरोप, नावे गायब झाल्याचा दावा, आकडेवारीसह भंडाफोड

# तिवसा मतदारसंघात ३५ हजार मतांचा घोटाळा!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १७ :** गतवर्षीच्या विधानसभा निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांचा अनपेक्षित पराभव, तर काहींचा थोडक्यात विजय झाला. आता त्यामागचे खरे कारण म्हणून मतचोरीचा मुद्दा गाजू लागला आहे.

काँग्रेसच्या माजी मंत्री व तिवसा मतदारसंघातून पराभूत झालेल्या यशोमती ठाकूर यांनी आकडेवारीसहित या घोटाळ्याचा भांडाफोड केला असून, तब्बल ३५ हजार पेक्षा जास्त मतांची चोरी झाल्याचा सनसनाटी दावा केला आहे.

ठाकूर यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, तिवसा मतदारसंघात २००९ ते २०१९ या दरम्यान दरवर्षी सरासरी पाच हजार मतदारांची नैसर्गिक वाढ होत होती. २०१९ मध्ये मतदारसंख्या २,९५,९९२ वर पोहोचली होती. नैसर्गिक वाढीचा विचार करता २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ही संख्या ३,२०,००० असायला हवी होती; मात्र प्रत्यक्षात ती २,८४,२४३ निघाली, म्हणजेच पाच वर्षांत ११,७४९ मतांची घट झाली. नैसर्गिक वाढ धरली तर जवळपास ३६ हजार मतदार यादीतून गायब झाल्याचा ठपका ठाकूर यांनी ठेवला. आश्चर्याची बाब म्हणजे, केवळ सहा महिन्यांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारसंख्या अचानक १२,२५२ ने वाढून आले आहेत.



### लोकसभा मतदारसंघात दीड लाख मतांचा घोळ !



अमरावती लोकसभा मतदारसंघातील आकडेवारीही तितकीच धक्कादायक आहे. २००९ ते २०१९ दरम्यान मतदारसंख्या जवळपास दर पाच वर्षांत दोन लाखांनी वाढली; पण २०१९ ते २०२४ या पाच वर्षांत केवळ ५,६७७ मतांची वाढ झाली. दीड-दोन लाख मते यादीतून वगळली नसती, तर काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखडे १ लाख मतांनी विजयी झाले असते, असा दावा यशोमती ठाकूर यांनी केला.

## व्हिडिओ शूट करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

### गुन्हे शाखा युनिट दोनची कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १७ :** शहरात इंस्टाग्रामसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा गैरवापर करून दहशत पसरवणाऱ्या कुख्यात 'राडा गँग'चा पोलिसांनी अखेर पर्दाफाश केला आहे. गुन्हे शाखा युनिट टूने केलेल्या या धडक कारवाईत केवळ १९ वर्षीय तिन्ही तरुणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून घातक चायना चाकू आणि रोकड जप्त करण्यात आली आहे.

पोलिसांना १४ ऑगस्ट रोजी माहिती मिळाली होती की, काही तरुण इंस्टाग्रामवर राडा रिल्स टाकून परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण करत आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचला असता, आरोपी नॅशनल हायवे पुलाखाली नवा व्हिडिओ शूट करण्याच्या तयारीत असल्याचे उघड झाले. यावेळी पोलिसांनी अचानक धाड टाकून त्यांना जेरबंद केले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सूरज अरुण रताळे (१९, गजानन नगर, बिच्छू टेकडी), सुजल संजय मसराम (१९, आदिवासी नगर, महफिल इन मागे) व स्वप्नील शरद उके (१९, गजानन नगर, बिच्छू टेकडी) यांचा समावेश आहे. त्यांच्या ताब्यातून ३ चायना चाकू व ३ हजार रुपये असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, तिघांविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संपूर्ण कारवाईचे नेतृत्व पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी केले. यामध्ये पो. उपनिरीक्षक महेश इंगोले, संजय वानखेडे, गजानन ढेवले, दीपक सुंदरकर, आस्तिक देशमुख, संग्राम भोजने, योगेश पवार, राजीक रायलीवाले व निलेश वंजारी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

## लूटमार करणारे आरोपी पोलिसांच्या ताब्यात

### विधिसंघर्षित बालकाचा सहभाग | ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १७ :** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील धवलसरी येथे वृद्धाचा मोबाईल झडपून फरार झालेल्या दोन सराईत चोरांना ग्रामीण गुन्हे शाखेने जेरबंद केले. तब्बल ९० हजारांचा मुद्देमाल त्यांच्या ताब्यातून जप्त झाला असून या गुन्ह्यात विधिसंघर्षित बालकाचाही सहभाग उघडकीस आला आहे.

११ ऑगस्ट रोजी सायंकाळी स्थानिक वृद्ध देवीदास मानके हे शेताकडे जाताना पुण्यातील बहिणीशी मोबाईलवर बोलत होते. त्याचवेळी मागून आलेल्या तिघांनी मोटारसायकलवरून झडप घालत त्यांचा मोबाईल हिसकावला व धानोरा फर्शी रोडकडे फरार झाले. तात्काळ मानके यांनी लोणी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. याघटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले. दर्यापूर उपविभागाचे पो.उ.नि. नितीन इंगोले यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला. तपासात चोरीचा धागा राजना येथील सागर विलास गेडाम (२०) व रोहन प्रकाश गेडाम (१९) या दोघांपर्यंत पोहोचला. दोन्ही आरोपींना अटक केल्यानंतर त्यांनी सुरुवातीला टाळाटाळ केली. मात्र कठोर चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांनी या चोरीत एका विधिसंवर्षित बालकाची मदत घेतल्याचेही पोलिसांसमोर कबूल केले. आरोपींकडून चार मोबाईल, एक दुचाकी असा एकूण ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपासासाठी आरोपींना लोणी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक किरण वानखेडे यांच्या नेतृत्वात पो.उ.नि. नितीन इंगोले, सुनील महात्मे, सैय्यद अजमत, सुधीर बावणे, निलेश डांगोरे, चेतन दुबे, जयश्री खंडारे, हर्षद घुसे, पवन भांबुरकर, सागर धापड व विकास अंजीकर यांनी केली.

### चारचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**अमरावती :** मित्रासोबत चार चाकीने (एमएच २७-डीयू ७८६०) जात असताना मागून भरधाव येणाऱ्या चार चाकीने (एमएच २७-डीए ०१९१) धडक दिली. त्यात चारचाकीचे नुकसान तर झालेच मित्राला मुका मार बसला. ही घटना राठी नगर येथे घडली. शाह नवाज खान शकील अहमद खान (३०) याच्या तक्रारीवरून धडक देणाऱ्या चालकाविरुद्ध गाडगे नगर पोलिसांनी गुन्हा नोंदवला. गाडगेनगर पोलिस त्या चारचारकी वाहनचालकाचा शोध घेत आहे.

## अवैध दारूविक्रेत्यावर कारवाई

**अमरावती :** फ्रेजरपुरा, नांदगाव पेठ, राजापेठ व भातकुली पोलिसांनी सहा वेगवेगळ्या कारवाई करीत एकूण १ लाख १५ हजार ४७० रुपयांची दारू जप्त करीत सात जणांसह एका महिलेवर गुन्हा दाखल केला. सार्वाधिक तीन कारवाई नांदगाव पेठ पोलीस ठाण्यांतर्गत, तर उर्वरित कारवाई फ्रेजरपुरा, राजापेठ व भातकुली पोलिसांनी केल्यात.

कारवाई दरम्यान एकजण पळून जाण्यात यशस्वी झाला. पोलिस आरोपीचा शोध घेत आहे.

## रक्षाबंधन पर्वावर ब्रह्माकुमारींनी दिली परमात्म्याच्या संरक्षणाची अनुभूती!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १७ :** रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमित्त ब्रह्माकुमारी ईश्वरीय विद्यापीठ, अमरावती सेवा केंद्रात विशेष आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी व अमरावती सेवा केंद्राच्या संचालिका आदरणीय बी.के. सीता दीदी यांनी शहरातील मान्यवर नागरिक, अधिकारी, शिक्षणतज्ज्ञ, समाजसेवक व विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींना पवित्रतेची राखी बांधून परमपिताश्रीशी दिव्य रक्षणसंबंधाची अनुभूती दिली. सीता दीदी यांनी रक्षाबंधनाचे आध्यात्मिक महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की 'खरे रक्षाबंधन म्हणजे आत्मा आणि परमात्मा यांच्यातील अविचल पवित्रता, आध्यात्मिक दृढता व दिव्य संरक्षणाच्या नात्याची आठवण करून देणारे आहे. जेव्हा आपण आत्मस्वरूपात परमपिताश्रीशी जोडले जातो तेव्हा ते आपल्याल प्रत्येक नकारात्मकतेपासून सुरक्षा प्रदान करतात.'



तसेच त्या म्हणाल्या राखी हा केवळ एक धागा नसून संकल्पाचे बंधन आहे जीवनात पवित्रता, प्रामाणिकपणा, करुणा आणि सत्य यांचे पालन करण्याचा संकल्प. जेव्हा हा संकल्प परमात्म्याशी जोडला जातो तेव्हा तो ईश्वरी शक्तींनी भरलेला असतो. या प्रसंगी शेकडो नागरिकांनी ब्रह्माकुमारी सेवा केंद्रात येऊन राखी बांधली, आत्मिक शांतीचा अनुभव घेतला व परमात्म्याशी पवित्र रक्षणसंकल्प दृढ केला. कार्यक्रमात विशेषत: आध्यात्मिक गीत, मुरली वाचन, ध्यानसत्र आणि ईश्वरी संदेशांचा समावेश होता. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले व जीवनात ईश्वरी मूल्ये अंगीकारण्याचा संकल्प व्यक्त केला. सीतादीदी, जिल्हा संचालिका ब्रह्माकुमारी अमरावती, यांनी अमरावती जिल्हाधिकारी श्री. आशीष येरेकर यांना राखी बांधून ईश्वरी सौगात दिली.आमदार रविभाऊ राणा यांना रक्षासूत्र बांधले.महानगरपालिका आयुक्त श्रीमती सौम्या शर्मा यांना राखी बांधली. महानगर पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांना राखी बांधली.प्रख्यात समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लप्पीशेठ भैया जाजोदिया यांना राखी बांधण्यात आली.

## कार-दुचाकी अपघातात पती, पत्नीसह दोघे जखमी

### वरूड-मोर्शी मार्गावरील घटना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वरूड, दि.१७ :** वरूड ते मोर्शी मार्गावर शनिवारी दुपारी झालेल्या भीषण अपघाताने परिसर हादरला. शहरातील रिलायन्स पेट्रोल पंपासमोर झालेल्या या अपघातात एकाच कुटुंबातील चौघे गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने अमरावती येथे दाखल करण्यात आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अर्टिगा गाडी वरूडवरून मोर्शीकडे जात असताना समोरून चुकीच्या दिशेने बाईक येत होती. त्या बाईकवर एकाच कुटुंबातील चार जण स्वार होते. अपघात टाळण्यासाठी अर्टिगा चालकाने वाहन वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र गाडी थेट डिव्हायडरला धडकून बाजूच्या टिंबर दुकानात घुसली. धडक इतकी जोरदार होती की लोखंडी अंगलसुद्धा वाकलान गेला. शहापूर येथील रहिवासी आशु देवराव भलावी (३२), पत्नी गीता आशु भलावी (२७) तसेच त्यांची लहान मुले अंशिका व अंश भलावी गंभीर जखमी झाले. रक्ताने माखलेल्या रस्त्यावर पडलेले आई-वडील आणि त्यांची चिमुकली मुले पाहून नागरिकांच्या डोळ्यात अश्रू आले. घटनास्थळी हृदय पिळवटून टाकणारे दृश्य पाहायला मिळाले. जखमींना वरूडहून अमरावती शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. अपघातानंतर घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती. प्रथमदर्शनी अपघाताचे कारण बाईकस्वाराची चुकीची दिशा असल्याचे समोर येत आहे. या मार्गावर वारंवार अपघात घडत असल्याने तातडीने सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या घटनेचा तपास वरूड पोलीस करीत आहेत.

## थोडक्यात

### क्षुल्लक वादातून वृद्धाला मारहाण

**अमरावती :** सायकल रस्त्याच्या बाजुला घे असे का म्हटले म्हणून एकाने वृद्धासोबत वाद घालत त्याला चाकूने हाताला मारत दुखापत केली. ही घटना शुक्रवार बाजारात घडली. जखमी वृद्ध, उत्तम गणपतराव बनसोड (६०) यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### संपत्तीवरून दोघा भावांमध्ये वाद

**अमरावती :** संपत्तीच्या वादातून लहान भावाने मोठ्यासोबत वाद घालत त्याला मारहाण करीत जखमी केले. ही घटना विद्यापीठ मार्गावर घडली. जावेद खान नुर खान (४२) यांच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी शाकीर खान नुर खान (४०) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### शेती साहित्याची चोरी

**अमरावती :** अंजनगाव बारी शिवारात असलेल्या गुणवंत रंगरावजी आठवले (४२) यांच्या शेतातून अज्ञाताने १० हजारांच्या शेती साहित्याची चोरी केली. बडनेरा पोलिसांनी तक्रारीवरून अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### शासकीय कामात अडथळा करणाऱ्यावर कारवाई

**अमरावती :** पानठेल्याच्या आडून अवैधरित्या दारूची विक्री होत असल्याची गुप्त माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाली. त्यावरून पानठेल्याची पाहणी करण्यासाठी गेलेल्या पथकासोबत अक्षय सुभाषराव बाभुळकर (३५) याने हुज्जत घालत कामात अडथळा आणला. संदीप सागरसिंग पेंढारकर (४२) यांच्या तक्रारीवरून खोलापूर गेट पोलिसांनी युवकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### घरातून मोबाईल व लॅपटॉप लंपास

**अमरावती :** चार्जिंगला लावलेला मोबाईल व लॅपटॉप अज्ञाताने घरात घुसून चोरून नेला. ही घटना पोटे टाऊनशिपमध्ये घडली. अमित कुमार हवालदार (२२) यांच्या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### युवतीच्या बॅगेमधून सोन्याचे दागिने लंपास

**अमरावती :** एकवीरा देवीच्या दर्शनासाठी गेलेल्या २८ वर्षीय युवतीच्या बॅगमधून अज्ञात चोरट्याने रोख २५ हजार व ४ ग्रॅमची अंगठी असा एकूण ४५ हजारांचा ऐवज चोरून नेला. राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### मोबाईल शॉपीतून युवतीने लांबविला मोबाईल

**अमरावती :** सेकंड हँड फोन घेण्याची बतावणी करीत तोंडाला दुपट्टा बांधून आलेल्या युवतीने अंदाजे ५५ हजारांचा फोन चोरून नेल्याची घटना प्रिंसेस मार्केटमध्ये घडली. यश दिलीप पमनानी (२५) यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात युवतीविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### गळफास लावून वृद्धाची आत्महत्या

**अमरावती :** राहत्या घरी गळफास लावून अंबादास गंफुजी राऊत (७०, रा. बौद्धपुरा, जुनी वस्ती, रहाटगाव) यांनी आत्महत्या केल्याची घटना घडली. नांदगाव पेठ पोलिसांनी मर्ग नोंदवला. घटनेचा पुढिल तपास नांदगांव पेठ पोलिस ठाण्याचे ठाणेदारच्या मार्गदर्शन करीत आहे. वृद्धाने आत्महत्या का केली याचे कारण कळू शकले नाही.

# ढगफुटीमुळे जनजीवन विस्कळीत

### एनडीआरएफची टीम तैनात, प्रशासन सज्ज

दै. अजिंक्य भारत | रोशन वानखडे



**चांदूर बाजार, दि. १७ :** स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी चांदुर बाजार तालुक्यामध्ये दुपारी अचानक ढगफुटी झाल्यामुळे अनेक नागरिकांना पूर सदृश्य परिस्थितीचा सामना करावा लागला कमी वेळेमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये पावसाने थैमान घातल्याने जनजीवन विस्कळीत झाले प्रशासनाने योग्य वेळी परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी एनडीआरएफ च्या टीम ला प्राचारण करण्यात आल्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित हानी झालेली नाही परंतु अनेक गावांमध्ये नागरिकांच्या घरामध्ये दुकानांमध्ये आणि शेतीमध्ये पावसाचे पाणी शिरल्यामुळे अतोनात नुकसान झाले असे निदर्शनास येत आहे.

ढगफुटीमुळे करजगाव, शिरजगाव देऊरवाडा, माधान जसापुर, जमापूर परसोडा, नानोरी-सोनोरी आणि जालनापुर मधील सिलीमपूर या गावांना फटका बसला. सर्वात जास्त माधान या गावांमध्ये पुराचे पाणी नागरिकांच्या घरामध्ये आणि दुकानांमध्ये शिरल्याने त्यांचे घरातील साहित्य अन्नधान्य व दुकानांमधील संपूर्ण मालाचे नुकसान झाले आहे. पुराचे पाणी शेतीमध्ये शिरल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामधील सोयाबीन पीक तूर व कपाशी या पिकांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झालेले आहे. चांदूरबाजार तालुक्यामध्ये ढगफुटी झाल्यामुळे जमापुर येथील नाल्याला आलेल्या पुराचे पाणी नागरिकाच्या घरामध्ये शिरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले परंतु स्थानिक नागरिक व ग्रामपंचायत कार्यालय शिरजगाव बंड आणि प्रशासनाच्या मदतीने तातडीने नागरिकांना सुखरूप बाहेर काढून त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले.प्रशासनाने योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्यामुळे तहसीलदार (प्रभारी) लक्ष्मीकांत तिवारी, नायब तहसीलदार मनोज सोनारकर, सुमेध सोनवणे ग्रामविकास अधिकारी पी.पी.येवले, सरपंच, उपसरपंच तसेच सतीश गोमकाळे ग्रामपंचायत लिपिक शिरजगाव बंड यांचे जनतेकडून कौतुक करण्यात येत आहे.पुराचे पाणी घरामध्ये दुकानांमध्ये आणि शेतीमध्ये शिरल्यामुळे झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई नागरिकांना लवकरात लवकर देण्यात यावी अशी मागणी घटनास्थळावर पाहणी करण्यासाठी आलेले खासदार बळवंत वानखडे,आमदार प्रवीण तायडे एसडीओ आणि तहसीलदार यांना करण्यात आली. यावेळी लोक स्वातंत्र पत्रकार महासंघाचे तालुकाध्यक्ष गजानन ढवळे शहराध्यक्ष रोशन वानखडे, उपाध्यक्ष डिगांबर गायकवाड, सचिव गजानन कावरे यांनी गावकऱ्यांना सांत्वन पर भेट दिली.

## थोडक्यात

### दारु विक्रेत्यावर कारवाई

**मोर्शी:** अवैध देशी दारूची वाहतूक करणाऱ्या एका इसमाला पकडून त्याच्याजवळून जवळपास ८५ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात मोर्शी पोलिसांनी यश प्राप्त केले. पोलिसांना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे मोर्शी ते चांदुरबाजार रोडने एक इसम नामे सुमीत रविंद्र सावळे रा. खानापूर ता. मोर्शी हा त्याचे मोटर सायकलवर अवैधरित्या देशी दारू वाहतुक करतांना आढळून आला. त्याच्या ताब्यातून ५० नग देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या काचेच्या पावट्या कि.५ हजार व होंडा कंपनीची ॲक्टीवा मोपेड क्र.एम एच २७ डी.व्ही ३०२२ किं.अं. ८० हजार असा एकूण 85 हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करून महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

### घरात घुसून महिलेची छेडखानी

**लोणी :** पती कुठे गेले असे म्हणून घरात शिरून एका युवकाने महिलेची छेडखानी तर पतीला धमकी दिल्याची घटना लोणी पोलीस ठाणे हद्दीत १३ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून सागर प्रकाश दाखल करण्यात आला.

### रस्त्याच्या वादातून इसमास मारहाण

**परतवाडा :** रस्त्यात टिनपत्रा ठेवल्याने बाजुला करण्यास सांगितल्यावरून वाद होवून एका इसमाला शिवीगाळ, काठीने मारहाण तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. कैकाडीपुरा, कांडली येथे ही घटना घडली. याप्रकरणी विनोद आत्माराम तायडे यांच्या तक्रारीवरून हेमंत तायडे व दोन महिला यांच्याविरूध्द ध्द परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

### रेहानपार्क परिसरात घरफोडी

**मोर्शी :** बंद घराला लक्ष्य करीत अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून कपाटातील सोन्याच्या दागिने किंमत अंदाजे १.३० लाखांचा ऐवज चोरून नेल्याची घटना शहरातील रेहानपार्क येथे १३ ऑगस्ट रोजी घडली. रेहान पार्क येथील रहिवाशी सोहल अहेमद खान सत्तार खाँ यांच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी कपाटातील सोन्याचा नेकलेस, काळे मनी, मंगळसूत्र, पोथ, अंगठी असा एकूण १.३० लाखांच्या ऐवजावर हात साफ केला. याप्रकरणी सोहेल खान यांनी मोर्शी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### क्षुल्लक कारणावरून युवकाला मारहाण

**मोर्शी :** मोर्शी या रस्त्याने का जात आहे या कारणावरून एका युवकाला शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. चिंचोली गवळी येथे ही घटना घडली. याप्रकरणी निलेश कृष्णाजी गायकवाड यांच्या तक्रारीवरून उज्वल खोब्रागडे, अमोल हनवते, विशाल बागडे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### वारोळी येथून बैल चोरी

**ब्राम्हणवाडा थडी :** नजिकच्या वारोळी येथे गोठ्यात बांधून ठेवलेला बैल किंमत अंदाजे ३० हजार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १२ ते १३ ऑगस्ट दरम्यान घडली. याप्रकरणी शेतकरी गजेंद्रसिंग बबनसिंग जयवार वय ५०, रा. वारोळी यांच्या तक्रारीवरून ब्राम्हणवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी

# राज्यातील दोन लाखांवर विद्यार्थ्यांचा आज फैसला!

दै. अजिंक्य भारत | सुधीर केने



**अमरावती, दि. १७ :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीचा निकाल आज सोमवार १८ ऑगस्ट रोजी जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे या परीक्षेला प्रविष्ट झालेल्या २ लाख ११ हजार ३०८ विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा फैसलाआज होणार आहे.

राज्यात २७ ते ३० मे २०२५ व २ ते ५ जून २०२५ या कालावधीत शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी घेण्यात आली होती. या परीक्षेला राज्यातून २ लाख २८ हजार ८०८ उमेदवारांनी नोंदणी केली होती .त्यापैकी २ लाख ११ हजार ३०८ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते .त्यापैकी बीएड परीक्षेचे १५ हजार ७५६ तर डी एल एड परीक्षेचे १३४२ अशा एकूण १७०९८ विद्यार्थ्यांनी अपियर अशी नोंद अर्ज करताना केली होती .१४ ऑगस्ट २०२५ अखेर बीएड परीक्षेचे ९९५२ व डी एल एड परीक्षेच्या ८२७ अशा एकूण १० हजार ७७९ विद्यार्थ्यांनी आपली व्यावसायिक अहर्ता माहिती परीक्षा परिषदेकडे पाठविली होती. इतर विद्यार्थ्यांनी मात्र आपली माहिती अद्यापही परीक्षा परिषदेकडे सादर केली नाही. ज्या उमेदवारांनी या परीक्षेसाठी अर्ज केला त्यावेळी उमेदवारांची व्यावसायिक अर्हता त्यावेळी च्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक व अन्य वैद्य प्रमाणपत्र एक महिन्याच्या आत परीक्षा परिषदेकडे सादर करणे आवश्यक होते. शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा राज्यातील २ लाख ११ हजार ३०२ विद्यार्थ्यांनी दिली होती या परीक्षेचा निकाल सोमवार १८ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केला जाणार आहे त्यामुळे सर्व उमेदवारांच्या नजरा या निकालाकडे लागले आहेत.

### ६३१९ विद्यार्थ्यांचा निकाल राखीव

ज्या विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अर्हता त्यावेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक व अन्य वैद्य प्रमाणपत्र व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांक पासून एक महिन्याच्या आत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सादर केले नाही अशा बीएडचे ५८०४ व डीएलएटचे ५१५ अशा एकूण ६३१९ विद्यार्थ्यांचा निकाल राखून ठेवण्यात येणार आहे.

# घरफोडी करीत चोरून नेला पावणे दोन लाखांचा ऐवज

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १७ :** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत मेहर बाबा कॉलनी, गल्ली क्रमांक १ येथे राहणाऱ्या स्वप्निल विलास अठावले (३२) यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून १ लाख ८९ हजार रुपये किमतीचा सोन्याचा ऐवज चोरला. ही घटना १५ ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तर वृत्तानुसार, फिर्यादी स्वप्नील अठावले यांची बहीण रक्षाबंधनानिमित्त २८ जुलै रोजी त्यांच्या घरी आली होती. तिने १२ ऑगस्ट रोजी आपले मौल्यवान सामान आणि बॅग कपाटात ठेवून मावशीकडे जाण्यासाठी निघून गेली. स्वप्निल हे फोटोग्राफीचे काम करतात.

१४ ऑगस्ट रोजी ते मित्राला हार्ड डिस्क देण्यासाठी गेले होते. मित्राकडे व्हिडिओ एडिटिंगच्या कामाला उशीर झाल्याने ते तिथेच राहिले. १५ ऑगस्ट रोजी सकाळी घरी परतल्यानंतर त्यांना घराच्या मुख्य दरवाज्याचे कुलूप तुटलेले आढळले. आत प्रवेश करताच त्यांना हॉलमधील ड्रॉवर उघडे आणि बेडरूममधील लोखंडी कपाट तोडलेले दिसले. घरातील सामान अस्ताव्यस्त केलेले होते. स्वप्निल यांनी आपल्या बहिणीला फोन करून माहिती दिली. तिने बॅग तपासण्यास सांगितले. बॅग तपासल्यानंतर त्यातील १५ ग्रॅमची सोन्याची बोरमाळ, २५ ग्रॅमचा गोफ, ३ ग्रॅमची अंगठी व १ ग्रॅमची सोन्याची अंगठी असा एकूण १ लाख ८९ हजारांचा ऐवज चोरीला गेल्याचे दिसले. फिर्यादीच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निलेश गणवीर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. १७ :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची विश्रामगृह अमरावती येथे बैठक संपन्न झाली. या बैठकी मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( शरद पवार गट ) महाराष्ट्र प्रदेश जिल्हाध्यक्ष अमरावती ग्रामीण पदी निलेश गणवीर यांची निवड करण्यात आली आहे.

निलेश गणवीर हे रा. काँ. चे जुने जाणते कार्यकर्ते असून संघटन सचिव पदी धुराही ते सांभाळत आहेत. पंडित प्रभात कांबळे यांनी नियुक्ती केली आहे.अमरावती ग्रामीण जिल्हात पक्षाची संघटनात्मक बांधणी उत्तमरीत्या करून पक्ष मजबूत करण्यासाठी सर्वत्रकालीन योगदान देण्यासाठी निवड करण्यात आलेली आहे.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माननीय आमदार शशिकांत शिंदे साहेब यांच्या अमरावती जिल्ह्यात प्रथम आगमना प्रसंगी विश्रामगृह येथे ग्रामीण कार्यकर्त्याची संवाद मेळाव्यात एकनिष्ठ कार्यकर्ता व प्राप्त केलेल्या विश्वासातून प्रदेशाध्यक्ष यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी आमदार रोहित दादा पवार, हर्षवर्धन देशमुख, अरुण धर्माळे, भास्करराव ठाकरे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष अनिल जळमकर, रा. काँ. पक्षाचे सर्वे तालुकाध्यक्ष, पदाधिकारी, सदस्यगण व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.जिल्हा कार्यकारणीने त्यांचे अभिनंदन केले आहे.

## नांदगांव येथे विविध ठिकानी स्वतंत्रता दिवस उत्साहात साजरा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नांदगांव खंडेश्वर,दि. १७ :** शासकीय कार्यालय कॉलेज ग्राम पंचायत स्तरावर १५ अगस्तस्वतंत्रता दिवसउत्साहत साजरा करण्यात आला विद्यार्थी नी शाला कॉलेज मधे सांस्कृतिक कार्यक्रम सादरकरीत स्वतंत्रता सा ठी बलिदान करणारे थोर पुरूषाचे त्याग व बलिदानाचे नाट्य सदर करी त स्वतंत्रता दिवसाचे महत्व प्रस्तुत केले तहसील पंचायत समिति नगर पंचायत मध्य सुधा ध्वजारोहण करण्यात आले.

शेवटी तहसील कार्यालय मध्ये गावातील मान्यवर यांचा उपस्थितित तहसीलदार अश्वनी जादव यानी ध्वजारहण केले अनेक मान्यवर्णी स्वतंत्र दिन निमित्य आपले मनोगत व्यक्त करून स्वतंत्रता दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या विद्यार्थीनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.



### दैनिक अजिंक्य भारत कार्यालयचे नंदगांव येथे उद्घाटन

नंदगांव बस स्टॉपच्या मागे दैनिक अजिंक्य भारत कार्यालय के उद्घाटन माजी आमदार धाने पाटिल यांचे हस्ते करण्यात आले पत्रकारीतेचे महत्व व जवाबदारी संदर्भात आपले मनोगत व्यक्त केले व १५ ऑगस्ट स्वतंत्र दिनचर्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी संपादक सुनील तायडे प्रा के के पाटील कणसे पत्रकार आकाश वरगट तात्या सोलंके तथाआमंत्रित मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. के. के. पाटिल कणसे यानी केले



## खोलापूर असगर हुसेन उर्दू हायस्कूल येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**खोलापुर, दि. १७ :** स्थानिक असगर हुसेन उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर स्वातंर्त्य दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सय्यद शफकत साहेब, प्राचार्य सय्यद रेहान, समाजसेवक मोहम्मद शफीक, अब्दुल रज्जाक दिल, पर्यवेक्षक रशीद खान आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी दहावी बारावी परीक्षेत व शिष्यवृत्ती परीक्षेत 50 विद्यर्थ्यांनी नेत्र दीपक यश संपादन करणाऱ्या विद्यर्थ्यांचे तसेच विविध क्षेत्रातील विशेष कामगिरी बजावणाऱ्या माजी विद्यर्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाला



संबोधित करताना संस्थेचे अध्यक्ष सय्यद शफकत यांनी विद्यर्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. देशासाठी बलिदान देणाऱ्या शहिदांवर आधारित विद्यर्थ्यांनी सादर केलेल्या नाटिकाने श्रोत्यांनी भावनिक साद दिली.

## बेनोडा ( शहीद ) येथील शिव मंदिरात श्रावण मास उत्साहात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**बेनोडा, दि. १७ :** श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारला भगवान शिवाची विशेष पूजा-अर्चा करण्याची परंपरा या वर्षीही भक्तिभावाने पार पडत असून, बेनोडा (शहीद) येथील शिव मंदिरात श्रावण सोमवार मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

पुराण आणि शास्त्रानुसार सोमवारचे व्रत तीन प्रकारचे मानले जातात ङ्क श्रावण सोमवार, सोळा सोमवार आणि सोम प्रदोष. मात्र, सावन सोमवारचे व्रत महिलांसाठी विशेष महत्त्वाचे असून त्या पारंपरिक पद्धतीने उपवास करतात. हे व्रत सुरू करण्यासाठी श्रावण महिना अत्यंत शुभ मानला जातो. या व्रतामध्ये भगवान शिव आणि देवी पार्वतीची विधीवत पूजा केली जाते. श्रावण सोमवारच्या व्रताचे धार्मिक महत्त्वही मोठे आहे. अविवाहित मुलींना योग्य वर मिळावा, विवाहित स्त्रियांच्या पतीचे दीर्घायुष्य लाभावे तसेच पुरुषांना शंकरकृपा प्राप्त व्हावी यासाठी हे व्रत केले जाते. श्रद्धेनं केलेल्या या पूजेमुळे आरोग्य, धन, संतती आणि समृद्धी प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे. सोमवारच्या दिवशी शिवमंदिरात अभिषेक, पूजा आणि उपवास करण्याला विशेष महत्त्व असल्याने, बेनोडा (शहीद) येथील महादेव मंदिरात सकाळपासूनच भाविकांची गर्दी उसळली होती. दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या आणि संपूर्ण मंदिर परिसर हर हर महादेवच्या जयघोषांनी दुमदुमून गेला होता. श्रावण महिना शिवभक्तांसाठी पवित्र आणि मंगल मानला जात असल्याने, या उत्सवाला मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून आपली श्रद्धा व्यक्त केली.

## श्री. विवेकानंद सेवा संघ पतसंस्थेतर्फे गुणवंताचा गौरव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**शिरखेड, दि. १७ :** तालुक्यातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्था असलेल्या कर्मचाऱ्याची बँक श्री.विवेकानंद सेवा संघ कर्मचारी पतसंस्था लेहेगावची वार्षिक सर्वसाधारण सभेच्यानिमीत्ताने शालांत परीक्षेत संस्थेच्या चारही शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व सेवानिवृत्त कर्मचारी सत्कार आयोजित करण्यात आल होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.धनंजय तट्टे तर प्रमुख अतिथी संस्थेचे उपाध्यक्ष नित्यानंद देशमुख, व्यवस्थापक जितेंद्र उर्फ बाबुजी तट्टे, पी.आर देशमुख, शिवाजी शे.पाटील आर.पी.निकम, पिंपळखुटाचे सरपंच निलेश मरकाम, एस.एन.चौधरी, नितीन गंजीवाले, एस.यु.देशमुख, जे.एम. देशमुख, अजय तट्टे, नेताजी शे.पाटिल, एस.बी. कोरडे, अमोल तट्टे, उपाध्यक्ष पि.बी.आडे, सचिव विलास बा.मडावि, कोषाध्यक्ष नितीन जाणे, अतुल तट्टे, अतुल गावंडे, प्रमोद पारीसे, दिपाली ठाकरे तसेच संचालक मंडळी संजय बागडे, ज्योती वानखडे उपस्थित होते. याप्रसंगी मार्च २०२४ परीक्षेत संस्थेतील शाळेतुन प्रथम आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिस वितरीत करण्यात आले. तसेच



सेवानिवृत्त मुख्याध्यापक जे.एम.देशमुख, एस.यु.देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रास्ताविकातुन अध्यक्ष अमोल क्षि.तट्टे यांनी संस्थेच्या प्रगतीचा, उपक्रमाचा आढावा घेत संस्थेच्या कार्याचा अहवाल मांडला. याप्रसंगी मान्यवरांनी मनोगतातुन पतसंस्थेच्या माध्यमातुन सभासदांना अडचणीत आर्थिक मदत होण्याकरीता काळाची पावले ओळखत संस्थापक अध्यक्ष सहकारमहर्षी स्व.माणिकराव पाटील तट्टे यांनी संस्था स्थापन केली. त्यांच्या दुरदृष्टीमुळे आज कर्मचाऱ्यांना इतर बँकेकडे जावे लागत नाही असे उदगार काढले तसेच सामाजिक दायीत्व पार पाडण्याचे काम करीत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था मूळ प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करा

## नगर रचना अधिकाऱ्याचे पद भरा | तिवसा शहरासाठी कपात केलेल्या निधीबाबत व्यक्त केली नाराजी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**तिवसा, दि. १७ :** जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडलेल्या दिशा समितीच्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थेतील निधी वितरणावरील दुजाभाव उजागर करत या विषयाकडे लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी यांचे लक्ष वेधण्यात आले. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये तिवसा नगरपंचायत अंतर्गत तिवसा शहराची विकास योजना मंजुरी बाबत राज्य शासनाने अधिसूचना दिनांक ४ जून २०२५ रोजी शासन निर्णयान्वये निर्गमित केली मंजूर केली. या अनुषंगाने शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने भविष्यातील नगर रचना व तिवसा शहरातील भूखंड व खुल्या जागेवरील महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत अधिनियम, नगररचना अधिनियम त्यानुसार जनहितार्थ विविध उपाययोजना व त्या संदर्भातील इमारती उपक्रमांकरीता आरक्षित जागेसंदर्भात शासनाने मान्यता दिली आहे.

ग्रामपंचायत मधून परावर्तित झालेली नवनिर्मित नगरपंचायत तिवसा येथे शासनाच्या दीर्घकालीन विकास योजना अमलात याव्या याकरिता रचना सहाय्यक हे रिक्त पद जिल्हाधिकारी अमरावती यांनी तातडीने भरून या ठिकाणी अधिकाऱ्याची नेमणूक करावी अशी मागणी जिल्हा विकास समन्वय व नियंत्रण ( दिशा ) समिती सभेच्या निमित्ताने, अमरावती लोकसभा मतदारसंघाचे



खासदार बळवंतराव वानखडे, राज्यसभेचे खासदार डॉ. अनिलजी बोंडे यांच्या उपस्थितीत नगराध्यक्ष सौ प्रतिभाताई गौरखेडे, नगरसेवक तथा मा.नगराध्यक्ष वैभव स. वानखडे यांनी सविस्तर बाजू मांडून केली.

याचप्रमाणे जिल्हा नियोजन समिती अंतर्गत नगरोत्थान व दलितेत्तर या लेखाशीर्ष अंतर्गत लोकसंख्येनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेला शहराच्या विविध प्रभागांमधील विकास कामे करण्यासंदर्भातला उपलब्ध होणारा निधी हा तिवसा व भातकुली येथे स्थानिक स्वराज्य संस्थेची विद्यमान कार्यकारिणी (बॉडी) कार्यरत असताना, व इतर नगरपालिकांमध्ये प्रशासक असताना सुद्धा, जिल्हा प्रशासन अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त नगर विकास शाखा अमरावती यांनी दोन महिन्यापूर्वी दीडपटीने विकास कामांचा प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात पत्र व्यवहार केला असता, यामध्ये मुख्याधिकारी नगरपंचायत तिवसा यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सूचनेनुसार तिवसा शहरातील सतरा प्रभागातील दीडपटीने विकास कामांचा प्रस्ताव सादर केल्यानंतर या निधीमध्ये दोन वेळा कपात करण्यात आली. त्यामुळे ७३ वी ७४ वी घटना दुरुस्ती व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या नियमांचे उल्लंघन जिल्हा प्रशासन नगर विकास शाखा करत असून, मंजूर नियतव्यय मध्ये जिल्हा नियोजन समितीतून राजकीय दबावापोटी कपात केल्याचे स्पष्ट दिसून येत असल्याने, नगरपंचायत तिवसा यांनी सादर केलेल्या मूळ प्रस्तावास प्रशासकीय मान्यता न दिल्यास न्यायालयीन प्रक्रियेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार हिरवणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी यासंदर्भात न्यायालयीन लढाई लढू असा इशारा या निमित्ताने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना नगराध्यक्ष सौ. गौरखेडे , व नगरसेवक वैभव वानखडे यांच्या मार्फत पत्राद्वारे देण्यात आला.

या संदर्भात खासदार बळवंतराव वानखडे यांनी लोकल बॉडी अस्तित्वातअसताना निधीवर गदा अन्य चुकीचे असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निदर्शनास आणून दिले.

तिवसा शहरातील स्वत:ची जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा व घरकुल मिळावे हा मुद्दा सुद्धा उपस्थित करण्यात आला, सोबतच आरडीएसएस योजनेअंतर्गत तिवसा शहरातील वीज वितरण व्यवस्था सक्षम होण्याच्या दृष्टीने वैभव वानखडे यांनी केलेल्या पाठपुराव्याच्या अनुषंगाने ग्राम वरुडा, व तिवसा येथे तातडीने नवीन अद्यावत ट्रांसफार्मर बसविण्यात येणार असल्याचे कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता वीज वितरण यांनी उपस्थित लोकप्रतिनिधी अधिकाऱ्यांना आश्वासित केले.

अजिंक्य भारत
# आपलं यवतमाळ
सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com


**महत्वाचे**

### जीवे मारण्याची धमकी

**यवतमाळ :** स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कर्तव्यावर असलेल्या पोलिसांनाच धक्काबुक्की करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार घडला. याप्रकरणी शहर पोलिसांनी दोन जणांविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. सपोनी मिलिंद सरकटे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी रोहन दिलीप रामटेके आणि त्याचा एक साथीदार हे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोठ्या आवाजात भोंगा वाजवून आरडाओरड करत होते. पोलिसांनी त्यांना हटकले असता, आरोपींनी संगनमत करून पोलिसांशी वाद घातला. त्यांनी पोलिसांना धक्काबुक्की करून मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच, शासकीय मालमत्तेचे विद्रूपीकरण करून त्यांनी शासकीय कामात अडथळा निर्माण केला. पोलिसांनी याप्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### पैसे न दिल्याने बांबूने मारहाण

**यवतमाळ :** दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला बांबूच्या तुकड्याने मारहाण करून जखमी केले. ही घटना १५ जून रोजी पिंपळगाव बायपास रोडवर घडली असली तरी, याबाबत नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी लोहारा पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. प्रवीण अंबादास पिसे (वय ३८) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी रवी भीमराव पंचभाई (वय ३०) याने त्यांच्याकडे दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली. त्यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपीने त्यांच्याशी वाद घातला. तसेच, शिवीगाळ करत बांबूच्या तुकड्याने त्यांच्या हातावर आणि कमरेवर मारून त्यांना जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंदवून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

### दगडाने डोक्यावर हल्ला

**दारव्हा :** 'विनाकारण शिवीगाळ का करता,' असे विचारल्याच्या रागातून चार जणांनी संगनमत करून एका व्यक्तीच्या डोक्यावर दगडाने हल्ला करून त्याला जखमी केले. ही घटना शुक्रवारी (दि. १५) दुपारी तालुक्यातील नखेगाव येथे घडली. याप्रकरणी दारव्हा पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दिनेश बकाराम मैद (वय ५१) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते गावातील पाण्याच्या टाकीजवळ जात असताना आरोपींनी त्यांना विनाकारण शिवीगाळ केली. त्यांनी जाब विचारताच आरोपी संतोष दिगांबर तोंडरे, आकाश विजय देशमुख, नितीन विजय देशमुख आणि संदीप भीमराव ठाकरे यांनी संगनमत करून त्यांच्याशी वाद घातला. तसेच, दगडाने त्यांच्या डोक्यावर मारून त्यांना जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली.

# टाकळी परिसरात महापुराचा तडाखा

## अनेक घरे पाण्याखाली, शेकडो हेक्टर शेती खरडून गेली, इतिहासातील सर्वात मोठा पूर

✦ बाळू राठोड

**टाकळी ई., दि. १७ : उमरखेड तालुक्यातील टाकळी, नारळी, अमडापूर, कुरळी, चिखली आणि दराटी परिसरात शनिवारी झालेल्या मुसळधार पावसाने महापुराचे संकट ओढवले आहे. ओढे-नाले दुथडी भरून वाहिल्याने, शेकडो हेक्टर शेती पिकांसह खरडून गेली आहे, तर अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांवर उपासमारीची वेळ आली आहे. या 'जलप्रलय'मुळे परिसरातील नागरिक पूर्णपणे हवालदिल झाले आहेत.**





शनिवारी झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने टाकळी परिसरात अक्षरशः हाहाकार माजवला. इतिहासातील हा सर्वात मोठा पूर असल्याचे ज्येष्ठ नागरिक सांगत आहेत. ओढ्या-नाल्यांच्या प्रवाहाने शेतकऱ्यांची उभी पिके वाहून गेली असून, शेतांमध्ये गाळ साचल्याने त्यांच्यासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. अनेक घरांमध्ये पाणी घुसल्याने, घरातील अन्नधान्य आणि संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला असून, मोबाईल नेटवर्कही ठप्प झाल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला होता. या नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी महसूल विभागाचे तलाठी तलवारे, कृषी विभागाच्या गव्हाणे आणि ग्रामसचिव गाडेकर यांनी पाहणी दौरा केला. मात्र, शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. मुसळधार पावसाने आणि महापुराने टाकळी परिसरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. वीजपुरवठा खंडित झाल्याने अनेक गावे अंधारात बुडाली होती. त्यातच, मोबाईल नेटवर्कही ठप्प झाल्याने, बाहेरील जगाशी नागरिकांचा संपर्कच तुटला होता. या दुहेरी संकटामुळे, मदत कार्यातही मोठे अडथळे निर्माण झाले. प्रशासनासमोर आता नुकसानग्रस्त भागातील वीज आणि दूरसंचार सेवा पूर्ववत करण्याचे मोठे आव्हान आहे.

### नद्यांनी आपली पातळी ओलांडली

■ "आमच्या आयुष्यात असा पूर कधी पाहिला नाही," अशी प्रतिक्रिया परिसरातील ज्येष्ठ नागरिक देत आहेत. पावसाचा जोर इतका होता की, ओढे-नाले आणि नद्यांनी आपली पातळी ओलांडली. पुराच्या पाण्याने शेतातील पिके तर वाहून गेलीच, पण सुपीक मातीचा थरही खरडून नेला. अनेक शेतांमध्ये गाळ साचल्याने, जमीन नापीक होण्याची भीती शेतकऱ्यांना वाटत आहे. या अभूतपूर्व संकटामुळे शेतकरी पूर्णपणे कोलमडून गेला आहे.

### प्रशासकीय पाहणी सुरू, मदतीची प्रतीक्षा

■ नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी महसूल आणि कृषी विभागाचे पथक रविवारी (दि. १७) दाखल झाले आहे. तलाठी, कृषी सहायक आणि ग्रामसचिव यांनी नुकसानीचा प्राथमिक आढावा घेतला. मात्र, केवळ पाहणी करून उपयोग नाही, तर शासनाने आम्हाला तातडीची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकरी आणि गावकरी करत आहेत. वीजपुरवठा आणि संपर्क यंत्रणा पूर्ववत करण्याचे मोठे आव्हानही प्रशासनासमोर आहे.

## राळेगाव तहसील कार्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**राळेगाव, दि. १७ प्रतिनिधी**

राळेगाव तहसील कार्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाला विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



यावेळी तहसीलदार अमित भोईटे, पोलीस निरीक्षक शितल मालटे, नायब तहसीलदार अरुण भगत आणि ममता निचत यांची प्रमुख उपस्थिती होती. स्थानिक शाळेतील विद्यार्थ्यांनी संगीत शिक्षक गवई यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रगीत आणि राज्यगीत सादर करून वातावरण भारून टाकले. यानिमित्त सौ. किरण किनाके आणि कु. माधुरी घाटोळे यांनी तिरंगा रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते. नुकत्याच यशस्वीपणे पार पडलेल्या महसूल सप्ताहातील योगदानाबद्दल महसूल विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे यावेळी कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाला भूमी अभिलेख, कृषी, आरोग्य आणि पंचायत समिती कार्यालयातील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विक्रांत खरतडे यांनी केले. या सोहळ्यामुळे प्रशासकीय अधिकारी आणि नागरिक यांच्यातील सलोखा अधिक दृढ झाला.

## झेडपी कर्मचारी पतसंस्थेची आमसभा गोंधळात

### अवघ्या नऊ मिनिटांत गुंडाळली; पांढरकवडा येथील वार्षिक सर्वसाधारण सभेतील प्रकार

**यवतमाळ, दि.१७ प्रतिनिधी**

येथील जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी पांढरकवडा येथे प्रचंड गोंधळात पार पडली. सत्ताधारी संचालक मंडळाने सभा गुंडाळल्याने संतप्त सभासदांनी त्याच ठिकाणी 'प्रती-आमसभा' घेतली.



सभासदांनी ५३ कोटींच्या बोगस ठेवी, बोगस नफा आणि अनावश्यक नोकरभरती यांसारख्या कोट्यवधींच्या अनियमिततेच्या आरोपांवर चर्चेची मागणी केली होती. मात्र, सत्ताधाऱ्यांनी उत्तरे न देता गोंधळ घालून, राष्ट्रगीताच्या आधारे अवघ्या नऊ मिनिटांत सभा संपवून पलायन केले, असा गंभीर आरोप सभासदांनी केला. यानंतर, संतप्त सभासदांनी प्रती-आमसभा घेऊन सर्व विषय नामंजूर केले आणि तीन वर्षांत एकही वचन पूर्ण न केल्याने वचननाम्याची होळी करत निषेध देखील केला. आजच्या सभेमध्ये व्याजदर कमी करा, सभासदांच्या मासिक ठेवीवर व्याजदर वाढवा, भ्रष्टाचाराची रक्कम संचालकांकडून वसूल करा, आदी मागण्या सभासद शरद इंगळे, आसाराम चव्हाण, अनिल सरतापे, प्रवीण राणे, शशिकांत खडसे, गजानन मडावी, प्रवीण दरेकर, विजय मिरासे, चित्तरंजन कडू, प्रवीण कापर्तीवार, किसन भुरके, विनोद पाटील, कैलास चव्हाण, मधुकर कोडापे, अजय अक्कलवार, श्रीराम जिड्डेवार, किसन सिडाम, रवी राठोड, भास्कर डहाके, किसन सिडाम, रणधीर आडे, पुंडलिक पोले, जाय म्हेत्रे, मनीष नाकतोडे, रविनाश राठोड, दिनेश कडू, सचिन इंगोले, गणेश राऊत, परशराम कर्नेवाड, नारायण गारशेटवाड, धनपाल कचरे, गणेश बुटे, विठ्ठल उईके, नितीन बेहरे, कन्हैया वाडगुरे, राजेंद्र पुडके, संदीप जाधव आदी सभासदांनी लावून धरल्या.

## दिग्रसच्या बुटले महाविद्यालयात 'हर घर तिरंगा अभियाना'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दिग्रस, दि. १७ प्रतिनिधी**

दिग्रस येथील बुटले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'हर घर तिरंगा अभियाना'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यानिमित्त भव्य तिरंगा रॅली आणि ध्वज वाटप करण्यात आले. 'भारत माता की जय'च्या घोषणांनी विद्यार्थ्यांनी परिसर दणाणून सोडत देशभक्तीचा जागर केला.



भारत सरकारच्या निर्देशानुसार आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य प्रा. डॉ. ए. आर. लाडोळे यांनी भूषवले. प्रमुख अतिथी म्हणून डीव्हीएसपी मंडळाचे कोषाध्यक्ष रघुराजसिंह चौहान यांच्या हस्ते अभियानाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातून भव्य 'तिरंगा ध्वज रॅली' काढण्यात आली, ज्यात शेकडो विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी सहभागी झाले होते. 'वंदे मातरम', '१५ ऑगस्ट चिरायू होवो' अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला होता. रॅलीदरम्यान महाविद्यालयीन परिसरातील नागरिकांना तिरंगा ध्वजाचे वाटप करण्यात आले आणि सर्वांनी आपल्या घरावर ध्वजारोहण केले. राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे समन्वयक प्रा. व्ही. डी. जाधव, प्रा. डॉ. एम. एम. जगताप आणि प्रा. पी. व्ही. गावंडे यांनी या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाने नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यास मदत केली.

### दहा रुपये न दिल्याने मारहाण

**उमरखेड, दि. १७ :** फक्त दहा रुपये देण्यास नकार दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून एका व्यक्तीने शेजाऱ्याच्या डोक्यात दगड मारून त्याला जखमी केल्याची घटना सोमवारी (दि. ४) टेंभुरधरा येथे घडली. याप्रकरणी बिटरगाव पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नथु दत्ता पिठलेवाड (वय ५५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे घरशेजारी असलेल्या आरोपी कानबा देवराव ब्रम्हटेके (वय ६०) याने त्यांच्याकडे १० रुपयांची मागणी केली. त्यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने, आरोपीने त्यांच्याशी वाद घालून शिवीगाळ केली. त्यानंतर त्याने हातातील दगडाने नथु यांच्या डोक्यात मारून त्यांना जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## अजय बोरेलेंचा शैक्षणिक सेवेचा 'संकल्प'

### वडिलांच्या पुण्यतिथीदिनी ५०० विद्यार्थ्यांना मदत पूर्ण करणार

**यवतमाळ, दि.१७ प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते अजय बोरेले यांनी स्वातंत्र्यदिनी घेतलेल्या ५०० गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याचा संकल्प अविरत सुरू ठेवला आहे. या सेवा यज्ञाच्या दुसऱ्या टप्प्यात त्यांनी ९५ विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत, सामाजिक बांधिलकीचा एक अनोखा आदर्श निर्माण केला आहे.



माळीपुरा येथील कालिका माता मंदिरात रविवारी झालेल्या या कार्यक्रमात सेवा नगर, तलाव फैल आणि गोरक्षण परिसरातील ९५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते विजय राय होते. प्रमुख पाहुणे अनिल शर्मा, उमेश राय, माजी सरपंच सदाशिवराव दहिफळे आणि चि. पार्थ बोरेले यांच्या हस्ते हे वाटप झाले. 'स्वातंत्र्यदिनी सुरू झालेला हा सेवायज्ञ, वडील स्वर्गीय डालुरामजी बोरेले यांच्या पुण्यतिथीदिनी, ५ सप्टेंबरला ५०० विद्यार्थ्यांची सेवा करून पूर्ण होईल,' असे अजय बोरेले यांनी सांगितले. गरजू विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी मदत केल्याबद्दल त्यांनी डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समितीचे प्रशांत पवार आणि आशीष विंचूरकर यांचे विशेष आभार मानले. प्रमोद राय, विनोद खंडाळकर, रूपम राय, प्रशांत जोशी, रितेश राय आदी यावेळी उपस्थित होते.

**श्रीकृष्ण जन्माष्टमी** हेमंत बृजवासींच्या भजनसंध्येला भक्तांचा महासागर, शासकीय मैदानावर रंगला सोहळा

## 'गोविंदा आला रे आला...' वर वणी शहर थिरकले

**वणी, दि. १७ प्रतिनिधी**

"गोविंदा आला रे आला, जरा मटकी संभाल ब्रिज वाला..." या गाण्यावर ठेका धरत, हजारो कृष्णभक्तांनी शासकीय मैदानावर 'इंडियन आयडॉल' विजेते हेमंत बृजवासी यांच्या भजनसंध्येचा आनंद लुटला. श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात, बृजवासी यांच्या सुरांनी संपूर्ण वातावरण कृष्णभक्तीत तल्लीन झाले होते.




श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून आणि स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी, ॲड. कुणाल विजय चोरडिया यांच्या अध्यक्षतेखाली १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता शासकीय मैदानावर या भव्य भजनसंध्येचे आयोजन करण्यात आले होते. 'इंडियन आयडॉल' विजेते हेमंत बृजवासी यांनी 'वक्रतुंड महाकाय' या गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर, त्यांचे प्रसिद्ध भजन 'किशोरी कुछ ऐसा इंतजाम हो जाये' सादर करून त्यांनी रसिकांना कृष्णभक्तीची अनुभूती दिली. 'विठ्ठल विठ्ठल', 'काली कमली मेरा यार है' आणि 'श्री राम जानकी बैठे है मेरे सिनेमे' या भजनांवर रसिक मंत्रमुग्ध झाले. 'लगन लागी तुमसे मन की लगन', 'छोटे छोटे गैया' यांसारखी एकापेक्षा एक सुरेल गीते सादर करून त्यांनी उपस्थितांची मने जिंकली. जय श्रीकृष्ण जन्माष्टमी समितीने या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात, 'बांके बिहारी की देख छटा', 'शाम के बिना तु आधी' आणि 'हरे रामा हरे कृष्णा' या भजनांनी वातावरणात रंगत आणली. अखेरीस, 'गोविंदा आला रे आला, जरा मटकी संभाल ब्रिज वाला' हे सुप्रसिद्ध गाणे सुरू होताच, उपस्थित तरुण-तरुणी आणि श्रीकृष्ण भक्तांचा जनसागर अक्षरशः थिरकू लागला. या गाण्याने कार्यक्रमाचा कळस गाठला आणि याच उत्साहात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हेमंत बृजवासी यांनी केवळ कृष्णभक्तीचीच नव्हे, तर शिवभक्तीचीही अनुभूती दिली. त्यांनी शिवाचे तांडव गीत 'अकड बमबम, अकड बमबम भोले' सादर करताच, उपस्थित रसिक देहभान हरपून नाचू लागले. या गाण्याने कार्यक्रमात एक वेगळीच ऊर्जा निर्माण केली. त्यांच्या या दमदार सादरीकरणाला तरुणाईने विशेष दाद दिली. 'खाटू वाले ओ खाटू वाले' या भजनानेही रसिकांची मने जिंकली.

## जाजू इंटरनॅशनल स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

**यवतमाळ, दि. १७ प्रतिनिधी**

येथील जाजू इंटरनॅशनल स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश जाजू यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीत, नृत्य आणि भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना आदर्श नागरिक बनण्याचे आवाहन केले.



या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ क्रिकेट असोसिएशनचे जिल्हा संयोजक प्रताप नवघरे, राष्ट्रीय सेविका समितीच्या सह-बौद्धिक प्रमुख डॉ. वृंदा देशमुख आणि आयटीआय कॉलेजचे मॅनेजमेंट मेंबर निखिल गाढवे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश जाजू, सचिव आशिष जाजू, डायरेक्टर-प्राचार्या शिल्पा जाजू, प्रिन्सिपल डॉ. महेश नांदेकर आणि समन्वयक सुचिता पारखे यांची विशेष उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी 'कोटी कोटी ने गाया माँ का गौरव गान' या सामूहिक गीताने कार्यक्रमात राष्ट्रीयतेचा रंग भरला. डॉ. वृंदा देशमुख यांनी विद्यार्थ्यांना भारताचा इतिहास आणि स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून दिले, तर शिल्पा जाजू यांनी देशाचा गौरव वाढवण्यासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आराध्य गणोरकर व श्रीनम दूदुलवार यांनी केले. यशस्वीतेसाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्याला विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अजिंक्य भारत
# यवतमाळ जिल्हा
सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com



अतिवृष्टीने घरे कोसळली, पिके पाण्याखाली | नेते, प्रशासनाकडून पाहणी दौऱ्यांना सुरुवात | अनेक घरांमध्ये चूलही पेटली नाही

# अतिवृष्टीने उमरखेड तालुक्यात हाहाकार

## अनेक गावांचा संपर्क तुटला; 'इसापूर'चे १३ दरवाजे उघडले; शेती, घरांचे मोठे नुकसान, जनजीवन विस्कळित

संभाजी भोयर

**उमरखेड, दि.१७: उमरखेड तालुक्यात शनिवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि इसापूर धरणातून सोडलेल्या पाण्यामुळे, पैनगंगा नदीला महापूर आला. या महापुरामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आणि शेती आणि घरांचे मोठे नुकसान झाले. दुसऱ्या दिवशी रविवारी राजकीय पुढारी आणि प्रशासनाने पूरग्रस्त भागाची पाहणी करून, बाधितांना तत्काळ मदतीचे आश्वासन दिले आहे.**

शनिवारी (दि. १६) तालुक्यात आणि इसापूर धरण क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे, धरण काठोकाठ भरले. त्यामुळे, धरणाचे १३ वक्र दरवाजे उघडून पैनगंगा नदीच्या पात्रात मोठा विसर्ग करण्यात आला. यामुळे, उमरखेड तालुक्यात महापूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. अनेक गावांचा रविवारपर्यंत संपर्क तुटलेला होता आणि वाहतूक व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली होती. पुराचे पाणी अनेक गावांमध्ये आणि घरांमध्ये शिरल्याने, नागरिकांना सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा लागला. अनेकांच्या घरातील धान्य आणि संसारोपयोगी साहित्य पाण्याखाली गेल्याने, अनेक घरांमध्ये चूलही पेटली नव्हती. या पूरपरिस्थितीमुळे मोठे नुकसान झाले असून, जनजीवन पूर्णपणे विस्कळित झाले आहे.

### कष्टावर फिरले पाणी



उमरखेड: तालुक्यात शनिवारी सलग आठ तास ढगफुटीसदृश झालेल्या पावसामुळे व यातून उद्भवलेल्या पूर परिस्थितीमुळे उमरखेड तालुक्यातील बहुतांश शेतीला नदीचे स्वरूप प्राप्त झाले. या नैसर्गिक आपत्तीने शेतजमिनी पाण्याखाली आल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले.



### पुढारी आणि प्रशासन धावले मदतीला

**पूरपरिस्थिती निर्माण होताच, भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा आणि आमदार किसनराव वानखेडे यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांसह पूरग्रस्त भागांची पाहणी केली. त्यांनी पुराच्या पाण्यातून मार्ग काढत बाधितांना धीर दिला. 'शासन पाठीशी असून, सर्वतोपरी आणि तत्काळ मदत मिळवून दिली जाईल,' असे आश्वासन त्यांनी दिले. ज्यांच्या घरात पाणी शिरले आहे, त्यांना तातडीची मदत देण्याचे निर्देशही प्रशासनाला देण्यात आले.**

## आर्णी तालुक्यातील ४००हेक्टर शेती पाण्याखाली

**आर्णी, दि.१७ प्रतिनिधी**

आर्णी तालुक्यात शनिवारी झालेल्या अतिवृष्टीने आणि धरणांमधून सोडलेल्या पाण्यामुळे पैनगंगा नदीला महापूर आला. यात ४०० हेक्टरपेक्षा जास्त शेती पाण्याखाली गेली. राणी-धानोरा गावाचा संपर्क तुटला व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

शनिवारी, दि. १६ ऑगस्ट रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे पूस आणि इसापूर धरणांमधील पाण्याची पातळी प्रचंड वाढली. त्यामुळे धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू होताच पैनगंगा नदीने रौद्ररूप धारण केले. नदीकाठच्या शेकडो हेक्टर जमिनीवरील उभी पिके वाहून गेली, तर काही ठिकाणी शेतजमीनच खरडून गेली आहे. पुराचे पाणी राणी-धानोरा गावात शिरल्याने आणि गावाबाहेरील पुलावरून पाणी वाहत असल्याने परिसरातील वाहतूक ठप्प झाली होती. याचदरम्यान, पळसा पुलावरून मोटारसायकलने जाणारे दोघे जण पाण्याच्या प्रवाहात अडकले होते, मात्र स्थानिक नागरिकांनी त्यांना वेळीच वाचविले. या नैसर्गिक आपत्तीमुळेहवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी, शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई जाहीर करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. या घटनेमुळे शेतकरी पुन्हा आर्थिक संकटात सापडले आहेत.

## उमरखेड तालुक्यातील हजारो हेक्टर शेती पाण्याखाली

### बळीराजा उद्ध्वस्त; हातातोंडाशी आलेला घास हिरावला



**उमरखेड, दि.१७ प्रतिनिधी**

उमरखेड तालुक्यात १६ ऑगस्ट रोजी झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने महापुराचा कहर केला असून, हजारो हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली आहेत. हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने तालुक्यातील शेतकरी पूर्णपणे हतबल झाले आहे. प्रशासनाने तातडीने मदत करावी, अशी मागणी होत आहे.

यावर्षी सुरवातीपासून चांगला पाऊस झाल्याने तालुक्यातील सोयाबीन, कापूस, हळद आणि ऊस यांसारखी पिके जोमात होती. महिनाभरात उत्पन्न हाती येण्याची आशा असतानाच, १६ ऑगस्टला सलग आठ तास झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने आणि इसापूर धरण क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीने सर्व चित्र पालटले. नदी-नाल्यांना आलेल्या महापुराने हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आणि शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या कष्टावर पाणी फिरले. या महापुराच्या फटक्याने शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिकदृष्ट्या खचलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी, प्रशासनाने तातडीने पंचनामे करून भरीव आर्थिक मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे. शासनाच्या भूमिकेकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### संकटसमयी घडले माणुसकीचे दर्शन

**शनिवारी आलेल्या जलप्रलयामुळे अनेकांची घरे आणि संसार पाण्याखाली गेले. अनेक घरांमध्ये चूलही पेटली नाही. अशा संकटसमयी, गावोगावी स्थानिक नागरिकच पूरग्रस्तांच्या मदतीला धावून आले. त्यांनी केवळ प्रशासनाच्या मदतीकडे न पाहता, पूरबाधितांच्या निवाऱ्याची आणि भोजनाची व्यवस्था केली. त्यांच्या या कार्याचे समाजातील सर्वस्तरांतून कौतुक होत आहे.**

## महत्वाचे

### विळ्याने हल्ला

**लाडखेड :** 'तुझी आई माझ्यासोबत बकऱ्या चारण्यासाठी का येत नाही,' अशी विचारणा करत एका व्यक्तीने १९ वर्षीय तरुणीवर विळ्याने हल्ला करून तिला जखमी केले. ही संतापजनक घटना शुक्रवारी (दि. १५) सायंकाळी कामठवाडा येथे घडली. याप्रकरणी लाडखेड पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तेजस्विनी हरीदास महाजन (वय १९) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या बकऱ्यांचा चारा घेऊन घरी येत होत्या. यावेळी आरोपी संतोष कवडुजी मानतुटे (वय ३५) याने त्यांना अडवून वाद घातला. त्याने शिवीगाळ करत, हातातील विळ्याने तेजस्विनी यांच्या उजव्या हाताच्या मनगटावर मारून त्यांना जखमी केले.

### सिंचनासाठी लावलेले मोटारपंप लंपास

**घाटंजी :** तालुक्यातील गोविंदपूर येथील शेतशिवारातून ३५,५०० रुपये किमतीची पाण्याची मोटार चोरून ती विकल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ११ ऑगस्ट रोजी घडली होती. याप्रकरणी पारवा पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. दिनेश दमडु चव्हाण (वय ३१) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी मक्त्याने केलेल्या शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी लावलेली ७.५ एच.पी. ची सी.आर.आय. कंपनीची पाण्याची मोटार आरोपींनी चोरली. आरोपी अविनाश शत्रुघन टेकाम, निलेश हन्नु मेश्राम, दिपक गेडाम आणि प्रभु मोतीराव मेश्राम यांनी संगनमत करून ही मोटार चोरली .

## अडाण धरणातून पाण्याचा विसर्ग

### शहापूर येथील पुलावरून पाणी, नेर–दारव्हा वाहतूक ठप्प

**नेर (नरसोपंत), दि.१७ प्रतिनिधी**



शनिवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे नेर-दारव्हा तालुक्यांच्या सीमेवरील मानोरा तालुक्यातील मस्नी (संजयनगर) येथील अडाण धरणाच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्याने अडाण नदीला पूर आला. शहापूर येथील पूल पाण्याखाली गेला आहे. वाहतूक पूर्णपणे थांबवण्यात आली आहे.

अडाण धरणाच्या पाणलोट क्षेत्रात शनिवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणाचा जलसाठा वेगाने वाढला. प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू केला, ज्यामुळे अडाण नदी दुथडी भरून वाहू लागली. आज, रविवारी सकाळपासूनच नदीच्या पाणी पातळीत वाढ होती होती, ज्यामुळे शहापूर येथील पूल सकाळी आठ वाजता पाण्याखाली गेला. यामुळे नेर-दारव्हा (डोल्हारी मार्गे) वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. घटनेची माहिती मिळताच नेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पुलावरील वाहतूक रोखून धरली. नदीकाठच्या सखल भागातील शेतांमध्ये पाणी शिरल्याने पिकांचे नुकसान झाले आहे. वृत्त लिहिस्तोवर वाहतूक बंदच होती, तर नदीच्या पाणीपातळीत वाढ सुरूच होती. प्रशासनाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

## पुसदमध्ये 'तीज'उत्सवाची उत्साहात सांगता

### पंधरा दिवसांच्या सोहळ्यानंतर 'जवारा'विसर्जन; बाबू सिंग नाईक तांड्यात परंपरेचे जतन

**पुसद, दि.१७ प्रतिनिधी**



पुसद येथील स्व. बाबू सिंग नाईक तांडा, इटाळा वॉर्ड येथे बंजारा समाजाचा पारंपरिक 'तीज' (जवारा) उत्सव भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पार पडला. पंधरा दिवस चाललेल्या या उत्सवाची सांगता भव्य मिरवणूक काढून आणि 'जवारा' विसर्जित करून करण्यात आली.

गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या या उत्सवात तांड्यातील अविवाहित मुलींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. रविवारी या उत्सवाची सांगता झाली. यानिमित्त स्व. बाबू सिंग नाईक तांड्यातून वाजत-गाजत आणि पारंपरिक बंजारा गीतांवर ठेका धरत भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या युवती आणि महिलांनी डोक्यावर 'जवारा' घेऊन या मिरवणुकीत सहभाग घेतला, ज्यामुळेसंपूर्ण वातावरण मंगलमय झाले होते. संपूर्ण गावातून फिरल्यानंतर ही मिरवणूक गावाच्या नदीवर पोहोचली, जिथे 'जवारा'चे विधिवत विसर्जन करण्यात आले. 'या पारंपरिक उत्सवामुळे गावातील वातावरण मंगलमय झाले असून, संस्कृतीचे जतन होण्यास मदत होते,' असे तांड्याचे नाईक अश्विन नाईक यांनी सांगितले. हा उत्सव शांततेत पार पडल्याने आयोजकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नाईक अश्विन नाईक, कारभारी रोहिदास राठोड, बाबू सिंग राठोड, प्रदीप आडे, विठ्ठल राठोड, संतोष नाईक, अशोक राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याला तांड्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सभा** | अध्यक्ष महेश सोनेकर यांची घोषणा; जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेची आमसभा उत्साहात

## संस्थेच्या सभासदांना देणार १४ टक्के लाभांश

**यवतमाळ, दि.१७ प्रतिनिधी**




यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सभासदांना त्यांच्या भागभांडवलावर १४ टक्के लाभांश देण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा संस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर यांनी केली आहे. पांढरकवडा येथे पार पडलेल्या संस्थेच्या ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते रविवारी बोलत होते. या घोषणेमुळे सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

पांढरकवडा येथील सुराणा भवनात पार पडलेल्या या सभेच्या सुरुवातीला, देशातील शहीद जवान, राजकीय नेते, पूरग्रस्त नागरिक आणि संस्थेच्या मृत सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर, विषयपत्रिकेवरील सर्व १२ विषयांवर सविस्तर चर्चा होऊन, सर्व ठराव एकमताने पारित करण्यात आले. यावेळी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना अध्यक्ष महेश सोनेकर यांनी समर्पक उत्तरे दिली. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात संस्थेला सात कोटी ३३ लाख ४४ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. या नफ्यातून, १४ टक्के दराने एकूण ५ कोटी ४७ लाख रुपयांचा लाभांश सभासदांना दिला जाणार आहे. येत्या १९ ऑगस्टपासून संस्थेचे मुख्य कार्यालय आणि पुसद, वणी, दारव्हा, आर्णी व पांढरकवडा येथील शाखांमध्ये या लाभांशाचे वाटप सुरू होईल, असेही सोनेकर यांनी जाहीर केले. सभासदांनी आपला स्थानिक ओळखपत्र पुरावा दाखवून लाभांश घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात कुटुंब आधार योजनेअंतर्गत एकूण २३ मयत सभासदांचे वारसास एक कोटी ८६ लाख रुपयाचे वाटप झाल्याची माहिती सभेत देण्यात आली. अधिकतम ५० लाख रुपयापर्यंतचे कर्ज एक दिवसात देणारी ही एकमेव पतसंस्था असून १४ टक्के लाभांश देणारी एकमेव पगारदार पतसंस्था असल्याचा उल्लेखही यावेळी करण्यात आला. तसेच सभासद भागभांडवल ३६ कोटी १२ लाख रुपये असून संस्थेची गुंतवणूक १६६ कोटी रुपये आहे. सभासदांना २५२ कोटी ६६लाख रुपयाचे कर्ज वाटप केले असून संस्थेकडे ४१ कोटी ६ लाख रुपये राखीव निधी असल्याचा उल्लेख यावेळी करण्यात आला. जिल्हाभरातून आलेल्या हजारो सभासदांनी संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. सभेत अहवाल वाचन संस्थेचे सचिव संजय बिहाडे यांनी केले. या सभेला उपाध्यक्ष संजय गावंडे, संचालक पोपेश्वर भोयर, शरद घारोड, मुकेश भोयर, अशोक चटप, विनोदकुमार कदम, गजानन पोयाम, तुषार आत्राम, प्रदीप मोहटे, नदीम पटेल, अभिजित ठाकरे, स्वप्नील फुलमाळी, विलास टोंगे, सचिन ठाकरे, तेजस तिवारी, सुनीता गुघाणे, विजया राऊत यांचेसह हजारो सभासद उपस्थित होते.

### फावड्याच्या दांड्याने हल्ला

**यवतमाळ, दि. १७ :** रेतीचा अवैध ट्रॅक्टर तहसीलदारांना पकडून दिल्याच्या रागातून तीन जणांनी संगनमत करून एका युवकाला फावड्याच्या दांड्याने मारहाण केल्याची घटना शुक्रवारी (दि. १५) दुपारी नखेगाव येथे घडली. याप्रकरणी दारव्हा पोलिसांनी परस्परविरोधी गुन्हा दाखल केला आहे. आकाश विजय देशमुख (वय २१) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी सुभाष रमेश मैद, प्रशांत संजय मैद आणि दिनेश बकाराम मैद यांनी त्यांच्याशी वाद घातला. आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत फावड्याच्या दांड्याने डोक्यावर मारून जखमी केले. तसेच, त्यांच्या मामाला आणि भावालाही मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. यापूर्वी दिनेश मैद यांनी देशमुख यांच्याविरुद्ध तक्रार दिली होती.